# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ गुरुवार ३ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १०







बांगलादेशच्या माजी पंतप्रधान

## शेख हसीना यांना तुरुंगवासाची शिक्षा!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** ढाका येथील एका विशेष कोर्टाने बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना



६ महिन्यांची जेलची शिक्षा सुनावली आहे. कोर्टाचा अपमान केल्याप्रकरणी त्यांना ही शिक्षा झाली आहे. हा निर्णय आयसीटी-१ (घ्र्हीर्हूदर्हेत ण्ग्से ऊंग्ल्हैत - घ्ण्ऊ) या तीन न्यायाधीशांच्या बेंचने दिला आहे.

कोर्टाने सांगितलं की, शेख हसीनांनी अशी काही विधानं केली ज्यामुळे न्यायालयाचा अनादर झाला आणि न्यायव्यवस्थेच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं.

बांगलादेशी मीडियानुसार, हे प्रकरण गेल्या वर्षी ऑक्टोबरमधील आहे. त्यावेळी एक फोन कॉल लीक झाला होता. या ऑडिओ क्लिपमध्ये शेख हसीना यांचाच आवाज असल्याचा दावा करण्यात आला होता. त्यात त्या म्हणत होत्या की, त्यांच्यावर २२७ केसेस दाखल आहेत, त्यामुळे त्यांना २२७ लोकांना मारण्याचा परवानाच मिळाला आहे. त्यांच्या याच वक्तव्याला कोर्टाने न्यायालयाचा अवमान मानलं.

आयसीटी हे बांगलादेशच्या १९७१ च्या स्वातंत्र्ययुद्धातील गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी बनवलेलं विशेष कोर्ट आहे. असं मानलं जातंय की, मोहम्मद युनूस हे या कोर्टाचा वापर शेख हसीना आणि त्यांच्या पक्षाचं राजकारण कायमचं संपवण्यासाठी करत आहेत. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये शेख हसीनांचं सरकार पडलं होतं आणि त्यानंतर मोहम्मद युनूस हे अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार बनले आहेत.

शेख हसीना आणि मोहम्मद युनूस यांच्यातील जुना वाद काही लपून राहिलेला नाही. युनूस यांना जेव्हा 'मायक्रोफायनान्स' मॉडेलसाठी नोबेल शांतता पुरस्कार मिळाला ☞(पान २ वर)

# '...तर काँग्रेस पक्षाला थेट आरोपी बनवता येईल'

## नॅशनल हेराल्ड प्रकरणात EDचा न्यायालयात दावा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** नॅशनल हेराल्डशी संबंधित मनी लॉँड्रिंग प्रकरणात दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टात आज सुनावणी झाली. यावेळी ईडीने महत्त्वाच्या बाबी मांडल्या. 'जर आम्हाला पुरावे मिळाले तर आम्ही PMPLAच्या कलम ७० अंतर्गत काँग्रेस पक्षाला या प्रकरणात आरोपी बनवू शकतो. त्यांना आता आरोपी न बनवण्याचा अर्थ असा नाही की हे नंतर होणार नाही. पण सध्या आम्ही कोणत्याही पुराव्याशिवाय असे करणार नाही. राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांनी तपासात सहकार्य केले नाही आणि मोतीलाल व्होरा यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. त्यामुळे ईडीच्या चौकशीच्या कक्षेत काँग्रेस येण्याची शक्यता नाकारता येत नाही,' असे ईडीने सुनावणीत स्पष्ट केले. या प्रकरणातील ईडीचे पुढील युक्तिवाद राऊस अव्हेन्यू कोर्ट ३ जुलैला ऐकणार आहे.

**ईडीचे वकिल एए. ए. राजू यांचा युक्तिवाद-** बुधवारी या प्रकरणात ईडीच्या वतीने एएसजी एसव्ही राजू यांनी युक्तिवाद केला. त्यांनी सांगितले की, यंग इंडियनने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड विकत घेतले, ज्याची मालमत्ता २ हजार कोटी रुपयांची आहे. या अधिग्रहणासाठी यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना करण्यात आली होती. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या संचालकांनी काँग्रेसला लिहिलेल्या पत्रात



लिहिले होते की, प्रकाशन बंद पडल्यामुळे आणि नियमित उत्पन्नाचा अभाव असल्याने ते कर्ज फेडू शकत नाहीत. त्यांनी असा युक्तिवाद केला की यंग इंडियनने सोनिया आणि राहुल गांधी हे त्याचे फायदेशीर मालक असल्याचे घोषित केले होते. सोनिया, राहुल, सुमन दुबे आणि सॅम पित्रोदा यांनी यंग इंडियनमध्ये महत्त्वाची पदे भूषवली. २००० कोटी रुपयांची मालमत्ता असलेली कंपनी ९० कोटी रुपयांच्या कर्जासाठी विकत घेण्यात आली. ही फसवणूक आहे.

अंमल बजावणी संचालनालयाने बुधवारी दिल्लीतील एका न्यायालयात सांगितले की, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राचे प्रकाशक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या २ हजार कोटींच्या मालमत्तेची मालकी केवळ ५० लाख रुपये देऊन मिळवली आहे.

अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू म्हणाले की, 'असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडकडे दिल्ली, लखनऊ, भोपाळ, इंदूर, पंचकुला, पाटणा आणि इतर ठिकाणी मालमत्ता आहेत आणि या सर्व मालमत्ता केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारांनी १९४७ नंतर वृत्तपत्र छपाई आणि प्रकाशनासाठी दिल्या आहेत. पण, असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड ताब्यात घेतल्यानंतर लगेचच यंग इंडियन (गांधींच्या नियंत्रणाखालील संस्था) ने घोषित केले की, ते नॅशनल हेराल्डसह कोणत्याही वृत्तपत्र प्रकाशनात सहभागी होणार नाहीत. २००० कोटी रुपयांची संपूर्ण कंपनी ताब्यात घेण्यासाठी त्यांनी फक्त ५० लाख रुपये दिले.'

दिल्लीच्या राऊज अव्हेन्यू न्यायालयाचे विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांच्यासमोर हे निवेदन सादर करण्यात आले आहे. दरम्यान, नॅशनल हेराल्ड मनी लॉँड्रिंग प्रकरणात ईडीच्या फिर्यादी तक्रारीची दखल घ्यावी की नाही, याबाबत न्यायालयात युक्तिवाद ☞(पान २ वर)

## लोखंडी पाईपने मारून पोटच्या मुलानेच घेतला आईचा जीव

**बीड/वृत्तसंस्था-** : धारूर तालुक्यात धक्कादायक घटना घडली असून मुलानेच जन्मदात्या आईचा जीव घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. मुलानेच आपल्या आईला लोखंडी पाईपने मारहाण केल्यानंतर जखमी अवस्थेत आईला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान आईने आपले प्राण सोडले. आपल्या पोटच्या गोळ्यानेच, आपल्याच मुलाने लोखंडी पाईपने केलेले आघात आईला सहन न झाल्याने



या मारहाणीत आईचा जीव गेला. सुवर्णमाला बांगर असं मृत महिलेचं नाव असून दत्ता बांगर असं मुलाचं नाव आहे. याप्रकरणी, पोलिसांनी (ज्दत्म) आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यास अटक केली आहे. न्यायालयाने आरोपीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

धारुर तालुक्यातील तरनळी गावात ☞(पान २ वर)

## आर्थिक छळाला कंटाळून बिल्डरची आत्महत्या




**पालघर मुंबई/प्रतिनिधी ::** पोलिसांच्या आर्थिक छळाला कंटाळून एका बांधकाम व्यावसायिकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या सुसाईड नोटमध्ये दोन पोलिस आणि एका दलालाच्या मानसिक त्रासाला कारणीभूत ठरवण्यात आलं आहे. या प्रकरणी आता संबंधित पोलिसांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून, संपूर्ण परिसरात ☞(पान २ वर)

## अल्पवयीन मुलीचा हात पकडने म्हणजे लैंगिक अत्याचार नाही

### उच्च न्यायालयाचे महत्वपूर्ण निरीक्षण

**मुंबई/प्रतिनिधी** : एखाद्या अल्पवयीन मुलीचा हात पकडून तिला आय लव्ह यू म्हणणे म्हणजे लैंगिक अत्याचार होत नाही असं महत्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोंदवलं. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या एकल खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवलं या प्रकरणी दाखल करण्यात आलेली याचिका रद्द करत न्यायालयाने एका २७ वर्षाच्या व्यक्तीला निर्दोष मुक्त केलं.



**नेमकं काय प्रकरण?**

ही घटना नागपूरमधील असून ऑक्टोबर २०१७ मध्ये घडली. एक १७ वर्षांची मुलगी कॉलेजमधून तिच्या घरी जात असताना एक मुलगा (त्यावेळी त्याचे वयही १७ वर्षे होते) तिच्याजवळ आला. त्या मुलाने मुलीचा हात पकडला आणि तिला आय लव्ह यू असं म्हटलं. त्या मुलीने या संदर्भात पोलिसामध्ये तक्रार केली. मुलीच्या तक्रारीवरून त्या मुलाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला.

सत्र न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी करून त्या मुलाला कलम ३५४ (लैंगिक अत्याचार) आणि ३५४ड (पाठलाग करुन विनयभंग) तसेच पोक्सो कायद्यांतर्गत दोषी मानलं. सत्र न्यायालयाच्या या निर्णयाला त्या व्यक्तीने उच्च न्यायालयात आव्हान दिलं.या प्रकरणी आपल्यावर सूडबुद्धीतून गुन्हा नोंदवण्यात आला असून त्या घटनेचा कोणीही साक्षीदार नाही. तसेच आपण ☞(पान २ वर)

## पंढरीच्या वारीत अर्बन नक्षलवादी शिरले

### महिला आमदार कायंदेंचा खळबळजनक दावा

**मुंबई/प्रतिनिधी ::** जगभरात ज्याला प्रसिद्धी मिळते अशी ऐतिहासिक पंढरपूरची वारी आहे. या वारीसाठी लाखो वारकरी पंढरीला रवाना झाले आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो दिंड्या पंढरपूरकडे रवाना झाल्या आहेत, सर्वसामान्य कार्यकर्ते भाविक वारीत जात असतात. मात्र, असं असताना एक नवीनच प्रकार समोर आला आहे, काही अर्बन नक्षलवादी वारीत शिरले आहेत, ही ऐकीव माहिती नसून सबळ पुरावे समोर आले आहेत, असे शिवसेना शिंदे ☞(पान २ वर)



### अंधश्रद्धा निर्मुलनाच्या नावाखाली गैरप्रकार

वारीत अनेक महिला वारकरी आपण पाहातो, तुळशीचं रोप घेऊन काही महिला चालतात. इतर कोणत्या गोष्टींचा प्रचार प्रसार करायचा असेल तर त्यांचा उपयोग करू शकता. काही वारकरी संघटना मुख्यमंत्र्यांना भेटल्या आणि आम्ही देखील सांगितलं ही या गोष्टीला आळा घाला. सन २०१०, २०११ पासून ह्या लोकांवर गुन्हे नोंद आहेत. जामिनावर असलेले लोकं देखील यात आहेत, अंधश्रद्धा निर्मुलनाच्या नावाखाली हे सर्व सुरू आहे, असा आरोप करत कायंदे यांनी अंनिसकडे बोट दाखवले आहे. वारीला बदनाम करण्याचा प्रयत्न होतोय, मुख्यमंत्र्यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. वारीचा गैरफायदा घेऊ नये हाच उद्देश आहे. महिला संविधानाचे पुस्तक घेऊन आम्ही चालतात, संविधानाच्या नावाखाली फेक नॅरोटिव्ह पसरवणारी ही लोकं तेच तर नाहीत ना, असा सवालही कायंदे यांनी विचारला आहे.

## शिक्षक रागावले, १० वीच्या विद्यार्थ्याने संपवले जीवन



बुलढाणा /**प्रतिनिधी** :: काही दिवसांपूर्वी एका मुख्याध्यापक पित्याने आपल्या मुलीला कमी गुण मिळाल्याने मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली होती. त्यामध्ये, मुलीचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली. आता, एका शिक्षकाने भरवर्गात (एम्प्ददत) अभ्यासावरील काही प्रश्न विचारले व त्याची उत्तरे न आल्याने विद्यार्थीनीला अपमानित करून विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांवरून अपशब्द उच्चारल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे या अपमानाचा मनात राग ठेऊन इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्याने सुसाईड नोट लिहून गळफास घेतल्याची मन सुन्न करणारी घटना बुलढाणा जिल्ह्यात घडली. सर्वत्र हळहळ करणारी ही घटना वाटत असली तरी, या घटनेने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

बुलढाणा जिल्ह्याच्या नांदुरा तालुक्यातील वसाडी गावातील ही घटना आहे. जय हनुमान विद्यालयाची इमारत, काल सकाळी साडेअकरा वाजता याच शाळेत विनायक उर्फ विवेक महादेव राऊत हा दहावीत शिकणारा विद्यार्थी शाळेत आला होता. नेहमीप्रमाणे पहिला तास सुरू झाला, वर्गात वर्गशिक्षक असलेले गोपाल सूर्यवंशी हे शिक्षक शिकवण्यासाठी आले. त्यांनी इतर मुलांसह विनायकलाही काही प्रश्न विचारले. मात्र, विनायकला प्रश्नांची उत्तरे न आल्याने शिक्षकांनी त्याला रागावून तुझ्या आई-वडिलांकडे तुझी तक्रार करावी लागेल ☞(पान २ वर)

## राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज

### मुंबईत रविवारपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज

**मुंबई /प्रतिनिधी :** : गेल्या काही दिवसांपासून मुंबईत पावसाचा जोर ओसरला आहे. अधूनमधून हलक्या सरी बरसत आहेत. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजनुसार, आता पुन्हा मुंबईत पावसाचा जोर वाढणार आहे. मुंबईसह ठाणे पालघर भागात रविवारपर्यंत मुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



यंदा मोसमी पाऊस मुंबईत लवकर दाखल झाला असला तरी, जून महिन्यात फारसा पाऊस पडलेला नाही. जून महिन्यातील चार – पाच दिवसांत कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे सरासरी एवढा पाऊस झाला. याखेरीज मुंबईत सुरुवातीपासून फारसा पाऊस पडलेला नाही. दरम्यान, मुंबई शहर, तसेच उपनगरात बुधवारी सकाळपासून पावसाने हजेरी लावली होती. दादर, वांद्रे, बोरिवली, अंधेरी या भागात पावसाचा जोर अधिक होता. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात बुधवारी सकाळी ८:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत ७ मिमी, तर सांताक्रूझ केंद्रात ४ मिमी पावसाची नोंद झाली. तसेच सांताक्रूझ येथे बुधवारी नेहमीपेक्षा कमी कमाल तापमान नोंदले गेले आहे. येथे २९.७ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले.

गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने तापमानातही काहीशी वाढ झाली होती. त्यामुळे दिवसभर उकाडा सहन करावा लागत होता. दरम्यान, मुंबईसह ठाणे आणि पालघर भागात रविवारपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या कालावधीत काही भागात पावसाचा जोर अधिक असेल.

राज्यात मुसळधार पावसाचा अंदाज

राज्यातील इतर भागातही पुढील चार ते पाच दिवस पावसाचा जोर राहणार आहे. कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या सर्वच जिल्ह्यांत मुसळधार ☞(पान २ वर)



# अमरावतीत आमदार चषक कबड्डी स्पर्धा

## ७१ वी विदर्भ राज्य अजिंक्यपद वरिष्ठ गट पुरुष व महिला कबड्डी स्पर्धा ४ ते ६ जुलै दरम्यान विभागीय क्रीडा संकुलात आयोजन

अमरावती - ॲम्युचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया व कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूर यांच्या मान्यताप्राप्त अमरावती महानगर कबड्डी (संघ) असोसिएशन, अमरावतीच्या यजमानपदाखाली ७१ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट पुरुष व महिला आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन दि. ४ ते ६ जुलै २०२५ दरम्यान विभागीय क्रीडा संकुल मोर्शी रोड, अमरावती येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत विदर्भातील सर्व प्रमुख महिला व पुरुषांचे संघ सहभागी होणार असून या स्पर्धेतून राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता विदर्भाचा संघ सुध्दा निवडला जाणार आहे. या स्पर्धेत विविध आकर्षक पुरस्कार देण्यात येणार आहे. या स्पर्धेनिमीत्त संपूर्ण राज्यभरातून सुमारे ६०० हून अधिक खेळाडू, पंच, प्रशिक्षक, मार्गदर्शक हे अमरावतीत येत आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शनिवार दि. ५ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता ज्यांच्या नावाने ही कबड्डी स्पर्धा आमदार चषक म्हणून घेण्यात येत आहे असे बडनेरा विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार तसेच महाराष्ट्र विधीमंडळाच्या आश्वासक समितीचे अध्यक्ष मा. श्री. रविभाऊ राणा यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विशेष अतिथी म्हणून राज्यसभा खासदार मा.श्री डॉ. अनिल बोंडे, धामणगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार मा.श्री प्रतापदादा अडसड, तिवसा विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. श्री. राजेश वानखडे, अचलपुर विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. श्री प्रविण तायडे तसेच अखिल भारतीय कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव मा. श्री.ए. उसी रेड्डी आदी उपस्थित राहणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार तसेच कबड्डी असोसिएशन, विदर्भ संघ, नागपूरचे अध्यक्ष मा. श्री. रामदास तडस, वर्धा नगरपालिकेचे उपाध्यक्ष तसेच कबड्डी असोसिएशन, विदर्भ संघाचे सचिव मा. श्री. प्रदिपसिंग ठाकूर, अमरावती विभागाचे क्रीडा उपसंचालक मा. श्री. शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी मा. श्री. गणेश जाधव, भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक शेखर भोयर व माजी नगरसेवक व ज्येष्ठ मार्गदर्शक मा. श्री. वसंतराव साऊरकर यांची उपस्थिती राहणार आहे.

या स्पर्धेचे बक्षिस वितरण ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी पालकमंत्री मा. श्री प्रविण पोटे, माजी खासदार मा. सौ. नवनित रवि राणा, मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. श्री. उमेश यावलकर, कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव ए. उसी रेड्डी, माजी खासदार व कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ, नागपूरचे अध्यक्ष मा.श्री रामदास तडस, सचिव व वर्धा नगरपालिकेचे उपाध्यक्ष प्रदिपसिंहजी ठाकूर, माजी महापौर विलास इंगोले, भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, भाजपा शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, कबड्डी असोसिएशन विदर्भ संघ नागपूरच्या रेफ्रीबोर्डाचे अध्यक्ष सतिष इखार यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेसाठी येणाऱ्या खेळाडू, पंच, प्रशिक्षक महिला व पुरुष यांची निवास व भोजन व्यवस्था आयोजन समितीतर्फे करण्यात आली आहे. या स्पर्धेदरम्यान विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे.

अमरावती महानगर कबड्डी (संघ) असोसिएशनचे अध्यक्ष विवेक तु. गुल्हाने, सचिव नितीन सराफ, कार्याध्यक्ष संदीप इंगोले, उपाध्यक्ष अतुल इंगोले, योगेश भोसले, कोषाध्यक्ष मिलींद पाटील, सहसचिव राजेश गाडे यांच्यासह कार्यकारीणी सदस्य मिलींद बांबल, धनराज यादव, शरद गढीकर, गणेश वरुडकर, अतुल देशमुख, सतिष ठाकूर, निलेश सराफ, राजेंद्र तुळे, सचिन मेहरे आदी स्पर्धेच्या यशस्वितेकरीता कार्यरत आहे. स्पर्धेसाठी स्वागत समितीचेही गठण करण्यात आले असून त्यात राजाभाऊ यादगिरे, जयंत कलोती, दिपक गुल्हाने, सुनिल गोगटे, सुरेंद्र चिखलकर, प्रदिप वानखडे, मिलींद बांबल, आप्पासाहेब देशमुख, राजुभाऊ महल्ले, सुनिल वानखडे, सुरेश दम्माणी, सर्जेराव भिडे आदी काम पाहत आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### बांगलादेशच्या माजी पंतप्रधान

आणि ते जगात प्रसिद्ध झाले, तेव्हा शेख हसीनांना ते आवडलं नव्हतं. त्यांनी युनूस यांच्यावर करचोरी आणि गैरव्यवहाराचे आरोप केले. इतकंच नाही, तर त्यांना 'ग्रामीण बँक'मधून काढण्याचाही प्रयत्न केला. यावर युनूस यांनीही अनेक आंतरराष्ट्रीय मंचांवरून बांगलादेश सरकारवर टीका केली, ज्यामुळे त्यांचे संबंध आणखी खराब झाले.

### '...तर काँग्रेस पक्षाला थेट

सुरू आहे. सुनावणीदरम्यान, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू यांनी असेही म्हटले की, गांधी कुटुंबाच्या जवळच्या सहकाऱ्यांना एजेएलचे संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले होते आणि पैसे वळवण्यासाठी फसवे व्यवहार केले गेले. नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेसने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला दिलेले ९० कोटींचे कर्ज फक्त ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात यंग इंडियनला हस्तांतरित केल्याचा गंभीर आरोप आहे. या इक्विटी व्यवहारामुळे २००० कोटी रुपयांच्या मालमत्तेचा गैरवापर झाल्याचे ईडीचे म्हणणे आहे. माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी त्यांच्या खाजगी तक्रारीत सोनिया गांधी, राहुल गांधी, मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सुमन दुबे, सॅम पित्रोदा आणि गांधी कुटुंबाच्या नियंत्रणाखालील यंग इंडियनवर फसवणूक, गुन्हेगारी कट रचणे, गुन्हेगारी विश्वासघात आणि मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. ईडीने या वर्षी १५ एप्रिल रोजी गांधी कुटुंबासह पित्रोदा आणि इतरांविरुद्ध खटला दाखल केला आहे.

### लोखंडी पाईपने मारून पोटच्या

सुवर्णमाला आपल्या घरासमोर बसल्या असता, त्यांचा मुलगा दत्ता बांगर याने घरात जाऊन लोखंडी पाईप आणत त्याच पाईपाने आईच्या डोक्यात मारहाण केली. मारहाण करताना दत्ता याचा लहान मुलगा देखील समोर होता. मात्र, दत्ता हा मारहाण करताना थांबला नाही. त्यावेळी, त्यांच्या बाजूला असलेल्या भावजाईला देखील दत्ता बांगर याने जीवे मारण्याची धमकी दिली. दरम्यान, लेकाकडून झालेल्या या मारहाणीत रक्तबंबाळ झालेल्या सुर्णमाला बांगर यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वादाती रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी दत्ता बांगर याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास पोलिसांनी अटक देखील केली आहे. याप्रकरणी, आरोपी मुलाला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, आरोपी दत्ता याचा सर्व कुटुंबाला त्रास असल्याचे त्याच्या बहिणीने सांगितले. याआधीही त्याने त्याच्या चुलत्याला त्रास दिला होता. त्यामुळे, आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, तो तुरुंगातून सुटल्यास त्याच्या वडिलांना आणि कुटुंबातील इतर सदस्यांना पुन्हा मारहाण करू शकतो. त्याच्यापासून या सर्वांच्या जीवाला धोका असल्याचे देखील त्याच्या बहिणीने माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. याप्रकरणी, पोलीस अधिक तपास करत आहेत.

### आर्थिक छळाला कंटाळून बिल्डरची

संतापाची लाट उसळली आहे. त्यानंतर, आचोळे पोलिसांनी दोन पोलिसांना अटक केली आहे. याप्रकरणी, आज तिघांना वसई (ऱ्रि) न्यायालयात हजर केल्यावर, न्यायालयाने (ण्दूि) तिघांना ७ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. मात्र, या घटनेनं पोलिसांच्या कार्यक्षमेतवर आणि अवैध मार्गाने मिळणाऱ्या कमाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मृत व्यावसायिकाचे नाव जयप्रकाश चौहान (वय अंदाजे ५५) असे असून, ते नालासोपारा पूर्वेतील संयुक्त नगर येथे त्यांनी 'ओम श्री दर्शन' ही इमारत पुनर्विकासासाठी घेतली होती. या बांधकामासाठी मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस हवालदार श्याम शिंदे यांनी आपल्या नातलगाच्या माध्यमातून फायनान्स म्हणून ५० लाख रुपये दिले होते. त्यावर एका वर्षात दुप्पट परताव्याचे आश्वासन घेतले गेले होते. एवढंच नव्हे तर, चौहान यांनी त्याबदल्यात चार फ्लॅट्सची हमीही शिंदे याला लिहून दिली होती. या फायनान्समध्ये शिंदे बरोबर पोलीस हवावदार राजेश महाजन याचाही समावेश होता. मात्र, बांधकामास विलंब झाल्याने श्याम शिंदे, त्याचा सहकारी पोलीस राजेश महाजन आणि यांच्यातील मध्यस्थी दलाल लजपत लाला यांनी जयप्रकाश यांच्याकडे सतत पैशाची मागणी केली. त्यामुळे मानसिक दबावाखाली आलेल्या चौहान यांनी आधीच २२ लाख रुपये ऑनलाईन आणि १० लाख रुपये रोख स्वरूपात देऊनही, या तिघांनी त्यांच्याकडे पुन्हा पैशांची मागणी करत धमकी द्यायला सुरुवात केली होती. खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याची भीती दाखवून सातत्याने छळ केला जात होता, अशी माहिती चौहानच्या नातेवाईकांनी दिली आहे. मृताच्या कुटुंबीयांनी आणि मित्रमंडळींनी या तिघांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

### अल्पवयीन मुलीचा हात पकडने म्हणजे

त्या मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केला असल्याचा कोणताही पुरावा नाही असा दावा त्या व्यक्तीकडून करण्यात आला. या सर्व गोष्टी लक्षात घेता न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या एकल खंडपीठाने यावर सुनावणी केली आणि त्या व्यक्तीची निर्दोष मुक्तता केली. केवळ मुलीचा हात पकडून आय लव्ह यू म्हटल्याने लैंगिक अत्याचार होत नाही असं निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवलं.

### पंढरीच्या वारीत अर्बन नक्षलवादी

आमदार मनीषा कायंदे यांनी म्हलं आहे. विशेष म्हणजे यावेळी सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते. आता, आमदार कायंदे (ईंहर्ग्रे ईंह्वा) यांच्या वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. आता, आमदार आदित्य ठाकरे यांनी या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे.

देवाला धर्माला ही लोकं मानत नाही, हा त्यांचा अधिकार आहे. हिंदू धर्म आणि वारीबद्दल अपप्रचार करत आहेत, लोकांचा बुद्धीभेद करत आहेत. पंढरपूरची वारी अशी आहे जिथे कोणी कोणाला निमंत्रण देत नाही. वेगवेगळ्या बोगस नावाखाली काही संघटना जसे पर्यावरण दिंडी, संविधान दिंडीसारख्या गोष्टी समोर आल्या आहेतस, पथनाट्य करतात, असे शो करतात. एक दिवस तरी वारी अनुभवा, हा माणूस कोण आहे हे तुम्हाला माहिती आहे. सासवड येथे ही लोकं पोहोचतात आणि त्यांच्या वारीचा रुट देखील आहे. क्युआर कोड त्यांनी दिलाय जो ब्लॅकलिस्टेड आहे, असं दिसतंय. पंढरपूरच्या वारीचा ही लोकं गैरफायदा घेत आहेत, अशी माहिती मनीषा कायंदे यांनी सभागृहात दिली.

### शिक्षक रागावले, १० वीच्या

, तुला अभ्यासात काही येत नाही ☞(पान २ वर)

असे म्हटले. तसेच, आई-वडिलांवरून काही अपशब्द बोलल्याची माहिती आहे. त्यावरून विनायकला राग आला व त्याने मधल्या सुट्टीनंतर गावाजवळील त्याच्या शेतातील घरात सुसाईड नोट लिहून गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेनं शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. तर, तालुक्यातून हळहळ व्यक्त होत आहे. विनायकने गळफास घेतल्यानंतर ही बातमी वाऱ्यासारखी परिसरात पोहोचली, गावातील नागरिक शाळेत पोहोचले व त्यांनी शिक्षक गोपाल सूर्यवंशी याला जबाबदार धरत चांगला चोप दिला. शिक्षकाला पोलिसांच्या स्वाधीन केलं, विनायकच्या काकांनी पिंपळगाव राजा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी शिक्षक गोपाल सूर्यवंशी यांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा गुन्हा नोंद केला आहे.

**शिक्षकांविरुद्ध गुन्हा, आरोपीला अटक** याबाब तक्रारदार मुलाचे काका गोपाल राऊत म्हणाले की, आमचा पाल्य विनायक यास शिक्षकाने त्याच्या आई-वडिलांवरून अपशब्द बोलल्यामुळे त्याला अपमान सहन झाला नाही, व त्याने आत्महत्या केली. तर शिक्षक गोपाल सूर्यवंशी यांनी मी फक्त त्याला प्रश्न विचारले असता त्याला उत्तर न आल्यामुळे तुझ्या आई-वडिलांना बोलावून मी तुझी तक्रार करेल इतकच बोललो असं म्हटलं. या संपूर्ण घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून बुलढाणा जिल्हाभरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मात्र, या विद्यार्थ्याच्या आत्महत्येने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांसोबत कसं वागावे किंवा १२ ते १८ या वयोगटातील विद्यार्थ्यांसोबत किंवा मुलांसोबत कशी वागणूक असावी, याबाबत बाल मानसोपचार तज्ञांनी देखील चिंता व्यक्त केली आहे.

### राज्यात मुसळधार पावसाचा

पाऊस कोसळेल. तसेच मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील घाटमाथ्यावरही मुसळधार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात मात्र पावसाचा जोर फारसा नसेल, काही भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी बरसतील. याचबरोबर विदर्भातही शनिवारपर्यंत पावसाचा जोर कमी राहील. त्यानंतर विदर्भात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

### अमरावती रेल्वे स्टेशन

करण्याच्या दृष्टीने दरवर्षी नगरसेवक तुषार भारतीय यांच्या पुढाकाराने वतीने साबुदाणा खिचडी , रेनकोट , प्राथमिक औषध वाटप तसेच जेष्ठ वारकरी व रेल्वे चालक , गार्ड सत्कार करण्यात आला. या आनंददायी व नेत्रदीपक सोहळाच साक्षीदार व्हाण्याकरिता माजी स्थायी सभापती श्री तुषार भारतीय यांच्या नेतृत्वाखाली माजी महापौर चेतन गावंडे , प्रशांत शेंगोकर , सौ सुनंदा खरड , ऋषी खात्री , गजू कोल्हे , राजेश जगताप , मंदार नानोटी, के टी गावंडे , रावसाहेब देशमुख सह अनेक प्रतिष्ठित नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

### अचलपूर उपजिल्हा रुग्णालय

मागणी नागरिकांकडून होत आहे.या रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ मोठ्या प्रमाणात असताना दुरावस्था झालेल्या या रस्त्याचा कायापालट साठी मंजूर झालेल्या निधीतून रस्त्याचे काम सुरू कधी करणार ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अचलपूर शहरातील माळवेशपुरा (तोंडगाव गेट ) येथून अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणाऱ्या प्रस्तावित डी.पी रस्त्यावर काशीकर फटाका सेंटर येथून अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा ते भूषण ऑटो जवळून जाणाऱ्या या रस्त्यावर नेहमी शाळा , महाविद्यालय,रुग्णालय ,शासकीय कार्यालय,पोलीस स्टेशन कडे जाण्यासाठी शेतकरी ,मजूर ,विद्यार्थी ,नागरिकांची प्रचंड वर्दळ असते.या रस्त्यावरून दुचाकी ,ऑटो वाहनांची मोठी वर्दळ असते .मात्र या रस्त्यावर अनेक खड्डे असल्याने वाहनचालकाना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे.या रस्त्याचा सिमेंट काँक्रिटीकरणाच्या बांधकामासाठी निधी मंजूर होऊनही अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाकदून कामाला सूरवात झालेली नाही . या रस्त्यावर जागोजागी खड्डे असल्याने चिखलातून नागरिकांना मार्ग काढावा लागतो.गेल्या अनेक वर्षापूर्वी अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाकडून या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे . यानंतर या रस्त्यासाठी निधी मंजूर ही झाला . पण पावसाळा सुरू झाल्यानंतर कामाला प्रत्यक्षात प्रारंभ झालेला नाही .यामुळे अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँक शाखेत येणारे ग्राहक व वीज बिल भरण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांना सुद्धा त्रास सहन करावा लागतो. या रस्त्यावरून जीवनपुरा , माळवेशपुरा , बुंदेलपुरा,देवडी आदी भागाचे नागरिक ये - जा करतात .यामुळे वाहनांची मोठी वर्दळ असलेल्या या रस्त्याचे तत्काळ अचलपूर नगर परिषद प्रशासनाने मंजूर झालेल्या निधीतून सिमेंट काँक्रिटीकरनाचे काम तत्काळ करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### छत्री तलाव परिसरात

भुताटकी नसल्याचा निर्वाळा देखील दिला आहे. एक जखमी युवकाची पाठ असलेले फोटो देखील व्हायरल करण्यात येत आहे. काही पूजा सामग्री आणि हा जखमी युवक भुताटकीने पछाडला असल्याचा दावा करण्यात येत आहे. भुताने सागर नावक तरुणाला बेदम मारहाण केली असे म्हटले जात आहे. सोशल मीडियावर यामुळे चर्चांचा पाऊस पडत आहे.भूत प्रेत आत्मा अस्तित्वात आहे का जर भुताटकी नसेल तर त्या युवकाला अंधारात कोणी जखमी केले असे नानाविध प्रश्न विचारले जात आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समिती समोर देखील हे भले मोठे आव्हान ठरू शकते.सोशल मीडिया आजच्या काळात फारच सशक्त माध्यम असल्याने त्यावर जो अफवांचा पाऊस सुरू आहे. त्यात काहीतरी तथ्य असल्याचेही सांगण्यात येत आहे.

### भानखेडा मध्ये फोडले

गायब दिसले. त्यांनी तत्काळ भंडारा पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची रीतसर तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपी आणि विरुद्ध कलम ३०५(अ),३३२(४) बीएन एस अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### स्पा ९९ वर गुन्हे

व्हीआयपी व्यवस्था येथे करण्यात आली होती. सुगंधित तेल, परफ्युम, केमिकल, क्रीम, फोमच्या गाद्या सहा प्रत्येक रूममध्ये सीसीटीव्ही द्वारा लाईव्ह प्रक्षेपण केले जात होते. पोलिसांनी तेथे काम करणाऱ्या काही मुलींकडून विचारपूस केली.हा स्पा सेंटर मध्यप्रदेशच्या रतलाम निवासी राकेश रावत यांचा होता. दस्तुर नगर निवासी निरजसिंग पडिया येथे मॅनेजर आहे. पोलिसांनी येथे पंचनामा करून आपत्ती जनक सामग्री व्यक्त केली.

### ऑटो उलटल्याने दहा

गर्दी जमली होती.स्थानिकांनी अपघातातील जखमींना तातडीने दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखलं केलं. डॉक्टरांच्या वतीने युद्ध पातळीवर उपचार सुरू आहेत. यातील तीन जखमींना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात पुढील उपचार करिता पाठवण्यात आले आहे.ऑटो मध्ये सवार सर्व प्रवासी गोंड वाघोली येथील राहणार होते.

### योगीधाम परिसरात

पाठवण्यात आला.प्राथमिक तपासात मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्यामुळे पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा नोंद केली आहे. पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार मृत व्यक्ती योगीधाम परिसरात नेहमी फिरायचा.आज सकाळी त्याचा मृतदेह आढळून आला. पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की शवविच्छेदन अहवाला नंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होऊ शकेल .या घटनेने योगीधाम परिसरात खळबळ माजली आहे.

### लिफ्टच्या नावावर लुटणारा

एक्सेस कंपनी च्या मोपेटचा फोटो देखील काढला होता. त्या गाडीचा नंबर एमएच २७ सीएस ५७६९ असल्याचे पोलिसांना सांगितले होते. पोलिसांनी तत्काळ त्या गाडीवरून आरोपींचा शोध घेतला. आरोपीला ताब्यात घेऊन गुन्ह्यात वापरलेली एक्सेस मोपेड किंमत ७० हजार ,१७ हजार रोख असा एकूण ८७ हजार रुपयाचा ऐवज जप्त केला.पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक आयुक्त जयदत्त भवंर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कोटनिके, रामदास पालवे, उपनिरीक्षक विजय गीते, रंगराव जाधव, हरीश बुंदेले, प्रमोद हरणे, आकाश इंगोले, आनंद जाधव यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.

### अर्धवट पुलाजवळील

प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. नांदगाव पेठ ते पांढुर्णा हा मुख्य महामार्ग असून दुतर्फा असलेला हा पूल एका बाजूने पूर्ण करण्यात आलेला आहे. परंतु दुसऱ्या बाजूने अर्ध अवस्थेत सोडलेला आहे.या पुलालगतच तीर्थक्षेत्र सालबर्डी येथे जाणारा मार्ग असल्यामुळे ये-जा करणाऱ्या वाहनांची कोंडी निर्माण झाली आहे.वरूड वरून अमरावतीकडे जाणाऱ्या वाहनांना हा अर्धवट पूल दिसत नाही.त्यामुळे नागपूर येथून वरुड मार्गे मोर्शी येथून चिखलदरा जात असताना स्विफ्ट डिझायर गाडी चालकाच्या रस्ता लक्षात न आल्याने गाडी रोडच्या खाली खड्डयात पडल्यामुळे गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गाडीत बसलेल्यांना किरकोळ मार लागला. सुदैवाने प्राणहानी टळली.यापूर्वी वरुड वरुन अमरावती येथे धान्य घेऊन जाणारा आयशर ट्रक खड्यात पलटी झाला होता. वरुड मोर्शी मार्गे चांदूरबाजार जाणारी कार त्याच ठिकाणी पलटी झाली होती. वरुड येथून येणाऱ्या चालकांना दुसऱ्या बाजूने येणारे वाहन अजिबात दिसत नाही. परिणामी या ठिकाणी वारंवार अपघात घडण्याचे प्रमाण वाढत आहे.नळा नदीवरील अर्धवट पुल हा संपूर्ण मोर्शीकरांना नव्हे तर बाहेर गावातील नागरिकांना वेळोवेळी मरणाला आमंत्रण देत आहे.काही दिवसापूर्वी शिवाजी मैत्री संस्था पाळाचे संस्थापक अध्यक्ष श्रणीत राऊत यांच्या नेतृत्वात पुलाचे बांधकाम पूर्णत्वास जावे यासाठी पुलावर बसून रास्ता रोको आंदोलन छेडण्यात आले होते. यावेळी महामार्गाचे कार्यकारी अभियंता अनंत देशमुख,शुभम देशमुख यांनी अवघ्या ८ दिवसात पुलाचे बांधकाम पूर्णत्वास जाईल.असे आश्वासन दिले होते.मात्र अद्यापही पुलाचे काम करण्यात आले नाही.तरी शासन प्रशासनाचे वतीने या गंभीर समस्येची दखल घेऊन अर्धवट पुलाचे बांधकाम त्वरित करण्यात यावे अशी मागणी या निमित्ताने जोर धरत आहे.

### राजस्थानी समाजातील गुणवंतांचा

सहसंयोजक संजय राठी, प्रा. मुकेश लोहिया, गिरीष डागा, राजेश मित्तल, श्याम शर्मा, विरेंद्र शर्मा, समता केडिया, सोनाली राठी, महिला मंडल अध्यक्ष उर्मिला कलंत्री, सचिव रेशू खंडेलवाल, युवक मंडल अध्यक्ष अमित मंत्री, सहसचिव साहिल खंडेलवाल यांनी केले आहे.

### बासपाणी रस्त्याची दयनीय

संवेदनशीलतेचे तथा जबाबदारीचे दर्शन यातून होते. इतक्या वेळा निवेदने देऊनही उपाययोजना न होणे हे केवळ प्रशासनाचे अपयशच नव्हे, तर लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षाचाही पुरावा आहे. धारणी-बासपाणी रस्ता हा एकमेव अपवाद नसून, संपूर्ण मेळघाट परिसरात आणि धारणी तालुक्यात अनेक गावांचे रस्ते याच अवस्थेत आहेत. पावसाळ्यात तर परिस्थिती आणखीनच बिकट होते. अनेक गावांचे मुख्यालयाशी संपर्क तुटतो, आरोग्यसेवा, शालेय शिक्षण आणि दैनंदिन जीवन यावर गंभीर परिणाम होतो.

या रस्त्याचे काम तातडीने हाती घेऊन गावकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आता अधिक तीव्रतेने होत आहे. बासपानी गावच्या रस्त्याच्या बांधकामाकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी यांनी तात्काळ लक्ष द्यावे, नाही तर भर पावसात रत्यावर उतरण्याशिवाय आता पर्याय नाही अशा निवेदन वजा इशारा उपसरपंच दिलीप चतुर व पेसा समिती अध्यक्ष विजय डहाके यांनी केली आहे. मात्र, या विषयावर जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे डेप्युटी इंजिनिअर कमलेश काळे यांच्याशी फोनवर संपर्क साधला असता, त्यांनी माहिती दिली की, हा रस्ता आधी मनरेगा योजनेतून मंजूर झाला होता. परंतु ठेकेदाराने निधी उपलब्ध न झाल्यामुळे काम अपूर्ण ठेवले आणि सोडून दिले. त्याला वारंवार पत्र देऊन ही तो प्रतिसाद देत नाही. आता २०२५-२६ या वर्षाच्या नियमित जिल्हा परिषद निधीतून या रस्त्याचे काम आम्ही करून घेणार आहोत. त्याआधी तातडीने या रस्त्यावर मुरूम व गिट्टी टाकून तात्पुरती दुरुस्ती करण्यात येणार आहे. अशी माहिती जिल्हा परिषद चे डेप्युटी इंजिनिअर कमलेश काळे यांनी दिली आहे.

## होमगार्डची उपयुक्तता वाढल्यास पोलिसांची गृह खात्यात असलेली उणीव भरून काढता येईल - आ.संजय खोडके

मुंबई/अमरावती - महाराष्ट्र राज्य विधीमंडळ पावसाळी अधिवेशनामध्ये विधानपरिषदेच्या सभागृहातील बुधवार दिनांक २ जुलै रोजी आजच्या कामकाजादरम्यान गृह विभागाशी संबंधित प्रशोत्तराच्या तासामध्ये आ.संजय खोडके यांनी सुरक्षा बंदोबस्त वाढवत असतांना होमगार्डचे आरक्षण वाढविण्यासाठी गृहविभागाने उपाययोजना करण्यासंदर्भात सूचना केली. यावर उत्तर देतांना मुख्यमंत्री तथा गृहमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात आधीच धोरण ठरविण्यात आले असून महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या माध्यमातून आवश्यक बंदोबस्त पुरविला जात असल्याबाबत सभागृहाला अवगत केले. महाराष्ट्र विधान परिषदेत पीठासीन सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सभागृहात गृहविभागाशी संबंधित प्रश्नोत्तरासाठी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी पोलीस भरती, पोलीस वसाहत, पोलीस कल्याण , अनुकंपावरील नियुक्त्या व पोलीस सुरक्षा आदी संदर्भात चर्चा सुरु असतांना आ.संजय खोडके यांनी पोलीसांवरील ताण व अतिरिक्त कामाचा बोजा कमी करण्यासाठी होमगार्ड विभाग अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे सांगितले. सद्या पोलीस भरती मोठ्या प्रमाणावर होत नसल्याने पर्यायी यंत्रणा म्हणून होमगार्ड जवानांचा वापर करण्याची गरज आहे.

### अशोकराव निर्मळ यांचे निधन



**अमरावती/प्रतिनिधी:** अशोकराव रामचंद्रजी निर्मळ (माजी सरपंच वलगांव) यांना ०२ जुलै २०२५,बुधवार रोजी देवाज्ञा झाली. त्यांचे मागे दोन मुले एक मुलगी, भावंड आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. ते वलगावचे सरपंच होते तसेच आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. पीडीएमसीचे अधिक्षक डॉ. सोमेधर निर्मळ यांचे ते ज्येष्ठ बंधू होते. त्यांचा अंतविधी दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता राहत्या घरुन स्थळ श्री.व्यंकटरावजी निर्मळ विद्यालय,वलगांव येथुन निघेल.

### प्रमोदराव उर्फ आप्पासाहेब यशवंतराव सराड



टाकरखेडा संभू - प्रमोदराव उर्फ आप्पासाहेब यशवंतराव सराड वय ८०, रा. सोनगाव ह मु अमरावती यांचे बुधवार दि.०२/०७/२०२५ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, भाऊ, पुतणे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. अंत्यसंस्कार गुरुवारी १२.०० वाजता अमरावती स्थित शंकर नगर येथील स्मशानभूमीत करण्यात येणार आहे. त्यांनी सहकारातील विविध पदे भूषविली.

### डॉ. हरीश उदासी यांचे निधन



अमरावती - अमरावती शहरातील वरिष्ठ शल्य चिकित्सक , चित्रा टॉकिज चे संचालक डॉ. हरीश मोतीदासजी उदासी यांचे अल्प आजाराने बुधवार दिनांक २/७/२०२५ ला सकाळी ७.५५ वाजता निधन झाले.ते ७९ वर्षा चे होते.त्यांचे पश्चात पत्नी, पुत्र, सुन, मुलगी,जावाई असा मोठा आप्त परिवार शोकाकुल सोडून गेले. अंतिम यात्रा त्यांचें निवास स्थान ब्लासम शो रूम डफरिन रोड, इर्विन चौक येथुन बुधवारी ४.३० वाजता निघुन हिंदू स्मशानभूमीत पार्थिवावर ५.३० वाजता त्यांच्या मुलाने अग्नी दिला. त्यांच्या अंत्येष्टीला सिनेमा क्षेत्रातील थिएटर मालक, वितरक, डॉक्टर मित्र, नातेवाईकांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ गुरुवार, ३ जुलै २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## कर्तव्यदक्ष मुख्याधिका-याला निष्क्रिय अधिका-यांची सलामी

■ नगर परिषद, कारंजा चा गलथान कारभार
■ स्वच्छता विभागाची मनमानी,
■ नागरिकांचा आंदोलनाचा पवित्रा


कारंजा नगरी अतिक्रमणाच्या विळख्यात

■ प्रतिनिधी | कारंजा ■

**नगर परिषद, कारंजा (लाड) या 'ब' दर्जाच्या नगर परिषदेला कधी नव्हे तो महेश वाघमोडे यांच्या रूपाने कायमस्वरूपी कारंजा या गावी वास्तव्य करणारे मुख्याधिकारी प्राप्त झालेत. रुजू होऊन उणे पुरे १० दिवस झाले नाहीत तर नगर परिषद स्वच्छता विभागाच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्याला त्यांच्या निष्क्रियतेची सलामी दिली.**

सविस्तर वृत्त असे की, नगर परिषदेची हद्दवाढ होऊन आज रोजी ८ वर्षाचा कालावधी लोटला आहे. हद्दवाढ होऊन अद्यापसुद्धा नगर परिषद प्रशासनाने मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत. हद्दवाढ परिसरातील नागरिकांना सापत्नपणाची वागणूक दिल्या जात आहे. कचरा निर्मूलन करून भविष्यातील रोगराईला पायबंध घालण्यासाठी शासन वारेमाप खर्च करीत आहे. परंतु निष्क्रियतेची सवय अंगवळणी पडलेल्या प्रशासनाला या बाबीशी कोणत्याही प्रकारचे सोयरसुतुक नसून, काहीच देणे घेणे नाही.

बायपास वरील शिंदे नगर या वसाहतीतील हनुमान मंदिराजवळ वास्तव्य करणाऱ्या नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे कचरा निर्मूलन हेतू असलेली घंटागाडी मागील एक महिन्यापासून त्यांच्या परिसरात कचरा गोळा करून विल्हेवाट लावण्यासाठी आली नसल्याचे तक्रार अर्ज, निवेदनाद्वारे मुखाधिकाऱ्यांना कळविले आहे. लेखी तक्रार अर्जावर स्वाक्षरी करणारे नितीन भिंगारे, देवेंद्र वानखडे, अजय ठाकरे, सुजित चौधरी, सागर चिंचोलकर, दिनेश ठाकरे, बबनराव लोडम, भानुदास लकडे, गजानन कडू, अमोल तिरमारे, राहुल वानखडे, गजानन मुंदे, दिनेश महल्ले यांनी आंदोलन करण्याचा इशारा पत्राद्वारे प्रशासनाला दिला आहे. दै.जनमाध्यम या वृत्तपत्रामध्ये यापूर्वी सुद्धा नगर परिषदेच्या गलथान व निष्क्रिय कारभाराविषयी प्रकाशझोत टाकण्यात आलेला आहे. परंतु गेंड्याची कातडी ओढलेल्या निगरगट्ट प्रशासनावर या बाबींचा कोणत्याही प्रकारचा फरक पडला नाही. हद्दवाढ परिसरातील नागरिकांनी बायपास परिसरात त्यांना होत असलेल्या असुविधेबद्दल प्रशासनाला बरेच लेखी तक्रार अर्ज सादर केलेत. परंतु रोज मरे त्याला कोण रडे याप्रमाणे प्रशासनाने तक्रार अर्जाकडे दुर्लक्ष करण्यातच धन्यता मानीत आले आहे. यापूर्वीचे मुख्याधिकारी कार्यरत असून सुद्धा नसल्यासारखेच होते. कारण ते बाहेगावावरून उंटावरून शेळ्या हाकलण्याप्रमाणे कारभार करीत होते. त्यांच्या अनुपस्थिती व दुर्लक्षामुळे अधीनस्थ प्रशासकीय वर्ग, कर्मचारी यांचा मनमानी कारभार चालत होता.

स्वच्छता विभागाचा अनागोंदि कारभार, भ्रष्टाचार याबाबत माहिती प्राप्त होताच निश्चितपणे सविस्तर लिखाण होऊन वाचा फोडली जाईलच. मौजे काळी कारंजा, शेरपूर, अलालपूर, बग्गी इत्यादी परिसराचा समावेश ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेत असल्याने विकासकामे शक्य नसल्यामुळे या भागाचा समावेश नगर परिषद, कारंजा (लाड) च्या हद्दीमध्ये ८ वर्षांपूर्वी करण्यात आला आहे. परंतु प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे हद्दवाढ परिसरातील बराच भाग विकासापासून वंचितच आहे. त्यामुळे येथील नागरिकांना आगीतून फुफाट्यात पडण्याचा अनुभव अनुभवयास मिळत आहे. महेश वाघमोडे हयांनी मुख्याधिकाऱ्याचा पदभार स्विकारल्यानंतर तरी प्रशासनाला शिस्त लागून कर्तव्याची जाणीव होईल. प्रशासनाच्या कृती व वर्तनात बदल होऊन सुप्रशासनाचा अनुभव कारंजेकरांना प्राप्त होईल, याप्रकारची अपेक्षा कारंजेकर नागरिक व्यक्त करीत आहे. शिंदे नगर मध्ये कचरागाडी, घंटागाडी न येण्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या उद्देशाने स्वच्छता निरीक्षक बनसोड साहेबांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला. परंतु बनसोड स्वच्छता निरीक्षक यांनी याविषयी बोलणे टाळले, कोणतेही प्रतिक्रिया दिली नाही. नगरपरिषद प्रशासन नागरिकांच्या मागणीनुसार कार्यवाही करते की नागरिकांच्या आंदोलनाला सामोरे जाते हे येणारा काळच सांगू शकेल.

## अंदुरा ॲग्रो प्रॉडक्ट कंपनीचा प्रश्न पुन्हा विधानसभेत गाजला

### आ. रणधीर सावरकरांचा विधानसभेत सरकारला जाब

■ प्रतिनिधी | अकोला ■

सन २०२४-२५ च्या हंगामात सोयाबीन खरेदीदरम्यान अंदुरा अग्रो प्रोड्युसर शेतकरी उत्पादक कंपनीने शासनाच्या नावाखाली तब्बल ६३ लाख ४४ हजार ९२४ रुपये रकमेची शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. यासंदर्भात तारांकित प्रश्न क्र. १०६४४ द्वारे आमदार रणधीर सावरकर यांनी विधानसभेत आवाज उठवला. त्यांनी सदर प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्याची आणि शेतकऱ्यांच्या खात्यावर थकित रक्कम तातडीने जमा करण्याची मागणी केली.

उरळ (ता. बाळापूर, जि. अकोला) येथे घडलेल्या या प्रकरणात अंदुरा ॲग्रो प्रॉडक्ट कंपनीने प्रत्यक्षात १९,७२३.९२ क्विंटल सोयाबीन खरेदी केल्याचे दाखवले. मात्र यातील १२९७ क्विंटल सोयाबीन वेअरहाऊसमध्ये न जमा करता केवळ पोर्टलवर खरेदीची नोंद घेण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना नाफेडमार्फत पैसे मिळाले नाहीत. कंपनीने वेअरहाऊसच्या १८,४४७.५५ क्विंटल पावत्या नाफेडकडे सादर



केल्या, मात्र प्रत्यक्षातील अपूर्ण प्रक्रिया व पोर्टलवरील चुकीची माहिती यामुळे हा प्रकार उघड झाला.

या फसवणुकीसंदर्भात उरळ पोलीस ठाण्यात संस्थेचे संचालक व इतर ११ जणांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अंदुरा कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आले असून, केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही खरेदी प्रक्रियेत सहभागी होण्यास बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय कंपनीची अनामत रक्कम जप्त करण्यात आली असून, उर्वरित रक्कम वसुलीसाठी न्यायालयात दावा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या मुद्द्यावर बोलताना पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सदर प्रकरणाची संपूर्ण माहिती सभागृहात सादर केली. मात्र, आमदार सावरकर यांनी या उत्तरावर समाधान व्यक्त न करता, संपूर्ण प्रक्रियेतील दोषींवर कठोर कारवाई करण्याची व याप्रकरणी तातडीने सर्व संबंधितांची बैठक घेण्याची आग्रही मागणी केली.शेतकरी, ग्रामस्थ व सामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील राहून सातत्याने न्यायासाठी लढणारे आमदार रणधीर सावरकर यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत हे प्रकरण विधानसभेत व विविध प्रशासकीय पातळीवर उपस्थित करत राहणार आहेत.

**दराडेची एसआयटी मार्फत चौकशीची मागणी**

सदर अंदुरा ॲग्रो प्रॉडक्ट कंपनीचा मालक प्रशांत दराडे हा मंत्रालयात शिक्षण विभागात दलाली करत असल्याचा धक्कादायक आरोप यावेळी आ. सावरकर यांनी सभागृहात केला. तर मालक प्रशांत दराडे याच्या या सर्व गोरख धंद्याची एसआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी आ. सावरकर यांनी सभागृहात केली.

## गोपाल दातकर यांचा अंतरिम जामीन कायम



■ उच्च न्यायालयाचा निर्णय
■ मजीप्रा अधिकाऱ्याला शिवीगाळ व खंडणी प्रकरणात दिलासा

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्रा) अधिकाऱ्याला भ्रमणध्वनीवरून शिवीगाळ व खंडणी मागितल्याच्या प्रकरणात अडचणीत आलेले शिवसेना (ठाकरे गट) जिल्हाप्रमुख तथा माजी जिल्हा परिषद सदस्य गोपाल दातकर यांना उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलासा दिला आहे. न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या खंडपीठाने त्यांना दिलेला अंतरिम अटकपूर्व जामीन ३० जून रोजी कायम ठेवण्यात आला आहे.

सदर प्रकरणात मजीप्राच्या अकोट येथील अधिकारी संजय आठवले यांच्याशी फोनवरून झालेल्या संभाषणात दातकर यांनी जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आणि खंडणी मागितल्याचा आरोप आहे. यावरून विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. अकोट येथील सत्र न्यायालयात २१ एप्रिल रोजी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता. यानंतर गोपाल दातकर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली. १३ मे रोजी न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला होता. त्यानंतर ३० जून रोजी झालेल्या सुनावणीत हा जामीन कायम ठेवण्यात आला.

कोर्टाने जामीनाच्या अटी घालून, दातकर यांना दर मंगळवारी संबंधित पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, तपास यंत्रणेला पूर्ण सहकार्य करण्याची अटही घालण्यात आली आहे. अर्जदाराच्या वतीने ॲड. आनंद राजन देशपांडे व ॲड.श्रीराम धैर्यवर्धन पुंडकर यांनी बाजू मांडली.

## अतिवृष्टीचे रखडलेले अनुदान खात्यात जमा होण्यास सुरुवात

■ प्रतिनिधी | अकोला ■

सन २०२४ मध्ये सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. शासनाच्या नियमांनुसार केवायसी व अंगठा लावूनही या नुकसानभरपाईचा निधी रखडलेला होता. या संदर्भात रयत शेतकरी संघटनेचे विदर्भ युवा अध्यक्ष पूर्णाजी खोडके यांनी २० जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून तातडीने मदत देण्याची मागणी केली होती, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता.

शासनाच्या दुर्लक्षामुळे मदतीची साईट बंद करण्यात आली होती, त्यामुळे हजारो शेतकरी मदतीपासून वंचित



**रयत शेतकरी संघटनेच्या मागणीला यश**

राहिले होते. मात्र, पूर्णाजी खोडके यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, जिल्हा प्रशासनाने त्यांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत मंत्रालयातील उपसचिवांना २४ जून रोजी पत्र पाठवले. या पत्राच्या आधारावर पावसाळी अधिवेशनात शासनाने दखल घेत रखडलेली मदत डीबीटी (Direct Benefit Transfer) प्रणालीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास सुरुवात केली आहे. या यशामुळे आनंदाचे वातावरण असून, रयत शेतकरी संघटनेचे पूर्णाजी खोडके, दीपक आढे व इतर सहकाऱ्यांचे शेतकरी बांधवांकडून अभिनंदन केले जात आहे.

'शासनाने साईट बंद केल्यानंतर देखील आम्ही आंदोलनाचा इशारा देत मागणी केली होती. अखेर आज पासून खात्यात अनुदान जमा होत आहे. हे यश माझे एकट्याचे नसून सर्व रयत शेतकरी संघटनेचे, सहकारी मित्रांचे व शेतकरी बांधवांचे आहे.'

**पूर्णाजी खोडके,** विदर्भ युवा अध्यक्ष, रयत शेतकरी संघटना

..............

**शेतकऱ्यांचा संताप ते समाधान :** 'मागील चार महिने केवायसी व अंगठा लावूनही काहीही झाले नाही. आज डीबीटीद्वारे पैसे खात्यात जमा झाल्याने दिलासा मिळाला आहे.'

**रघुनाथ खेडकर,** शेतकरी

## मुख्यमंत्री फडणवीस यांना समर्पित १०४० किमी सायकल प्रवास – नारायण व्यास

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येणाऱ्या २२ जुलै २०२५ रोजी, महाराष्ट्राचे यशस्वी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त, वाशिमचे सायकलपटू नारायण व्यास एक विशेष सायकल प्रवास करणार आहेत. वाशिम ते वाराणसी असा एकूण १०४० किमीचा हा सायकल प्रवास मुख्यमंत्री महोदयांना समर्पित असणार आहे.

प्रवास मार्ग: वाशिम – मंगरूळपीर – कारंजा – अमरावती – नागपूर – जबलपूर – रीवा – वाराणसीष्या प्रवासाची सुरुवात पाटणी चौक, वाशिम येथून सकाळी १० वाजता होईल. हा प्रवास किमान ४ दिवसात पूर्ण करण्याचा निर्धार नारायण व्यास यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या



यशस्वी आणि प्रेरणादायी नेतृत्वाने प्रभावित होऊन, नारायण व्यास यांनी त्यांना उज्ज्वल आणि निरोगी आयुष्याच्या शुभेच्छांसह हा सायकल प्रवास समर्पित करण्याचा निर्णय घेतला आहे. याआधीही नारायण व्यास यांनी भारतभर विविध लांब पल्ल्यांचे सायकल प्रवास करून आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, वाशिम जिल्ह्याचे नाव राष्ट्रपातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले आहे.

## संत गजानन महाराज मंदिरात प्रथमच होणार सुंदरकांड

**अकोला :** महानगरात गत २२ वर्षापासून मारुतीरायाचे सुंदरकांड सादर करून भक्ती भाव निर्माण करणाऱ्या माहेश्वरी सुंदरकांड समितीचे भव्य सामूहिक सुंदरकांड शेगाव येथील संत गजानन महाराज मंदिरात होणार आहे.संस्थानने प्रथमच अशा भक्तिमय उपक्रमाला संधी दिली असून यामुळे भक्तात उत्साह आहे.समितीच्या २३ व्या वर्षातील हा १२१४ वा सुंदरकांड सोहळा आहे. शनिवार दि ५ जुलै रोजी दुपारी १ वाजता शेगाव संस्थान मंदिर परिसरात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

## धर्मदाय आयुक्त कार्यालयाची ऑनलाइन प्रणाली सातत्याने बंद

### आ. वसंत खंडेलवाल यांनी सभागृहात उपस्थित केला प्रश्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील धर्मदाय आयुक्त कार्यालयाची ऑनलाइन प्रणाली सातत्याने बंद राहत असल्यामुळे जनतेला होणारा मनस्ताप लक्षात घेऊन आ. वसंत खंडेलवाल यांनी बुधवारी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा सभागृहात मांडला. या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तराद्वारे स्पष्टीकरण दिले.

आ. खंडेलवाल यांनी प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान सदर मुद्दा उपस्थित करताना म्हटले की, ऑनलाइन सिस्टीम बंद असल्यामुळे संबंधित कार्यालयातील कामकाज ठप्प होत असून, याचा परिणाम सर्वसामान्य जनतेवर होत आहे. मुख्यमंत्री ना. फडणवीस यांनी उत्तरात सांगितले की, धर्मदाय संघटनेच्या संकेतस्थळाची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन महा आयटी कंपनीमार्फत करण्यात येते. सदर संकेतस्थळ स्टेट



डेटा सेंटरच्या (एअ) सर्व्हरवर कार्यरत असून, दरमहा सुमारे ४०० ते ५०० जीबी डेटा स्टोरेजची गरज भासत आहे. मात्र, स्पेस उपलब्ध न झाल्यामुळे संकेतस्थळ तांत्रिक कारणांमुळे बंद पडले होते.

दरम्यान, स्टेट डेटा सेंटरने आता १५ टीबी स्पेस उपलब्ध करून दिली असून, संकेतस्थळ पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी महा आयटीकडून क्लाऊड सेवा घेण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे. नवीन सेवा पुरवठादार नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू असून, तांत्रिक प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

लवकरच आर्थिक प्रस्ताव प्राप्त होणार असून, त्यानंतर संकेतस्थळ पूर्णतः नवीन आणि आधुनिक स्वरूपात सुरु करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी लेखी उत्तरात दिले.

## अपुऱ्या कर्मचाऱ्यांचा ताण तहसील प्रशासनावर

### चारपैकी एकच नायब तहसीलदार कार्यरत



■ प्रतिनिधी | मानोरा ■

अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे अतिरिक्त ताण तहसील प्रशासनावर अधिक वाढलेला मागील काही महिण्यांपासून निदर्शनास येत आहे, ज्याचा फटका शहर व तालुक्यातील नागरिकांना सोसावा लागत असून तहसीलदारांपासून तर इतर कर्मचाऱ्यांवर वाढीव कामांचा बोजा पडूनही उपलब्ध कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन तालुक्याचा गाडा कार्यरत तहसीलदार डॉ.येवलीकर हाकत आहेत. मानोरा तहसील कार्यालयाला एका तहसीलदारासमवेत चार नायब तहसीलदारांची पदे मंजूर असून पैकी एक तहसीलदार आणि एक नायब तहसीलदार सध्या कार्यरत असून नायब तहसीलदारांची तब्बल तीन पदे रिक्त आहेत.

सर्व बाबतीत अनुशेष ग्रस्त असलेल्या मानोरा तहसील ला तहसीलदार म्हणून यायला शक्यतो कुठलाही अधिकारी तयार नसतो या तहसीलचा कार्यभार यापूर्वी प्रभारी अधिकाऱ्यांच्या माध्यमाने वर्षानुवर्षे चाललेला आहे असे असताना येथे तहसीलदार म्हणून लाभलेले डॉ. संतोष येवलीकर हे कुठलीही कुरबुर न करता चार पैकी एक नायब तहसीलदार आस्टूरे व एक सहाय्यक महसूल अधिकारी संदीप आडे यांच्या सहकार्याने अतिरिक्त कामाचा व्याप आपल्या खांद्यावर घेऊन तालुका महसूल प्रशासनाचा गाडा यशस्वी हाकीत आहेत.


मानोरा, ईंझोरी, कुपटा, शेंदुर्जना, गिरोली आणि उमरी या सहाही महसूल मंडळातील शेतकऱ्यांची शेती संबंधी वादाचे प्रकरणे असोत तसेच यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक असलेले दाखले यासाठी वाढलेली गर्दी असो अतिशय शांतपणे सर्वांची कामे वेळेत व्हावी त्यासाठी रात्री उशिरापर्यंत तहसीलदार उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने निकाली काढण्याचा मागील दीड वर्षांपासून प्रयत्न करीत असल्याचे पुढे येत आहे.

## बोगस बियाणांची सर्रास विक्री : कृषी विभागाचे दुर्लक्ष

**पातूर तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यात बोगस बियाण्यांची सर्रास विक्री सुरू असल्याचा प्रकार नुकताच समोर आला आहे. तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नसल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी बँक व खाजगी सावकारांकडून व्याजाने पैसे घेत बियाण्यांची खरेदी करून पिकांची पेरणी केली, मात्र बियाणे उगवलेच नसल्याने बोगस बियाणांची विक्री सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



विविध कंपन्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ अश्या फसव्या जाहिराती तसेच आमिष दाखवून शेतकऱ्यांची लुबाडणूक करीत असल्याचा आरोप यानिमित्ताने होत आहे. आधीच चार ते पाच वर्षा पासून अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदील झाला आहे. बँक व सावकाराकडून पिकांची पेरणीसाठी मागील वर्षी घेतलेल्या कर्जाची परतफेड सुद्धा झाली नाही, मात्र यंदाही मागील कर्जाची परतफेड करण्याच्या आश्वासनावर शेतकऱ्यांनी पुन्हा बँक व सावकाराकडून कर्ज काढून पिकांची पेरणी केली होती. परंतु बियाणे बोगस निघाल्याने शेतात उगवलेच नाही, त्यामुळे शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट आले आहे. हजारो रुपयांचे बियाणे व पेरणीसाठी लागणारा खर्च वाया गेला आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नसल्याच्या तक्रारी पोलीस व कृषी विभागाकडे केल्या परंतु संबंधितांकडून अद्याप दखल घेतली गेली नाही, परिणामी शेतकऱ्यांच्या पदरात निराशा पडली याकडे कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन बोगस बियाण्यांची विक्री करणाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी शेतकरी वर्ग करीत आहे.

**बोगस बियाण्यांच्या विक्रीवर अंकुश लावणार कोण ?**

पातुर तालुक्यामध्ये बोगस बियाण्यांची विक्री करून शेतकऱ्यांची सर्रास लूट सुरू असल्याची ओरड अनेक शेतकरी करीत आहे. मात्र बोगस बियाण्यांच्या विक्रीवर कुठल्याही प्रकाराचा पायबंद घालण्यासाठी ॲक्शन घेतल्या जात नसल्याचे विदारक वास्तव सुद्धा समोर येत आहे. परिणामी लुटीच्या सुरू असलेल्या या गोरख धंद्यावर अंकुश लावणार कोण असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

इनोव्हेज कंपनीचे सोयाबीन दोन बॅग शेतामध्ये पेरले होते. परंतु सोयाबीन उगवले नाही, संबंधित दुकानदार व कंपनीचे प्रतिनिधी यांच्याशी वारंवार संपर्क केला सर्व माहिती दिली परंतु त्यांच्याकडून कोणत्याच प्रकारची दखल घेण्यात येत नाही, उलट उडवा उडवीची उत्तरे मिळत आहे. दखल न घेतल्यास वरिष्ठाकडे रीतसर तक्रार करणार आहे.

**गोपाल राठोड,** शेतकरी सावरगाव

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २१८ ■ गुरुवार, ३ जुलै २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

## पुलाखाली आढळला ४५ वर्षीय व्यक्तींचा मृतदेह

**तळेगाव (श्या. पं.) :** नागपूर-अमरावती महामार्गावरील गावालगतच्या पुलाखाली मंगळवार २ जुलै रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान एका इसमाचा मृतदेह आढळून आला. सुधीर नागपूरकर (४५) रा. तांबा ता. देवळी असे मृतकाचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच तळेगाव पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. मिळालेल्या माहितीनुसार, सुधीर नागपूरकर हे सोमवारी सायंकाळी तळेगाव येथे बहिणीकडे आले होते. मंगळवारी दिवसभर मद्य प्राशन करून असल्याचे नागरिकांमध्ये चर्चा होती. दारूच्या नशेत त्यांचा तोल जाऊन पुलावरून खाली पडले असावे, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. सकाळी ११ वाजता पुलाच्या खाली मृतदेह पडून असल्याचे गुराख्याला आढळून आले. घटनेची माहिती तळेगाव पोलिसांना देण्यात आली.

# अंमलीपदार्थ तस्करीसंदर्भात 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा- मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** 'एनडीपीएस'अंतर्गत अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा गुन्हे केल्याचे सिद्ध झाल्यास आता संघटित गुन्हेगारीअंतर्गत त्यांच्यावर 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा या अधिवेशनातच केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.



विधान परिषद सदस्य डॉ.परिणय फुके, एकनाथ खडसे यांनी ड्रग तस्करी संदर्भात प्रश्न विचारला होता, त्यास मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र एनडीपीएस युनिट स्थापन करण्यात आले असून त्यात अधिकारी व अंमलदारांची नियुक्तीही केली आहे. जिल्हा स्तरावर समन्वय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहे. यात गेल्या दोन-अडीच वर्षांत मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या मदतीने आता राज्यस्तरीय आणि आंतरराज्यीय समन्वय अधिक प्रभावी झाला आहे. सर्व राज्यांमध्ये 'इंटेलिजन्स' शेअरिंग सुरू असून त्यामुळे तस्करांवर एकत्रितपणे कारवाई शक्य झाली असल्याचेही त्यांनी सांगितले. व्यसनमुक्तीसाठीची केंद्रे महत्त्वाची असून सध्या त्यांची संख्या आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी योग्य धोरण तयार करून दर्जेदार व्यसनमुक्ती केंद्रांची उभारणी केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. गांजाच्या शेतीवर बंदी असून ती मध्यप्रदेशातही कायदेशीर नाही, हे स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणाले की, गांजा, गुटखा किंवा तत्सम पदार्थांची तस्करी होत असल्यास त्या विरोधात कठोर कारवाई केली जाईल.

## सर्पदंशाने बैलाचा मृत्यू:ऐन शेतीच्या हंगामात शेतकऱ्याचे ६० हजाराचे नुकसान


**समुद्रपुर जनमाध्यम :** तालुक्यातील साखरा येथे गोठ्यात बांधून असलेल्या बैलाला सर्पदंश झाल्याने बैलाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना २ जुलै रोजी सकाळी ७ वाजता उघडकीस आली.यामुळे ऐन शेतीच्या हगांमात शेतकऱ्याचा ६० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

प्राप्त माहिती नुसार साखरा येथील शेतकरी नरेश अभिमान तामगाडगे यांनी १ जुलै रोजी दिवसभर कपासीची डवरणी करून सायंकाळी चारपाणी करून बैलजोडी गोठ्यात बांधून घराकडे निघून गेले सकाळी ७ वाजता बैल गोठ्या बाहेर काढण्यासाठी गेले असता त्यांना एक बैल मृतावस्थेत आढळून आला यावेळी त्यांनी चौकशी केली असता बैलाचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले.ऐन शेतीच्या हगांमात ६० हजार रुपये किमतीचा बैलाचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळले असुन आता नवीन बैल कुठून घ्यायचा व शेती कशी करायची असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. या नुकसानाची भरपाई शासनाकडून देण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे युवासेना उपतालुका प्रमुख संजय खोंडे यांनी केली आहे.



## मुलांना वाचन सक्तीचे करा.. प्रा. संजय बलविर

**विरूळ (आ) जनमाध्यम :** वाचाल तर वाचाल हा बाबासाहेबांचा मुलमंत्र सर्वांनी अंगीकाराला पाहिजे. वाचन हे जिवण आहे. वाचना मुळे अनेक पिढ्या घडल्या. मी आज एकाच शाळेत नौकरी करून सेवानिवृत्त होत आहे. फक्त माझी नविन विद्यार्थी व तरुणांना विनंती राहील. कोणतेही पुस्तक असो या वर्तमान पत्र असो. वाचन करा अशी कळकळीची विनंती मुलांना प्रा. संजय बलविर यांनी सत्कार सोहळ्यात केली. विरूळ आकाजी येथील मॉडेल हायस्कूल व जुनिअर कॉलेजच्या वतीने सेवानिवृत्ती निमित्त झालेल्या सेवापुर्ती समारंभात ज्येष्ठ प्रा. संजय बलविर यांचा विद्यालयाच्या वतीने सपत्नीक नागरिक सत्कार करण्यात आला, यांनी तब्बल तीस वर्षे सेवा देऊन अनेक पिढ्या घडवल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष शोभाताई काळे यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी प्राचार्य पी,एम मडवे, टी, बी राठोड, व्ही एम गिरी, डी के आढाऊ, तुषार वासनिक वंदना नागदिवे सारंग डुकरे संदीप इंगळे रोहिणी वाघ कृष्णा ठाकरे उपस्थित होते, अनेक शिक्षक प्राध्यापक यांची उपस्थिती होती



# लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला २५ वर्ष सश्रम कारावास

**वर्धा जनमाध्यम :** अल्पवयीन पीडितेला राहण्यासाठी आश्रय देत तिच्यावर जंगलात व घरामध्ये दोन महिने अत्याचार करीत तिच्यावर मातृत्व लादण्यात आले होते. याप्रकरणी हिंगणघाट न्यायालयाने २१ वर्षीय नराधम आरोपीला २५ वर्ष सश्रम कारावास व दीड लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहेत.



पीडिता ही समुद्रपूर तालुक्यातील असून, ती दहावीच्या वर्गात शिक्षण घेण्यासाठी समुद्रपूर येथे भाडेतत्त्वावर राहत होती.समुद्रपूर येथील आरोपी प्रणय शांताराम पाल वय (२१) याने पीडितेला राहण्यासाठी भाडेतत्त्वावर स्वतःचे घर दिले होते.त्यानंतर डिसेंबर २०२० ते जानेवारी २०२१ या दोन महिन्यांच्या कालावधीत पीडितेला घनदाट जंगलात ,भाडेतत्त्वावर दिलेल्या घरामध्ये व इतर ठिकाणी घेऊन जात अत्याचार करण्यात आला होता. त्यातून पीडिता गर्भवती झालेली होती.पीडिता गर्भवती असल्याचे लक्षात येताच,आरोपीने नकार दिल्यानंतर तिने गोंडस बाळाला जन्म दिला.अखेर पीडितेकडून २ सप्टेंबर २०२१ रोजी समुद्रपूर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध तक्रार नोंदविण्यात आली होती.पोलिसांनी सबळ पुरावे हस्तगत करीत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आणि आरोपीला ताब्यात घेत प्रकरण न्यायालयात दाखल केले होते.प्रकरण हिंगणघाट न्यायालयात पोहचल्यानंतर शासकीय अभियोक्ता दीपक एम वैद्य यांनी १८ साक्षीदारांची साक्ष नोंदवून घेतली.जिल्हा न्यायाधीश १ व अति सत्र न्यायाधीश हिंगणघाट श्रीमती वर्षा बी पारगांवकर यांनी २१ वर्षीय आरोपी तीन गुन्ह्यांतर्गत २५ वर्ष सश्रम कारावास व दीड लाख रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहेत.

## बहार नेचर फाउंडेशनच्या वर्धापन दिनी व्याख्यान

# कायद्यांमुळेच वाघ आणि त्यांचा अधिवास सुरक्षित-डॉ. वडतकर

**वर्धा जनमाध्यम -** या देशात व्याघ्र संवर्धनाचा पाया माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी रचला. त्यांच्या काळात झालेल्या कायद्यांमुळेच आजही वाघ आणि वाघांचा अधिवास सुरक्षित आहे. याच कायद्यांच्या आधारे पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांनी वेळोवेळी आवाज उठविला आणि अभयारण्ये वाचविली, असे प्रतिपादन महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेचे अध्यक्ष व अमरावती जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर यांनी बहार नेचर फाउंडेशनच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत केले.

स्थानिक निसर्ग सेवा समितीच्या ऑक्सिजन पार्क येथे आयोजित या कार्यक्रमात डॉ. वडतकर यांनी 'वाघांचे संवर्धन आणि सद्यःस्थिती' या विषयाची अभ्यासपूर्ण सचित्र मांडणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहार नेचर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. बाबाजी घेवडे होते. यावेळी जिल्हा उपवनसंरक्षक हरवीर सिंह, निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष वृक्षमित्र मुरलीधर बेलखोडे, जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक तथा बहारचे उपाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर, संस्थापक अध्यक्ष प्रा. किशोर वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



स्वातंत्र्योत्तर काळात वने आणि वन्यजीव यांच्या संरक्षणासाठी झालेल्या वाटचालीचा मागोवा घेताना डॉ. जयंत वडतकर म्हणाले, एकीकडे संविधानाची निर्मिती होत असतानाच १९५२ मध्ये वन्यजीव मंडळाची स्थापना करण्यात आली होती. या मंडळाचे अधिकारक्षेत्र व्यापक करण्यासाठी १९७२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वन्यजीव संरक्षण कायदा लागू केला. त्यांच्याच कारकिर्दीत १९७३ साली जिम कार्बेट हा पहिला व्याघ्र प्रकल्प देशात कार्यान्वित झाला. खाण व्यावसायिकांनी जाणीवपूर्वक अभयारण्यातील वाघ संपवले. कारण वाघ संपले तर वनांचा संरक्षित दर्जा काढला जाईल आणि आपल्या खाणींचा विस्तार करता येईल, ही भांडवलदारी भूमिका त्यामागे असते. जागृत कार्यकर्त्यांमुळे २००९ मध्ये पन्ना व्याघ्र प्रकल्पात पुन्हा वाघ आणि वाघांचा अधिवास वाढला. पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांनी उठवलेला आवाज आणि सरकारने उचललेली सकारात्मक पावले, यामुळे हे कार्य आजतागायत होऊ शकले, डॉ. वडतकर यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबाजी घेवडे यांनी बहारच्या दहा वर्षातील वाटचालीचा मागोवा घेतला. मुरलीधर बेलखोडे यांनी यावेळी वृक्षांचे महत्त्व प्रतिपादित केले. तर, उपवनसंरक्षक हरवीर सिंह यांनी मानव वन्यजीव संघर्ष आणि वनकायद्यांमध्ये झालेल्या नव्या प्रगत सुधारणांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय इंगळे तिगावकर यांनी केले. अतिथींचा परिचय जीवशास्त्रज्ञ दर्शन दुधाने यांनी करून दिला. संचालन बहारचे सचिव जयंत सबाने यांनी केले व उपाध्यक्ष दीपक गुढेकर यांनी आभार मानले. व्याख्यानापूर्वी अतिथींच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करून अरण्यऋषी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या आयोजनात बहारचे कोषाध्यक्ष राजदीप राठोड, सहसचिव देवर्षी बोबडे, डॉ. आरती प्रांजळे घुसे, सल्लागार अतुल शर्मा यांच्यासह वनविभागातील अधिकारी व कर्मचारी वृंदाचे सहकार्य लाभले. निसर्गरम्य परिसरात आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सुजाण नागरिकांची व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्यासोबत जिल्ह्यातील विविध विषयावर सकारात्मक बैठक

## -आमदार राजेश बकाने आणि कामगार नेते उमेश अग्निहोत्री बैठकीला उपस्थिती

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या समस्या आणि इतर विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आमदार राजेश बकाने व स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांच्या पुढाकाराने ही बैठक कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.



या बैठकीत वर्धा जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक त्रुटी, जिल्हा कार्यालयांच्या कार्यक्षमतेचा अभाव, थकीत लाभ वितरण यासह जिल्ह्यातील इतर सर्व महत्त्वाच्या विषयांवर देखील सविस्तर चर्चा करण्यात आली.

आ. राजेश बकाने यांनी यावेळी सांगितले की, वर्धा जिल्ह्यातील विकासासाठी आणि सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी आपण नेहमी सक्रिय राहणार असून कामगारांच्या प्रश्नांसह इतरही विषय शासन दरबारी प्रभावीपणे मांडत आहोत.

कामगार नेते उमेश अग्निहोत्री यांनी जिल्ह्यातील कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात भूमिका मांडत सांगितले की फक्त योजनांची घोषणा पुरेशी नाही, ती गरजू कामगारांपर्यंत पोहोचली पाहिजे. यासाठी मंडळाच्या कार्यपद्धतीत बदल करणे अत्यंत आवश्यक आहे.

> कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ कार्यवाहीचे आश्वासन दिले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हास्तरावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.
>
> **उमेश अग्निहोत्री,** संस्थापक अध्यक्ष
> स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटना, वर्धा

# जिल्ह्यात ९० दिवस राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष मोहिम

**वर्धा जनमाध्यम :** न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा जलद निकाल, न्यायप्रक्रियेवरील ताण कमी करणे व पक्षकारांना परस्पर समजुतीने न्याय मिळवून देण्यासाठी जिल्ह्यात दि.१ जुलै पासुन ९० दिवस राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष मध्यस्थी मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा न्यायालयामध्ये ज्या पक्षकारांचे प्रकरण प्रलंबित आहेत, त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारुका यांनी केले आहे.

राष्ट्रासाठी मध्यस्थी या विशेष मध्यस्थी मोहिमेची संकल्पना राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व सर्वोच्च न्यायालयाच्या मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीने संयुक्तपणे केली आहे. सरन्यायाधीश भुषण गवई व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष तथा मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती सुर्यकांत यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहिम संपूर्ण भारतात राबविण्यात येत आहे.

जिल्ह्यात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा न्यायिक जिल्हा राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मध्यस्थी मोहिम दि.१ जुलैपासून प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. मोहिमेमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेले वैवाहीक वाद, अपघात भरपाई प्रकरणे, कौटूंबिक हिंसाचार प्रकरणे, धनादेश न भरण्याचे प्रकरणे, व्यावसायिक वाद प्रकरणे, सेवाविषयक वाद प्रकरणे, तडजोड पात्र फौजदारी प्रकरणे, ग्राहक तक्रार मंचाकडील प्रकरणे, कर्ज वसुली प्रकरणे, जमीन मालमत्ता वाटप प्रकरणे, घरमालक व भाडेकरु वाद प्रकरणे, जमीन संपादन प्रकरणे तसेच इतर नागरी प्रकरणे मध्यस्थीसाठी ठेवले जावू शकतात.

विशेष मध्यस्थी मोहिम दररोज पक्षकारांच्या सोयीनुसार होणार असून ऑनलाईन, ऑफलाईन व हायब्रिड पध्दतीचा वापर करुन केली जाणार आहे. या मध्यस्थी प्रक्रियेमध्ये ४० तास प्रशिक्षण घेतलेले सर्व मध्यस्थी सहभागी होणार आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# डॉ.के.बी.हेडगेवार कॉलेजला मिळाला न्यायालयाचा दिलासा

**वर्धा जनमाध्यम :** उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिकेवर न्या. अविनाश घारोटे व न्या. मंत्री यांच्या खंडपीठाने डॉ. के. बी. हेडगेवार कॉलेजच्या बाजूने निर्णय देत सर्व विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे.

सत्र २०२०-२१ मध्ये जीएनएम अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता डॉ. के. बी. हेडगेवार नर्सिंग कॉलेज, वर्धा यांच्यामार्फत याचीका दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये विद्यार्थी प्रवेश करण्याबाबत उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले होते व त्यानुसार २०२०-२१ व २०२१-२२ या सत्रामध्ये कॉलेजने विद्यार्थी प्रवेशित केले. परंतु अंतिम परीक्षेमध्ये परीक्षा प्रवेशपत्र उशिरा आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गैरसमज निर्माण झाला होता. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना २०२०-२१ व २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ पर्यंत प्रत्येक वर्षाच्या परीक्षा न्यायालयाच्या आदेशानुसार दिल्या व त्या सर्व विद्यार्थ्यांचे मार्कशिट, पासिंग सर्टीफिकेट प्राप्त झाले.

त्याबाबत उच्च न्यायालयाने सुद्धा विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवू नका व मार्कशिट देण्याबाबत नर्सिंग मंडळाला आदेशित केले होते. मागील चार वर्षांपासून प्रलंबित असलेले न्यायप्रविष्ठ प्रकरण हे २५ एप्रिल २०२५ ला अंतिम सुनावणीवर येऊन विद्यार्थी व कॉलेजच्या बाजूने निकाल दिला. त्यामुळे ते सर्व विद्यार्थी नियमित करुन घेण्यात आले. प्रकरणी शासनामार्फत ॲड. अक्षय नाईक (सिनियर कौन्सील) यांनी बाजू मांडली तर नर्सिंग मंडळामार्फत ॲड. केने तसेच हेडगेवार नर्सिंग कॉलेजमार्फत ॲड. अमित चौबे यांनी आपली बाजू मांडली.

> **न्यायापालिकेवर पक्का विश्वास**
>
> न्यायपालिकेबाबत माझ्या मनात पक्का विश्वास झाला असून, सत्य हे सत्यच असते. उशिरा का होईना न्यायालयाने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ दिले नाही. त्यामुळे न्यायालयाचे मनापासून आभार व्यक्त केले,
>
> **अमोल अजयकुमार श्रीवास्तव**
> डॉ के बी हेडगेवार पर्यायी शिक्षा मंडळ

# सौर कृषी पंपाच्या समस्या, मोबाईलवरून तक्रारीची सुविधा

**वर्धा जनमाध्यम :** राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळविणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळविणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे. सौर ऊर्जा संच काम करत नसणे, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

# बोरगाव मेघे येथील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप

## -अंबिका सोशल फाऊंडेशन चा स्तुत्य उपक्रम

**वर्धा जनमाध्यम :** अंबिका सोशल फाऊंडेशनच्या वतीने जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील दुर्बल घटकातील तसेच आर्थिक स्थिती बेताची असलेल्या गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण घेण्यासाठी साहित्य खरेदी करणे अवघड असते.त्यांना मदतीचा हात म्हणून अंबिका सोशल फाऊंडेशन च्या वतीने बोरगाव मेघे येथील कै. आनंदराव मेघे विद्यालय , जिल्हा परिषद केंद्र शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, ग्जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य नोटबुक पेन, कंपास चे वाटप करण्यात आले.



यावेळी शाळेचे मुख्याध्यापक संजय भस्मे, मुख्याध्यापक, पराते, मुख्याध्यापिका शारदा मोटकुळे , मुख्याध्यापक श्री.नगराळे, यांच्यासह अंबिका हिंगमिरे, कांचन सुखदेवे, रुपाली केळझरकर, यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

समाजासाठी काही देणं लागत वाढत्या महागाईमुळे हातमजुरी करणारे पालक मुलांसाठी पूर्ण शिक्षणिक साहित्य खरेदी करू शकत नाही.त्यामुळे गोर गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य नोटबुक पेन कंपास देऊन छोटीशी मदत करण्याचा प्रयत्न केला. अशी प्रतिक्रिया अंबिका हिंगमिरे यांनी दिली.

# थ्रस्ट सेक्टर व उच्च तंत्रज्ञानाधारित उद्योगांच्या १ लाख ३५ हजार ३७१ कोटी रुपये गुंतवणुकीच्या प्रस्तावांना मंजुरी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## तांत्रिक नवकल्पना, संशोधन, विकास व रोजगार निर्मितीला चालना मिळणार

**मुंबई/प्रतिनिधी : :** राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी आज उद्योग विभागाच्या मंत्रीमंडळ उपसमितीने राज्यातील थ्रस्ट सेक्टर व उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांच्या एक लाख ३५ हजार ३७१ कोटी ५८ लाख (१,३५,३७१.५८ कोटी) रुपयांच्या प्रस्तावांना मान्यता दिली. यामुळे राज्यात सुमारे १ लाख प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन, विकास व रोजगार निर्मितीला चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

उद्योग विभागातंर्गत विशाल व अतिविशाल प्रकल्पांना सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत व थ्रस्ट सेक्टरच्या धोरणांतर्गत प्रोत्साहने मंजूर करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची १२ वी बैठक आज विधानभवनातील मंत्रिमंडळ समिती सभागृहात झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव ए शैला, उद्योग विभागाचे सचिव पी अन्बलगन, विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह, औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, आदी उपस्थित होते.



बैठकीमध्ये एकूण १९ मोठे, विशाल व अतिविशाल प्रकल्पांना प्रकल्पातील गुंतवणूक व रोजगारनिर्मिती विचारात घेऊन त्यांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. त्यापैकी १७ प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पांमध्ये सेमीकंडक्टर, सिलीकॉन, इग्नॉट आणि वेफर्स, सेल आणि मॉडयुल, इलेक्ट्रीक वाहनांची साहित्यनिर्मिती, लिथियम आर्यन बॅटरी, अवकाश व संरक्षण साहित्य निर्मिती, वस्त्रोद्योग, हरित स्टील प्रकल्प, ग्रीन फिल्ड गॅस टू केमिकल इ. उत्पादनांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांचा समावेश आहे. या १७ प्रकल्पांमधून रूपये १,३५,३७१.५८ कोटी एवढी नवीन गुंतवणुक राज्यात येत असून, त्याद्वारे राज्यात आगामी कालावधीत अंदाजे एकूण १ लाख एवढी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे.

यामध्ये उद्योगांना भांडवली अनुदान, वीज दर सवलत, व्याजदर सवलत, औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, स्वामित्व धन परतावा, राज्य कर्मचारी भविष्य निर्वाह निधी परताव्यामध्ये सवलत, कर्मचारी प्रॉव्हिडंट फंड परतावा आदी सवलती देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. याशिवाय थ्रस्ट सेक्टर व उच्च तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांची संख्या २२ वरून ३० पर्यंत वाढविणे, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी पालघर जिल्ह्यातील दापचारी व वंकास येथील जमिन संपादन करून वाटप करणे, तसेच 'कोल गॅसिफिकेशन आणि डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटीज' या उत्पादनाचा समावेश दि.२२.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये करून त्यांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यास मान्यता देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

आज मंजुरी दिलेल्या प्रस्तावांमध्ये नवी मुंबईतील पारस डिफेन्स अँड स्पेस टेक्नॉलॉजी, नागपूरमधील ज्युपिटर रिन्यूएबल प्रा.लि., रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, मे. बीएसएल सोलार प्रा.लि, मे. श्रेम बायो फ्यूएल .लि., पुण्यातील ह्युंदाई मोटार इंडिया, युनो मिंडा अँटो इनोव्हेशन प्रा.लि, एअर लिक्विड इंडिया होल्डिंग प्रा. लिं., रायगडमधील एस्सार एक्सप्लोरेशन अँड प्रोडक्शन लि., बालासोर अलॉयज लि, गडचिरोलीतील सुरजागड इस्पात प्रा.लि., सुफलाम इंडस्ट्रीज लि, सुफलाम मेटल प्रा.लि. किर्तीसागर मेटालॉय प्रा.लि., नंदूरबारमधील मे. जनरल पॉलिफिल्मस प्रा.लि, छत्रपती संभाजी नगरमधील एनपीएसपीएल अडव्हान्सड मटेरियल्स प्रा.लि, गोंदियातील सुफलाम इंडस्ट्रिज लि., साताऱ्यातील मे. वर्धन अँग्रो प्रोसेसिंग लि, सोलापूरमधील मे. आवताडे स्पिनर्स प्रा. लि या कंपन्यांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकासाला चालना मिळून एक मजबूत स्थानिक पुरवठा साखळी विकसित होऊन सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना त्याचा फायदा होणार आहे. राज्यात या प्रकल्पामुळे सेमी कंडक्टर, स्टील प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक व रोजगार उपलब्ध होणार आहे. त्याचा फायदा स्थानिक अर्थव्यवस्था व एकत्रितपणे राज्याच्या विकासाला होऊन तांत्रिक नवकल्पना संशोधन आणि विकासाला चालना मिळेल. तसेच रोजगार क्षमता व उद्योन्मुख तंत्रज्ञानातील कौशल्य वाढण्यास मदत होईल.

# नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी -फडणवीस

## कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी विभागीय कामाचे रँकीग, नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** गुन्ह्यांच्या तपासात गतिमानता आणण्यासाठी नवीन फौजदारी कायदे उपयुक्त आहेत. या कायद्यांअंतर्गत डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर अपेक्षित असून न्याय प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक अधिसूचना व आदेश जारी करून कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच राज्यात नवीन फौजदारी संहिता कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभागनिहाय कामाचे रँकिंग करण्याच्या सूचनाही दिल्या.

विधानभवन येथे नवीन फौजदारी संहिता कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत आढावा घेताना मुख्यमंत्री श्री फडणवीस बोलत होते. बैठकीला गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नवीन फौजदारी संहिता कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. न्यायवैद्यक विभागाने गुन्हे सिध्दतेसाठी पुराव्यांच्या करण्यात येणाऱ्या चाचण्या वेळेत कराव्यात. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहेत. रिक्त पदे भरली असून आणखी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास मागणी करावी. सुविधा व नागरिक केंद्रित सेवा यामध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर आघाडीवर असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पोलिस दलाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातील पोलीस अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षणांचे नियमित अंतराने आयोजन करण्यात यावे. मास्टर ट्रेनर्स तयार करून न्यायालयीन अधिकारी, कारागृह कर्मचारी, फॉरेन्सिक वकिलांसाठीही प्रशिक्षण देण्यात यावे. ऑनलाईन 'एफआयआर' प्रणालीवर नागरिक सहजपणे तक्रार नोंदवू शकतील याबाबत काम करावे. ई साक्ष ॲप, सीसीटीएनएस प्रणाली याचा उपयोग वाढविण्यात यावा. गुन्हे सिद्धता वाढण्यासाठी ई न्यायालय प्रणाली सक्षम करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. महिलांसंदर्भातील गुन्ह्यांचा तपास जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी. विशेषतः छेडछाड व अत्याचाराच्या प्रकरणांचा तपास जलदगतीने पूर्ण करावा. आरोपपत्र लवकर दाखल करण्यासाठी कार्यवाही होणे गरजेचे आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.बैठकीस मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) राधिका रस्तोगी, प्रधान सचिव (कायदा व सुव्यवस्था) अनुप कुमार सिंह, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, महासंचालक (न्यायवैद्यक) संजय कुमार वर्मा, अपर पोलीस महासंचालक (कारागृह) सुहास वारके यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# गडहिंग्लज येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी - उपमुख्यमंत्री पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहरामध्ये मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन विभागाची ३.०६ एकर जागा आहे. त्यापैकी ०.७५ हे.आर. जागा पशुसंवर्धन विभागाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी तसेच पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेनुसार नवीन तालुका पशुसंवर्धन व दुग्धविकास उपायुक्त या कार्यालयासाठी स्वतंत्र मजला प्रस्तावित बांधकामांमध्ये समाविष्ट करावा, उर्वरित जागा पशुसंवर्धन विभागाकडे ठेवावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील त्यांच्या समिती कक्षात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार आशुतोष काळे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सचिव रामास्वामी ए., पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (दूरदृश्य प्रणालीद्वारे) व अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज हे उपविभागीय कार्यालय असलेले शहर आहे. या ठिकाणी प्रांत कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, सहकार, कृषी इत्यादी कार्यालय आहेत आणि ती सर्व भाड्याच्या जागेत आहेत. आता पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्यामुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कार्यालयासाठी एकत्र प्रशासकीय इमारत बांधणे शक्य होणार आहे. त्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

# महिला भक्तांसोबत नाचायचा, अंग चोळून आंघोळ अन् शरीरसंबंध; भोंदूबाबा प्रसादचे हायटेक कारनामे

**पुणे/प्रतिनिधी** पुण्यातील भोंदूबाबाच्या कारनाम्यामुळे गेल्या काही दिवसांपासून खळबळ उडाली आहे. मोबाईलमधील छुप्या ॲपच्या माध्यमातून भक्तांवर नजर ठेवणारा आणि मोबाईल कॅमेऱ्यातून खाजगी क्षण बघणाऱ्या भोंदू बाबाला बावधन पोलिसांनी अटक केली आहे. प्रसाद उर्फ दादा भीमराव तामदार असं अटक केलेल्या भोंदूबाबचं नाव आहे. या भोंदूबाबाचे आता सर्व हायटेक कारनामे समोर येत आहे.

भक्तांच्या मोबाईलमध्ये छुप्या पद्धतीने ॲप डाउनलोड करून त्यांना अश्लील कृत्ये करायला लावणारा प्रसाद बाबा उर्फ प्रसाद तामदार हा समलैंगिक असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. या प्रसाद बाबाचे महिला भक्तांसोबत नाचताना त्यांच्यासोबत मठात वार्तालाप करतानाचे अनेक व्हिडीओ त्याच्या सोशल मीडियावरील अकाउंटला पाहायला मिळतायत. त्यामुळे त्याच्याकडून शोषण झालेल्या पीडितांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. पोलिसांनी अशा पीडितांना समोर येऊन तक्रार दाखल करण्याचं आवाहन केलंय. पुरुष भक्ताचे अंग चोळून त्याला अंघोळ घालणारा प्रसाद बाबा उर्फ प्रसाद तामदारच प्रस्थ गेल्या काही वर्षांत पुणे आणि परिसरात वाढलं होते. इंस्टाग्रामवर या बाबाचे दीड लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत.

**नेमकं प्रकरण काय?**

प्रसादचे वडील भीमराव दातीरने दिव्य साक्षात्कार झाल्याचा दावा करत हा मठ काही वर्षांपूर्वी सुरु केला. पुढे सी ए पर्यंतच शिक्षण झाल्याचा दावा करणारा प्रसादने २०२२ मध्ये स्वतः या मठात बाबा बनण्याचा निर्णय घेतला . मात्र, त्याचा हा निर्णय भक्तांकडून पैसे उकळण्याबरोबरच त्यांच्याशी



समलैंगिक संबंध प्रस्थापित करता यावेत यासाठी होता. त्यासाठी प्रसाद बाबा त्याच्या मठात आलेल्या भक्तांचे मोबाईल फोन मागून घ्यायचा. ग्रहदोष असल्याने मोबाईलमध्ये कंपास ॲप डाउनलोड करावं लागेल असं कारण तो द्यायचा. मात्र ते ॲप डाउनलोड करताना तो एअर ड्रॉइड कीड हे आणखी एक ॲप चोरून डाउनलोड करायचा. पालकांना आपल्या मुलांवर आणि त्यांच्या मोबाईल एक्टिव्हीटीवर नजर ठेवता यावी यासाठी या एअर ड्रॉइड कीड या एपची निर्मिती करण्यात आलीय. या ॲपमुळे भक्ताच्या संपूर्ण मोबाईलचा एक्सेस प्रसाद बाबाला मिळायचा. भक्ताच्या मोबाईलमधील कॅमेरातून दिसणारी सगळी माहिती तो गोळा करायचा आणि त्याचा उपयोग भक्ताला प्रभावित करण्यासाठी करायचा. आपण आज कोणत्या रंगाचे कपडे घातले आहेत आणि आज आपण कुठे कुठे गेलो होतो हे सर्व प्रसाद बाबाला दिव्य साक्षात्कार झाला असल्याने समजल्याच भक्तांना वाटायचं आणि त्यांचा प्रसाद बाबावरचा विश्वास आणखीनच दृढ व्हायचा, अशी माहिती समोर आली आहे.

**भक्त झोपी गेला की प्रसाद बाबा लैंगिक चाळे सुरु करायचा-**

प्रसाद बाबा विश्वास संपादन केलेल्या तरुण भक्तांना सलग दोन दिवस केवळ तीन तास झोप घेण्याचा सल्ला द्यायचा. त्यानंतर त्या भक्ताला या मठात बोलावून पुढच्या अघोरी विद्येच्या क्रिया करण्यासाठी सर्व कपडे काढून फक्त शाल पांघरून झोपायला सांगायचा. सलग दोन दिवस झोप न मिळाल्याने तो भक्त झोपी गेला की प्रसाद बाबा त्याच्यासोबत लैंगिक चाळे सुरु करायचा आणि तो भक्त जागा झाल्यावर तुझ्या सगळ्या समस्या माझ्याकडे घेतो आहे, असं सांगत त्या भक्ताला लैंगिक संबंध ठेवायला भाग पडायचा, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.

# १६ वर्षीय विद्यार्थ्याला दारू पाजून शिक्षिकेचा अत्याचार

मुंबई : राजधानी मुंबई (शर्ल्स) ही क्राइम कॅपिटलही होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दररोज गुन्ह्यांची वेगवेगळी मालिकाच या शहरात सुरू आहे. त्यामध्ये, शाळेत घडणाऱ्या घटनाही चर्चेत आहेत. आता,



येथील एका नामांकित इंग्रजी शाळेतील शिक्षिकेला (ऊॅम्पि)अल्पवयीन विद्यार्थ्याशी शारीरिक संबंध ठेवल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असून शिक्षिकेने विद्यार्थ्याचे अनेकवेळा लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याशिवाय, ती शिक्षिका विद्यार्थ्याला दारू पाजायची, आणि पंचतारांकित हॉटेलमध्ये घेऊन जायची. या हॉटेलमध्येच (प्दूात) याचे लैंगिक शोषण करायची, अशी धक्कादायक माहिती पोलीस तपासातून समोर आली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, महिला शिक्षिकेडून एका १६ वर्षीय विद्यार्थ्यावर १ वर्षापेक्षा अधिक काळ लैंगिक अत्याचार सुरू होता. विद्यार्थ्याच्या कुटुंबीयास मुलाच्या वागण्यातील बदल दिसून आल्यानंतर त्याच्याकडे विचारणा केली असता ही धक्कादायक बाब समोर आली. मुलाने आपल्या आई-वडिलांसमोर लैंगिक अत्याचाराबद्दलची माहिती उघडपणे बोलून दाखवली. मात्र, तरीही हे कुटुंब गप्प राहिले. इयत्ता १० वीचे वर्षे संपायला काहीच महिने शिल्लक असल्याने कुटुंबीयांनी ही बाब लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला. शाळेतून बाहेर पडल्यानंतर तरी संबंधित शिक्षिका आपल्या मुलाचा पाठलाग थांबवेल, असा त्यांचा अंदाज होता. मात्र, १० वी बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतरही ती शिक्षिका त्याला सोडत नव्हती. शिक्षिकेने घरकाम करणाऱ्या महिलेच्या माध्यमातून पुन्हा त्या मुलाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा हे प्रकरण पुन्हा वाढले. शिक्षिकेने, भेटायचे आहे असा मेसेज मुलासाठी पाठवला. त्यानंतर, 'कुटुंबाने आमच्याकडे येऊन गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला,' अशी माहिती पोलिसांनी दिली.

# बालसुधारगृहातील मुलींचे पलायन प्रकरण; चौकशीसाठी समिती गठीत

## - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी** छत्रपती संभाजीनगर शहरातील एका बालसुधारगृहातील नऊ मुलींनी गच्चीवरून उड्या मारून पलायन केल्याची घटना ३० जून २०२५ रोजी घडली. या प्रकरणी चौकशीसाठी समिती गठीत करण्यात आली असून समितीचा अहवाल सात दिवसात येणार असून हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल, असे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.विधान परिषदेत उपस्थित करण्यात आलेल्या औचित्य च्या मुद्द्यावर निवेदन करताना मंत्री तटकरे बोलत होत्या.मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, या घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बालकल्याण समिती व इतर



अधिकाऱ्यांनी १ जुलै रोजी संस्थेला भेट देत चौकशी केली. तीन मुलींनी निवास कक्षात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर आक्षेप घेत गोंधळ घातला होता. त्यानंतर बालगृहातील नऊ मुलींनी पलायनाचा प्रयत्न केला.

या प्रकारानंतर सात मुलींना पोलीस व दामिनी पथकाच्या मदतीने ताब्यात घेतले, दोन मुली पळून गेल्या होत्या. त्यापैकी एक मुलगी सापडली असून एक मुलगी अद्यापही फरार आहे. पाच मुलींना पालकांच्या ताब्यात देण्यात आले असून, इतर तीन मुलींना इतर बालगृहात स्थलांतरित करण्यात आले आहे. संस्थेतील अधीक्षक बदलण्यात आला असून, बालगृह व्यवस्थापन व बालकल्याण समितीस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. उपायुक्त बालविकास यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे, असे मंत्री तटकरे यांनी सांगितले .

# राज्यातील शाळांमध्ये कमी पटसंख्या असूनही शाळा बंद नाही - शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी** राज्यातील काही भागांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या घटल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत असून, त्या शिक्षकांचे योग्य समायोजन करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली. विद्यार्थी संख्या कमी झाली तरी कुठलीही शाळा बंद केली जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. तसेच शासनाने कोणतीही शाळा बंद केली नसल्याची माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.विधानपरिषद सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे आणि राज्यमंत्री श्री. भोयर बोलत होते. यावेळी सदस्य जयंत आसगावकर, ज. मो. अभ्यंकर, अमोल मिटकरी, अभिजित वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला. राज्यात सध्या एकूण १ लाख ८ हजार शाळा आहेत. त्यापैकी सुमारे १८,००० शाळांमध्ये पटसंख्या २० पेक्षा कमी आहे. तरीसुद्धा, त्या शाळा सुरूच राहतील व त्या ठिकाणी शिक्षणात अडथळा येणार नाही,



याची संपूर्ण काळजी घेतली जाईल. शिक्षकांची कार्यमुक्तता ही समायोजनानंतरच केली जाईल. केंद्र सरकारने सादर केलेल्या अहवालात राज्यातील १,६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा तर ६,५५३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध नाहीत, असे नमूद करण्यात आले आहे. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार, अशा वस्ती किंवा गावांमध्ये शाळा सुरू करणे ही राज्य शासनाची व स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. आदिवासी भागांत वस्तीगृहांची उभारणी, शिक्षण सुविधांपासून वंचित भागांत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व धरती आबा ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत ४७ वस्तीगृहे उभारण्यात आली असून सुमारे ४,७०० विद्यार्थ्यांना राहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# गोंधळात गोंधळ

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही. शेतकऱ्यांबद्दल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केले होते. या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? 'खाली डोकं वर पाय...' माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे. लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांला लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकार्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते. विधानसभेचे २८८ आमदार आहेत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराला आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याची संधी विधानसभेत मिळायला हवी असते; परंतु असे गोंधळ होत राहिले तर, आमदारांना जनतेच्या समस्यांवर प्रश्न विचारण्याची संधी कशी मिळेल? याचा अन्य सदस्यांनी विचार करायला हवा. आजचे उदाहरण घेऊ या... नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या दालनांपर्यंत जाऊन गोंधळ घालण्याची खरंच गरज होती का? विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले. 'नेमेचि येतो पावसाळा' याप्रमाणे विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदाराने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

# पावसाळी अधिवेशनात 'या' प्रश्नांवर चर्चा हवीच!

**सत्ताधारी आणि विरोधक जनकल्याणाऐवजी सत्ताकारणातच मश्गुल असल्यामुळे अधिवेशनात जनतेचे प्रश्न चर्चिले जातच नाहीत. सर्वसामान्यांना कोणते प्रश्न महत्त्वाचे वाटतात, याविषयी...**

विधानसभेचे अधिवेशन म्हणजे जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे हक्काचे ठिकाण, पण खेदाची गोष्ट अशी की अलीकडे अधिवेशनांत प्रश्नांना वाचा फोडणे दुर्मीळच होऊ लागले आहे. सत्ताप्राप्तीसाठी वाटेल ते करण्याची तयारी, कुरघोडीचे राजकारण, अभ्यासू - संवेदनशील लोकप्रतिनिधींची वानवा, मतदारांप्रती आस्थेचा दुष्काळ, मतदारांना गृहीत धरण्याकडे वाढणारा कल अशा राजकीय संस्कृतीचा उदय झाल्यामुळे गेल्या दशकात विधिमंडळाचे अधिवेशन म्हणजे बहिष्कार, आरडाओरड, दांभिकता, जनहिताशी दुरान्वये संबंध नसणाऱ्या गोष्टींना प्राधान्य देण्यात धन्यता मानण्याकडे लोकप्रतिनिधींचा वाढणारा कल, आरोप -प्रत्यारोपाच्या निरंतर चालणाऱ्या मालिका याचा राजकीय पक्षात शिरकाव झाल्याने अधिवेशन जनतेच्या दृष्टीने अर्थशून्य ठरताना दिसते.

प्रत्येक अधिवेशनापूर्वी एखादा भावनिक मुद्दा समोर येतो वा आणला जातो. मग त्याच मुद्याच्या अनुषंगाने अधिवेशनात बहिष्कार, गोंधळ, पायऱ्यांवर आंदोलने, आमदारांची निलंबने, त्यावरून पुन्हा गोंधळ हेच सुरू राहते आणि त्यातच अधिवेशन संपते. जनतेचे प्रश्न अनुत्तरित राहतात. समस्या दुर्लक्षित राहतात. अधिवेशनाबाबत सत्ताधारी आणि विरोधक यांपैकी कोणीही संवेदनशील वा गांभीर दिसत नाही. लोकशाहीच्या दृष्टीने हा प्रकार अत्यंत हानिकारक आणि लाजिरवाणा आहे. यावेळीदेखील हिंदीच्या मुद्यावरून अधिवेशनाच्या मूलभूत उद्दिष्टपूर्तीला तिलांजली दिली जाईल असे दिसत होते, मात्र सत्ताधाऱ्यांनी एक पाऊल मागे घेत ही शक्यता आधीच दूर केली. लोकशाहीतील मूलभूत समस्या आणि मतदारांचे हित याच्याशी सत्ताधारी आणि विरोधकांनी फारकत घेतली आहे, मात्र काही मुद्दे अधिवेशनात चर्चिले जाणे गरजेचे वाटते.

१) स्थानिक स्वराज्य संस्थातील भ्रष्टाचार : स्थानिक स्वराज्य संस्थातील गैरप्रकार - आर्थिक लूट याबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सर्व लोकप्रतिनिधींनी केवळ बेगडी विरोध न दाखवता, भ्रष्टाचारमुक्त कारभार हे प्रामाणिक ध्येय ठेवणे गरजेचे आहे. जनतेपासून कारभार गुप्त ठेवण्याच्या कार्यपद्धतीमुळे आर्थिक लूट, भ्रष्टचार वाढला आहे, हे लक्षात घेता राज्यातील ग्रामपंचायत ते महानगरपालिकेपर्यंतच्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार हा जनतेसाठी खुला करण्याचा कायदा करावा.

२) तत्पर शासकीय सेवा : 'शासन आपल्या दारी' सारखा प्रतीकात्मक उपक्रम राबवण्यात धन्यता न मानता शासनाच्या दारी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला तातडीचा प्रतिसाद मिळावा, जनतेची कामे जलद व्हावीत यासाठी 'सेवा हक्क कायदा', 'नागरिकांची सनद' या कायद्यांची प्रामाणिक व कठोर अंमलबजावणी करावी. या दोन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचारी -अधिकाऱ्यांवर कारवाई करावी.

३) माहिती अधिकाराचे खच्चीकरण : माहिती अधिकार कायद्यामुळे अनेक गैरप्रकार - घोटाळे उघडकीस येऊ लागल्याने अलीकडच्या काळात सरकारी यंत्रणांना माहिती अधिकार कायदा नकोसा झाला आहे. सरकारचा धाक न उरल्याने बहुतांश यंत्रणा या आरटीआयला उत्तर देणे सर्रास टाळतात. माहिती आयुक्तांची पदे रिक्त असल्याने दोन-तीन वर्षे द्वितीय अपिलाची सुनावणी होत नसल्याने प्रशासन निर्धास्तपणे आरटीआयचे खच्चीकरण करत आहे. आरटीआय नाकारणे हा लोकशाहीचा पराभव ठरतो.

४) शिक्षणाचा घसरता दर्जा : अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन या कारणास्तव २०१४ च्या शासन परिपत्रकान्वये शिक्षक भरतीस बंदी या सबबीखाली श्रीमंत महानगरपालिका मुंबई - नवी मुंबई -ठाणे या सारख्या महापालिकांत शिक्षकांची वानवा आहे. शिक्षणाचा दर्जा घसरण्यामागे शिक्षकांची कमतरता हे प्रमुख कारण आहे. त्यामुळे शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वयंअर्थपूर्ण पद्धतीने कायम स्वरूपी शिक्षक नेमण्यास परवानगी द्यावी. शासनाने स्वतः शिक्षक भरतीच्या घोषणा वारंवार करण्याऐवजी तातडीने शिक्षक भरती अंमलात आणावी. शिक्षकांना शिक्षणबाह्य कामांना सातत्याने जुंपल्याने शाळेत शिक्षक कमी आणि बाहेर जास्त अशी अवस्था आहे. मतदारयाद्यांची तीच ती कामे पुन्हा पुन्हा करण्यास भाग पाडण्यापेक्षा सरकारने मतदार कार्डऐवजी आधार बायोमेट्रिक पद्धतीने मतदान घेण्याची पद्धत अवलंबण्याबाबत प्रस्ताव पाठवावा.

५) वेतन बायोमेट्रिक हजेरीशी जोडा : सातवा वेतन आयोग, ५ दिवसांचा आठवडा या सुविधा देऊनही नोकरशाही कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नाही हे उघड सत्य आहे. सेवा हक्क कायदा, नागरिकांची सनद या कायद्यांची अंमलबजावणी गतिशील पद्धतीने होण्यासाठी राज्यातील नोकरशाहीचे वेतन हे बायोमेट्रिक हजेरीशी जोडावे.

६) रस्त्यांचा निकृष्ट दर्जा : आजवर अनेक सरकाो आली आणि गेली परंतू रस्ते आणि खड्डे यांचे नाते अभेद्य आहे. कंत्राटदार -लोकप्रतिनिधी -अधिकारी



यांच्यातील अर्थपूर्ण लागेबांधे, टक्केवारीचे ग्रहण हा निकृष्ट दर्जा मागचे प्रमुख कारण आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने, पालिका आयुक्तांनी खड्डे तातडीने बुजवा असे जनतेची दिशाभूल करणारे आदेश देण्यात धन्यता न मानता 'रस्त्याच्या निकृष्ट दर्जास अभियंते आणि कंत्राटदार जबाबदार' असा कायदा करावा.

७) संगणकीय लॉटरी पद्धतीने बदल्या : बदल्यांतील भ्रष्टाचार ही भ्रष्टाचाराची जननी आहे. लाखो रुपये मोजून हव्या त्या ठिकाणी पोस्टिंग घ्यायची आणि त्या मोबदल्यात पोस्टिंग मिळाल्यावर शंभरपटीने मलिदा लाटायचा ही प्रशासकीय संस्कृती आहे. नेत्यांना विशिष्ट अधिकारीच हवा असतो तो का? त्यामुळे शिपायापासून आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या संगणकीय / लॉटरी पद्धतीने करण्याचा कायदा करावा. जे सरकार अगदी अट्टाहासाने संपूर्ण राज्यात ११ वीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवून दाखवते त्या सरकारला आपल्या कर्मचारी अधिकाऱ्यांच्या बदल्या ऑनलाईन पद्धतीने का करता येत नाहीत?

८) योजनांच्या लाभार्थ्यांची माहिती खुली करा : विहीर चोरीला गेली, रस्ता चोरीला गेल्याचे प्रकार अनेक वेळा उघडकीस येतात. सरकारी योजनांत मोठ्या प्रमाणावर अनागोंदी होत असते आणि ती उघडकीस येत नाही कारण सरकारी योजना, योजनांचे लाभार्थी याची माहिती नेहमीच गुलदस्त्यात ठेवण्याकडे शासनाचा कल असतो. अनेक लाभार्थी कागदावरच असतात. सरकारी योजनांचा लाभ पात्र व्यक्तीला मिळण्यासाठी, सरकारी योजनांतील अनागोंदी, गैरप्रकार थांबवण्यासाठी सरकारने सर्व सरकारी योजनांच्या लाभार्थींची यादी खुली करण्याचा नियम करावी.

९) शाळांच्या शुल्कवाढीला लगाम हवाच : राज्यात खाजगी शाळांसाठीचा शुल्क नियंत्रण कायदा असून नसल्यासारखाच आहे. ना सरकारला या कायद्याची अंमलबजावणी करण्यात स्वारस्य आहे ना संस्थाचालक त्या कायद्याला भीक घालत. सरकारने पोकळ घोषणा करण्यापेक्षा शिक्षणासाठीचे कमाल शुल्क निश्चित करणारा (अन्य राज्यांसारखा) कायदा करावा.

१०) शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे राजकीय भांडवल नको : गल्ली पासून ते दिल्ली पर्यंतचा प्रत्येक नेता हा आम्ही शेतकऱ्यांच्या हितासाठी लढा देत आहोत असे सांगत असतो. प्रत्येक सरकार आमचे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे असे सांगत असते. प्रश्न हा आहे की सर्वच जण शेतकऱ्यांच्या हितासाठी लढा देत असताना शेतकऱ्यांची ससेहोलपट थांबत का नाही. याचे कारण म्हणजे बहुतांश मंडळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे राजकीय लाभासाठी भांडवल करतात. शेतकऱ्यांची फसवणूक थांबवण्यासाठी शेतकऱ्यांची बियाणे, खते यामधील फसवणूक, शेत मालासाठी किमान दराचा कायदा करावा.

११) करोना काळातील साहित्याच्या पुनर्वापराबाबत सरकारने तातडीने धोरण योजावे : करोना कालावधीत खरेदी करून ठेवलेले साहित्य मोठ्या प्रमाणावर धुळखात पडलेले आहे. या साहित्याचा विनियोग कसा करायचा याचे धोरण नसल्याने साहित्य पडून आहे.

१२) पारदर्शकता प्रत्यक्ष कृतीत हवी : जे सरकार जनतेतून थेट सरपंच निवडण्याचा निर्णय घेते तेच सरकार ग्रामपंचायतीचा कारभार थेट जनतेसाठी पब्लिक डोमेनवर खुला का करत नाही? मुंबई महानगरपालिकेला भ्रष्टाचारमुक्त करण्याची राणाभीमदेवी थाटातील घोषणा करण्यात धन्यता मानते तेच सरकार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार जनतेसाठी खुला करून सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था भ्रष्टाचार मुक्त करण्याचे धाडस का दाखवत नाही?

विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींनी जनतेच्या अशा प्रश्नांना अधिवेशनाच्या काळात शून्य प्रहर प्रश्न, तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ऐरवणीवर आणणे अपेक्षित असते. परंतू सत्ताधारी असोत की विरोधक हे दोन्ही घटक आळीपाळीने लोकशाही व्यवस्थेतील गुप्त कारभाराचे आर्थिक लाभार्थी ठरत असल्याने वर्तमानातील लोकप्रतिनिधींकडून अशा प्रश्नांना वाचा फोडली जाण्याची सुतराम शक्यता नसल्याने एक सजग नागरिक या नात्याने जनतेच्या मनातील प्रश्न प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून ऐरवणीवर आणण्यासाठी हा एक प्रयत्न. या पावसाळी अधिवेशनात सरकारने जनतेच्या या तारांकित प्रश्नांवर विचार करावा ही विनंती.

**सुधीर दाणी**

# कर्नाटक काँग्रेसमधील सुंदोपसुंदी !



२०२३ साली झालेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने भाजपाचा पराभव करून तेथील सत्ता काबीज केली. २२४ सदस्यांच्या कर्नाटक विधानसभेत १३५ जागा जिंकून काँग्रेसने निवडणुकीत मोठे यश मिळविले. भाजपाला ६६ जागांवर समाधान मानावे लागले, तर सेक्युलर जनता दलाला केवळ १९ जागांवर विजय मिळाला. या पार्श्वभूमीवर जेंव्हा काँग्रेसने कर्नाटकात सरकार स्थापन केले तेव्हा मुख्यमंत्री पदासाठी सिद्धरामय्या आणि डी.के.शिवकुमार या नेत्यांमध्ये चढाओढ पहायला मिळाली. अखेर सिद्धरामय्या यांचा अनुभव आणि त्यांना असलेला बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा कामी आला. सिद्दरामय्या मुख्यमंत्री झाले खरे, परंतु डी.के.शिवकुमार यांना मुख्यमंत्रीपद न मिळाल्याने ते नाराज झाले आणि आपली नाराजी ते लपवू शकले नाहीत.

डी.के.शिवकुमार यांची समजूत घालताना काँग्रेस हायकमांडच्या नाकीनऊ आले. अखेर उपमुख्यमंत्री पदावर त्यांची बोळवण करण्यात आली. त्यांना खूष ठेवण्यासाठी काँग्रेस हायकमांडने त्यांच्याकडील प्रदेशाध्यक्षपद त्यांच्याकडे कायम ठेवले. सिद्रामय्या आणि डी.के.शिवकुमार यांच्याकडे अडीच, अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद सोपविण्याचा फॉर्म्युला त्यावेळी तयार करण्यात आला होता, असे म्हटले जात होते, परंतु त्याची पुष्टी कधीच होऊ शकली नाही.

सप्टेंबर २०२५ मध्ये सिद्धरामय्या यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीला अडीच वर्षे पूर्ण होत आहेत, त्यामुळे उरलेल्या कालावधीसाठी राज्याचे मुख्यमंत्रीपद डी.के.शिवकुमार यांच्याकडे सोपविण्यात यावे अशी मागणी आता, डी.के.शिवकुमार यांच्या पाठिराख्यांकडून उघडपणे करण्यात येत आहे. कर्नाटकातील काँग्रेसच्या १३५ आमदारांपैकी १०० च्या वर आमदारांचा डी.के.शिवकुमार यांना पाठिंबा असल्याचा दावा, त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे.

काँग्रेस हायकमांडसाठी ही मोठीच डोकेदुखी होऊन बसली आहे. सिद्दरामय्या आणि डी.के.शिवकुमार हे कर्नाटकातील काँग्रेसचे मासबेस असलेले नेते आहेत. सिद्दरामय्या हे कुरूबा या मागास जातीमधून आले असून त्यांचा या समाजावर चांगला प्रभाव आहे. त्या शिवाय अल्पसंख्य आणि ओबीसी समाजावरही त्यांचा चांगला प्रभाव आहे.

डी.के.शिवकुमार हे वोक्कालिग समाजातून आले आहेत. लिंगायत समाजाच्या खालोखाल वोक्कालिग समाजाचा कर्नाटकातील राजकारणावर मोठा प्रभाव आहे. वोक्कालिग समाज हा सेक्युलर जनता दलाचा पारंपरिक पाठिराखा मानला जातो. मात्र गेल्या विधानसभा निवडणुकीत वोक्कालिग समाजाने काँग्रेसला मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला होता. जुन्या म्हैसूर भागातील विधानसभेच्या ४६ जागांपैकी २९ जागा जिंकून काँग्रेसने २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत मोठे यश प्राप्त केले होते. या विभागात वोक्कालिग समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात असून, त्यांनी या खेपेस सेक्युलर जनता दलाची साथ सोडून, काँग्रेसला जवळ केल्याचे दिसून आले आहे. काँग्रेसच्या या नेत्रदीपक कामगिरीचे श्रेय अर्थातच डी.के.शिवकुमार यांना द्यावे लागेल, कारण आपल्या समाजाला ( वोक्कालिग ) काँग्रेसबरोबर मोठ्या प्रमाणात आणण्यात, ते यशस्वी झाले म्हणूनच काँग्रेसला कर्नाटकात सत्ता काबीज करता आली.

सिद्धरामय्या आणि डी.के.शिवकुमार यांच्यात मुख्यमंत्री पदावरुन जो संघर्ष सुरू आहे, तो काँग्रेस हायकमांडकडून कशाप्रकारे हाताळला जातो त्याबाबतची माहिती आपल्याला लवकरच मिळेल. अर्थात हा संघर्ष चिघळण्याच्या अगोदर काँग्रेस हायकमांडला त्यावर तोडगा काढावा लागेल. कर्नाटकमध्ये प्रमुख विरोधी पक्ष असलेली भाजपा, काँग्रेस मधील या सुंदोपसुंदीचा फायदा उठवण्याच्या परिस्थितीत दिसत नाही, याचे कारण कर्नाटक भाजपा मधील अंतर्गत कुरबुरींमुळे, भाजपा आधीच त्रस्त झालेली दिसत आहे.

**अभय गोखले**

# शेतीमध्ये 'जनुकाय तंत्र' वापरावे की नाही?

शेतीमध्ये 'जनुकाय तंत्र' या विषयावर आपल्या देशात अनेक वर्षांपासून चर्चा सुरू आहे. २००२ मध्ये कापूस पिकात जीएम प्रणाली स्वीकारली आणि अमेरिकेच्या मोन्सँटो कंपनीला बोलगार्ड १ आणि २ बीजीआय भारतातील महिको सीड कंपनीसह शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी संमती दिली. आज देशात सुमारे ९ टक्के कापूस बीटी बियाणांनी पिकवला जातो. आता एचटीबीटी ज्याला आज 'राउंड अप रेडी' असेही म्हणतात. त्याची लोकप्रियता वाढत आहे. बीजी१ आणि बीजी२ व्यतिरिक्त, तिसरा जनुक म्हणजेच सीपी ४ईपीएसपीएस वापरला जातो. मोन्सँटो कंपनीचे टीझेडपी (लॅम्फोसेट) तणनाशक उघड्या उभ्या पिकांवर फवारले जाते तेव्हा तण(कीटक)मरते पण कापसाच्या पिकाचे नुकसान होत नाही. आज शेतकऱ्यांना शेतात काम करण्यासाठी वेळेवर मजूर मिळत नाहीत, खर्चही जास्त आहे. या कारणास्तव, सरकारी मान्यता नसतानाही देशभरात एचटीबिटी बियाणांचे उत्पादन आणि लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. गेल्या १०-१२ वर्षांपासून हे सुरू आहे. या उपक्रमाचे फायदे आणि तोटे दोन्ही आहेत. म्हणूनच, भारतीय शेतकरी संघटना, पर्यावरण बचत जागरूकता मंच आणि अनेक पीक संरक्षण संघटना याला विरोध करत आहेत. आज शेतकरी तणनाशकांचा वापर बंद केल्याशिवाय-यांनीच पर्यावरणाचा विचार का करावा, शहरी ग्राहकांनीही त्याचा भार उचलावा, ही चर्चा येथे न करणे चांगले होईल.



ही चर्चा पुन्हा सुरू करण्याचे कारण म्हणजे देशातील मोठ्या बीज कंपन्यांनी तुम्हाला पत्रे दिली आहेत आणि कदाचित एकत्रितपणेही, आणि कापसाच्या एचटीबिटी लागवडीला कायदेशीर मान्यता देण्याची मागणी देखील केली आहे. या संदर्भात १९जून २०२५ रोजीच्या एका इंग्रजी वृत्तपत्रात एक मोठी बातमी प्रकाशित झाली आहे. आम्ही तुम्हाला विनंती करतो की, एचटीबिटी बियाणे गेल्या १०-१२ वर्षांपासून बाजारात आहे. गुजरातमध्ये त्याचे ८०इ उत्पादन कोणत्याही निर्बंधाशिवाय होत आहे. मग आज या सर्व मोठ्या कंपन्या ओरड का करत आहेत? आम्ही २०१९ मध्येच आदरणीय मोदीजींना बेकायदेशीर कापूस बियाणांबद्दल पत्र लिहिले होते. आणि २०२० मध्ये आम्हाला गुजरात सरकारकडून एक पत्र मिळाले आहे की, आम्ही त्यांच्यावर छापे टाकून कारवाई करत आहोत. पण उत्पादन आणि विक्री दरवर्षी वाढत आहे. आता ते इतके वाढले आहे की या कंपन्यांच्या बियाणांची विक्री ५०% पेक्षा जास्त झाली आहे. इतकेच नाही तर आता मोठ्या प्रमाणात एफ २ बियाणांची विक्री सुरू आहे. अनेक लोकांना हायब्रिड बियाण्यांमध्ये एफ १ आणि एफ २ म्हणजे काय हे देखील माहित नाही. आम्ही कृषीमंत्री माननीय चौहान आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी यांना पत्र लिहून विचारले आहे की, शेतकऱ्याने पेरलेले बियाणे एफ १ आणि एफ २ काय आहे? आम्हाला कसे कळेल?

आम्ही शेतकरी या तंत्रज्ञानाच्या विरोधात नाही. आमची मागणी अशी आहे की, जे काही तंत्रज्ञान विकसित केले जाते ते शेतकऱ्यांना साध्या प्रकारांमध्ये उपलब्ध असले पाहिजे, जेणेकरून ते बियाणे कंपन्यांचे गुलाम होऊ नयेत. आम्ही या संदर्भात माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग सरकारकडेही मागणी केली होती आणि त्या सरकारने बिकानेरी नरमा बीजी-१ वाण बाजारात ठेवण्यास सहमती दर्शविली होती. परंतु नंतर ते थांबवण्यात आले. मग आम्ही आदरणीय मोदीजींशी पत्रव्यवहार केला आणि सरकारनेही होकार दिला की साध्या जाती ठेवता येतील. आमच्याकडे २०१५ चे पत्र आहे. मात्र आतापर्यंत काहीही कारवाई झालेली नाही. आम्ही वारंवार सांगत आहोत की अमेरिकेत संकरित कापसाचे बियाणे नाही. मग भारतात का? महाराष्ट्राला १.५ ते २ कोटी बियाणांची पाकिटे पुरेशी आहेत, त्यापैकी ९० टक्के गुजरातमधून येतात, का?

काही अधिकाऱ्यांचा असा विश्वास आहे की, मजुरी वाढल्याने संकरित कापसाच्या बियाणांचे उत्पादन महाग आणि अशक्य होईल. बियाणे एचटीबिटी असो, बीटी , मका, सरसो, सोयाबीन असो, आम्हाला कोणताही आक्षेप नाहा. ते साध्या श्रेणीत असले पाहिजे. जर तुम्ही आम्हाला आमची दुर्दशा सांगण्याची संधी दिली तर आम्ही ते आमचे भाग्य मानू, विचार करू, मार्गदर्शन करू. शेतकऱ्याला बियाण्यांच्या गुलामगिरीतून मुक्त करू.

**विजय जवंधिया**
मोब.९४२१७२७९९८

# पालकमंत्री संजय राठोड यांच्याविरोधातील अपमानासह धमकी प्रकरणी अवधूतवाडी पोलिस ठाण्यात तक्रार





जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्याविरोधात अश्लील, अपमानजनक वक्तव्य करून धमकी दिल्याचा आरोप करत शिवसेना महिला आघाडीच्या शेकडो कार्यकर्त्यांनी अवधूतवाडी पोलिस ठाण्यात धडक दिली. यावेळी अयोध्या पौळ हिच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख वैशाली प्रशांत मासाळ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १ जुलै २०२५ रोजी अयोध्या पौळ हिने बीड येथील एका व्यक्तीसोबत फोनवर आमदार संजय राठोड यांच्याविषयी अश्लील व अपमानजनक भाषा वापरली तसेच थेट जीवे मारण्याची धमकी दिली. याच संभाषणाचा ऑडिओ क्लिप व्हायरल करून सामाजिक माध्यमावरून बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच, संबंधित महिलेनं फेसबुक पोस्टवरून पुन्हा त्या वक्तव्यांची पुनरावृत्ती केली असून, त्या पोस्टवरील कमेंटमध्ये वारकरी संप्रदाय व श्री विठ्ठल-रुक्मिणी दैवताचा अवमान झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे शिवसेना कार्यकर्त्यांत तीव्र संताप असून, या महिलेविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी महिला आघाडीच्या कालिंदा पवार, शारदा थोटे, वंदना मुखरे, वंदना राठोड, दुर्गा कुंभे, मेघा मांडवकर, सुषमा धंदरे, शोभा फुंसे, संगीता पुरी, ज्योती चिखलकर, संजीवनी शेरे, पुष्पा ससाने यांच्यासह जिल्ह्यातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. तसेच हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, गजानन डोमाळे, राजूदास जाधव, यशवंत पवार, विशाल गनात्रा, महेश पवार यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनाला इशारा दिला की, जर याप्रकरणी तातडीने कडक कारवाई केली नाही तर पुढील आंदोलन निश्चित करण्यात येईल.अशी भूमिका सर्व कार्यकर्त्यांनी घेतली आहे.

# सराईत चोरटा 'मोईन' एमपीडीए अंतर्गत येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : शहर व परिसरात सातत्याने घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या आणि पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार शेख मोबीन उर्फ शेख मोईन ईसराईल (वय २७, रा. वेंडकिपुरा, चमेडीया नगर, यवतमाळ) याला अखेर पुन्हा एकदा मध्यवर्ती कारागृह, येरवडा (पुणे) येथे MPDA कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्यात आले आहे.

सदर आरोपीवर यापूर्वी २०२३ साली देखील MPDA अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. मात्र, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ११ महिन्यांनंतर त्याची सुटका करण्यात आली होती. तुरुंगाबाहेर आल्यानंतर देखील मोबीनने सुधारण्याऐवजी पुन्हा चोरीच्या सत्राला सुरुवात केली. यवतमाळ शहर तसेच वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट परिसरात त्याने रात्रीच्या वेळी घरफोडी व चोरीचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले. या प्रकारामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांनी मोबीनविरुद्ध पुन्हा MPDA कायद्यांतर्गत प्रस्ताव तयार करून मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला. त्या अनुषंगाने दिनांक २४ जून २०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी यांनी शेख मोबीन याला येरवडा पुणे कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश जारी केले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे, स्था. गु. शा. चे पोलीस निरीक्षक सतीश चवरे व यवतमाळ शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यात पो. उपनिरीक्षक गजानन रघामलु, पोलीस अंमलदार शेख साजिद, रुपेश पाली, योगेश डगवार, रविंद्र नेवारे, अंकुश फेंडर, सुनील पैठणे, राजकुमार कांबळे, भरत राठोड, देवेंद्र होले, आकाश सूर्यवंशी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# बांधकाम कामगार नोंदणीत बोगस प्रमाणपत्र प्रकरण उघड

## श्री. साई कंप्युटर कळंब येथे छापा पोलिसांत गुन्हा दाखल



जनमाध्यम प्रतिनिधी

कळंब - राज्यातील बांधकाम कामगार नोंदणी प्रक्रियेत बोगस कागदपत्रांचा गैरवापर रोखण्यासाठी शासन स्तरावरून कडक पावले उचलली जात असतानाच यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथे अशाच प्रकारचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. श्री. साई कंप्युटर, कळंब या आस्थापनाकडून नागरिकांकडून अवाजवी रक्कम आकारून त्यांना बनावट बांधकाम कामगार नोंदणी प्रमाणपत्रे देण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी आस्थापना मालक प्रज्वल शिरसकर यांच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या निर्देशानुसार तसेच मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांच्या आदेशाने अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यात बोगस नोंदणी रोखण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. त्याअंतर्गत चंद्रकांत राऊत, कामगार उप आयुक्त, अमरावती यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, दक्षता पथके तयार करण्याचे आदेश दिले होते. या मोहिमेनुसार यवतमाळ जिल्ह्यातील रा.रा. काळे, सरकारी कामगार अधिकारी यांच्या मार्गदर्शनात राजेश बनारे व सतीश देशमुख (सुविधाकार, बुलडाणा) यांनी तपासणी सुरू केली. ३० जून २०२५ रोजी गोपनीय माहितीच्या आधारे श्री. साई कंप्युटर, कळंब येथे अवैधरीत्या बांधकाम कामगार नोंदणीचे बनावट प्रमाणपत्र तयार केले जात असल्याचे समजले. त्यानंतर १ जुलै रोजी दुपारी ५ वाजता सतीश देशमुख यांनी पोलीस कर्मचारी व पंचांसह सदर ठिकाणी छापा टाकला.

तपासणी दरम्यान संबंधित आस्थापना मालक प्रज्वल शिरसकर यांच्याकडे नगर पंचायत, कळंब यांचे सही असलेले परंतु प्रमाणपत्र धारकाचे नाव नसलेले, नियुक्त अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीशिवाय तयार केलेले बनावट प्रमाणपत्र सापडले. तसेच चंदा संतोष डिघुले व सुमन चंद्रभान बोरकर यांच्या नावे बनावट प्रमाणपत्राचे झेरॉक्स मिळाले. पुढील चौकशीत नगर पंचायत, कळंब यांच्याकडून लेखी पत्राद्वारे सदर प्रमाणपत्रे खोटी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तपासणीनंतर संबंधित आस्थापना मालकाने नागरिकांची फसवणूक करून त्यांच्याकडून अवाजवी रक्कम घेतल्याचे तसेच शासनाला दिशाभूल केल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी प्रज्वल शिरसकर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (B.N.S) २०२३ अंतर्गत कलम ३१८(४), ३३६(३), ३४९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस विभागाकडून पुढील तपास सुरू आहे.

**शासनाचा इशारा : बोगस नोंदणी प्रकरणात सहभागी एजंट/दलालांवर कठोर कारवाई होणार**

कामगार कल्याण मंडळाच्या नोंदणीत बोगस कागदपत्रांचा वापर करून फसवणूक करणाऱ्यांविरोधात शासनाने ठोस भूमिका घेतली आहे. सर्व जिल्ह्यात दक्षता पथके सक्रिय असून नागरिकांनी अशा प्रकारच्या व्यक्तींपासून सावध राहावे व कोणत्याही संशयास्पद प्रकाराची माहिती तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ॲड. बालाजी कपटे हे आदर्श शेतकरी कृषीभूषण पुरस्काराने सन्मानित



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने दरवर्षी जिल्हास्तरावर पीक स्पर्धा घेतली जाते. सन २०२३-२४ च्या खरीप हंगामात देखिल ही पिक स्पर्धा कृषी विभागामार्फत घेण्यात आली होती. यामध्ये बोरी(मुखरे) तालुका पुसद येथील कार्यकुशल शेतकरी ॲड.बालाजी मधुकर कपटे यांनी त्यांच्या सांडवा येथील शेतीमध्ये २०२३-२४ मध्ये खरीप हंगामात सोयाबीनचे पीक घेतले होते सदरचे सोयाबीन पिक हे चार फुटावर बेड मारून त्यावर एकरी १२ ते १३ किलो सोयाबीनची लावणा टोकण यंत्रद्वारे केली होती.२०२३-२४ च्या खरीप हंगामात शेतकरी बालाजी कपटे ह्यांना हेक्टरी ४३ क्विंटल सोयाबीनचे विक्रमी उत्पन्न झाले होते.

प्राप्त माहितीनुसार बालाजी कपटे हे शून्य मशागत शेती गेल्या ६ वर्षांपासून पडलेल्या बेड वरच ते त्यांचे उत्पन्न घेत असतात त्यांनी नैसर्गिक शेतीद्वारे व झिरो बजेट मध्ये जिल्ह्यात २ नंबरचे सर्वाधिक सोयाबीन उत्पादन करणारे शेतकरी म्हणून मानकरी ठरले असून त्यांना १ जुलै कृषी दिनाच्या औचित्य साधून जिल्हाधिकारी मीना यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृह यवतमाळ येथे आदर्श शेतकरी कृषी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी तसेच इतर मान्यवरांनी शेतकऱ्यांच्या पीक पद्धतीवर प्रकाश टाकत त्यांचे कौतुक केले. शेतकऱ्यांनीसुद्धा मनोगत व्यक्त करताना घेतलेल्या पीक पद्धत लागवडीची माहिती दिली.यावेळी मंचावर कृषी अधिकारी,कर्मचारी व शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. शेतकरी ॲड बालाजी कपटे यांचे पुसद तालुक्यात शेतकरी तसेच वकील संघ व मित्र परिवाराकडून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# भिमवाडी, वसंत पार्क, जिजाऊ नगर हा रहदारीचा रस्ता आहे की पांदन रस्ता

## नगर परिषद प्रशासक लक्ष देतील का..?



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - नगरपालिकेच्या हद्दीमध्ये येणाऱ्या भिमवाडी,वसंत पार्क, जिजाऊ नगर, शिवशक्ती नगर जय मल्हार नगर, सखाराम नगरी,नारायणवाडी,अयोध्या नगर या नगरांना रहदारीचा मुख्य रस्ता पावसाच्या पाण्यामुळे गड्ड्यात गड्डे पडल्यामुळे रहदारीसाठी बिकट झालेला आहे त्यामुळे विद्यार्थी व नागरिकांसमोर मोठे संकट प्रकट झाले आहे.या रस्त्याला चक्क पांदण रस्त्याचे स्वरूप लाभले आहे. त्यामुळे दुचाकी तर सोडा पायी चालणेही अशक्य झाले आहेत. मात्र या सर्वांमध्ये विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.

आमदार, खासदार आले आणि आश्वासन देऊन गेले पण वर्षानुवर्ष या रस्त्याचा प्रश्न सुटलाच नाही पावसाळा आला की ठेकेदार मालमाल होतात मुरुमाच्या एक-दोन ट्रीप टाकतात आणि अवाचे सव्वा बिले काढून मोकळे होतात असे स्थानिक नागरिक सांगतात तरी पण प्रश्न मार्गी लागत नाही त्यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

**प्रशासकाने दखल न घेतल्यास आंदोलन उपोषण करू :** नगर प्रशासन आणि लोकप्रतिनिधीच्या नियोजन शून्य कामामुळे आम्हा स्थानिक रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.सन २०१८ नंतर या रस्त्याला कुठल्याही लोकप्रतिनिधी किंवा नगरपालिकेने सुद्धा पाहिले नाही त्यामुळे या रस्त्याची दैन्य अवस्था झालेली आहे.या रस्त्याला छोटे छोटे नेहमीचेच अपघात झाले आहे शाळकरी मुले यांना जीव मुठीत धरून शाळेत जावे लागत आहे. आमच्या समस्याचे निराकरण झाले नाही तर आम्ही रहिवासी लवकरात लवकर आंदोलन उपोषण करू याची दखल घेण्यात यावी अन्यथा या रस्त्याला कुठला अपघात होऊन जीवितहानी झाल्यास त्याला सर्वस्वी नगर प्रशासन जबाबदार राहील.

**स्थानिक रहिवासी नितेश खंदारे वसंत पार्क**

# वेचक

## कर्जमाफी जाहीर करण्यापूर्वी कृषी धोरण बदलण्याची गरज : गोविंदराव देशमुख


महागाव - सध्या राज्यात शेतकरी कर्जमाफी वरुन रणकंदन सुरु असल्याचे निदर्शनास येत आहे वारंवार कर्जमाफी, दुष्काळ निधी, सबसीडीच्या योजना, नुकसान भरपाई अशा वरवरची मलमपट्टी करून मुळ दुखने कायमस्वरूपी तोडगा न काढल्यात आल्याने मागील अनेक काळापासुन जैसे थेच असल्याचे निदर्शनास येते. सध्या आलटुन पलटुन आज राज्यात अस्तित्वात असलेल्या सर्वच राजकीय पक्षांचे सत्तेत कधी विरोधी बाकावर बसलेले आसन बदलले परंतु शेती आणि शेतकरी यांचे काल आणि आजही प्रश्न तेच आहेत. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शेती क्षेत्राचे योगदान अनन्यसाधारण महत्वाचे आहे. रोजगार निर्मिती असो अथवा यांत्रिकीकरण अथवा कारखानदारी असो शेती हा सर्वांचा आत्मा आहे. शेती सोडून सगळं निरर्थक आहे तरीपण कायमचे दुरगामी आणि प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता किंवा अशी भूमिका किंवा तसे प्रभावी शेती धोरण राबविण्याचे सोडून सर्वांनी मिळुन आजपर्यंत फक्त वरवरची मलमपट्टी करून मुळ दुखने कायम ठेवण्यात धन्यता मानली त्यामुळे वारंवार हे प्रश्न कायम समोर येतात. तेंव्हा प्रत्येक राजकीय पक्षाचे नेते मंडळींना हे शेतकऱ्यांना भेडसावत असलेले विषय यांना राजकिय भांडवल करण्यासाठी कायमस्वरूपी आणि सहजपणे उपलब्ध होतात. ज्याप्रमाणे स्वतःच्या पगारी पेन्शन सोयी सुविधा पदरात पाडून घेण्यासाठी सर्वपक्षीय एकमुखी होतात त्या प्रमाणे या राज्याच्या जुनाट व जीवघेण्या शेती क्षेत्रात कॅन्सर च्या स्वरूपात दिवसेंदिवस चालणार्या समस्या सोडविण्यासाठी एकत्र होऊन सुयोग्य धोरण आखल्यास निश्चितच राज्यातील शेतकरी शासनाच्या कोणत्याही सबसीडी साठी किंवा वारंवार कर्जमाफी साठी पदर पसरणार नाही. आत्महत्या सुध्दा करणार नाही आणि शासनाच्या तीजोरीवर सुध्दा शेतीचा भार येणार नाही. राज्यात सत्तेच्या आणि विरोधी बाकावर बसलेले शेती बाबत नासमज आहेत असाही भाग नाही आमच्या पेक्षाही खुप अभ्यासु आणि अनुभवी नेते मंडळी तपुन सुलाखुन तिथपर्यंत पोहचलेली आहेत हे सुध्दा खरे आहे पण नेमके पाणि कुठे मुरते हे त्या सभागृहात वारंवार निवडुन जानांराना चांगले ज्ञात आहे.

## हिवरा ग्रामपंचायत कार्यालयात माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



महागाव - काल दि01/07/2025 रोजी कृषिक्रांतीचे जनक व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतरावजी नाईक यांची जयंती हिवरा (सं.) ग्रामपंचायत कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी उमरखेड महागाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार श्री.नामदेवराव ससाणे साहेब आपल्या कुटुंबा सोबत उपस्थित होते, तसेच कलगाव येथील उपसरपंच श्रीधर भवानकर तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी राऊत, हिवरा संगम येथील प्रतिष्ठित नागरिक श्री.विजयराव बोंपिलवार.श्री. रामजी नाईक.श्री.अनिलजी कदम श्री.विलासराव वळसे श्री.संकेत बोंपिलवार.श्री.वैभव कोत्ताकोंडावार श्री.गजानन लकडे श्री.संदीप कदम सिंहझेप तालुका प्रतिनिधी.हिवरा ग्रामपंचायत उपसरपंच श्री. शरद पाटील सदस्य.राजुभाऊ धोलरकर.श्री.अशोकराव कदम ग्रामपंचायत कर्मचारी श्री.सुधीर कदम.श्री.अशोकराव भुसारे श्री. स्वप्नील बेलखेडे श्री.राहुल आंबडे श्री.समाधान मोरे इत्यादी उपस्थित होते.

## राळेगाव येथे बंजारा कर्मचारी संघटनेच्या वतीने वसंतराव नाईक जयंती साजरी



राळेगाव : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे प्रणेते बंजारा समाजाला योग्य दिशा देणारे समाजभूषण स्वर्गीय वसंतरावजी नाईक यांची जयंती आज दिनांक 1 तारखेला वडते सर यांच्या निवासस्थानी सायंकाळी सात वाजता साजरी करण्यात आली.त्या कार्यक्रमात सर्व प्रथम वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर सर्व उपस्थित समाजाच्या सर्व मान्यवर मंडळींनी प्रतिमेचे पूजन केले.त्याच सोबत आज दिनांक 1 तारखेला बंजारा कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी रुपेश जाधव आणि श्रीमती जयश्री देविसिंग आडे यांचा वाढदिवस असल्याने केक कापून व शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.त्यानंतर संघटनेचे पदाधिकारी ताराचंद पवार यांनी वसंतराव नाईक यांच्या जिवनचरित्रावर व केलेल्या कार्याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यावेळी संघटनेचे अध्यक्ष श्रावणसिंग वडते, ताराचंद पवार, रमेश चव्हाण, रुपेश जाधव, निखिल आडे, शिवाजी जाधव, संतोष चव्हाण, श्रुषी कुमार जाधव यांच्या सह अनेक बंजारा बंधू भगिनी उपस्थित होते.

# चिखलवर्धा ते पाटापांगरा मार्गाची दुर्दशा !

## चिखलवर्धा परिसरातील नागरिकांचा आक्रोश आम्हाला नाला नको तर रस्ता हवा!



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - तालुक्यातील चिखलवर्धा येथील अब्दुल मजीद पटेल हायस्कूल जवळ चिखलवर्धा ते पाटापांगरा हा प्रमुख ग्रामीण मार्ग रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून, सतत वाहणाऱ्या पाण्यामुळे रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्यावरील पाणी आणि मोठा खड्डा यामुळे रस्त्याला नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. परिणामी या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारक आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.सदरील ठिकाणी कायमस्वरूपी पाणी वाहत असल्याने माती साचून रस्ता चिखलात परिवर्तित झाला आहे. रस्त्यावर खोल खड्डा तयार झाल्याने वाहनांचे नियंत्रण सुटून अपघात होण्याचा धोका सतत निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी दुचाकीस्वार रस्त्यावरून घसरून जखमी झाल्याचीही घटना घडली आहे.

पाईप टाकून रपटा बांधावा या समस्येचे निराकरण करण्यासाठी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे रस्त्यावर पाईप टाकून रपटा (बांधकाम) करून पाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी केली आहे. परंतु आजतागायत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. या मार्गाचा वापर शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, आणि रोजनदारी करणारे नागरीक मोठ्या प्रमाणावर करतात. तरीही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्यमुळे ग्रामस्थ व वाहनधारक त्रस्त आहे. प्रशासनाने लवकरात लवकर या समस्येकडे लक्ष द्यावे असे वाहनधारक व चिखलवर्धा ग्रामस्थांची मागणी आहे.

# वसंत स्मारकाचे लोकार्पण तात्काळ करावे : शरद मैंद

## स्व.वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त रा. काँ. पार्टी (श.प.) पक्षाकडून अभिवादन



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - हरित क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पुसदचे थोर सुपुत्र, कै वसंतरावजी नाईक यांच्या 112 व्या जयंती निमित्त पुसद येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार पक्षाने काकडदाती स्थित असलेल्या वसंत उद्यान मध्ये नाईक साहेबांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून व पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पार्पण करून विनम्र अभिवादन केले व त्यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी मागील आठ वर्षांपासून लोकार्पणाच्या प्रतिक्षेत असलेल्या नाईक साहेबांच्या स्मारकाची पाहणी केलं,स्मारकाची संपूर्णपणे दुरावस्था झालेली व स्मारकाला इजा पोहचवल्याचे तसेच खिडकी व इतर ठिकाणचे काच फोडण्यात आलेले व इमारतीतील काही माल लंपास झाल्याचे निदर्शनात आले.

यावर बोलताना प्रदेश सरचिटणीस शरद मैंद म्हणाले कि, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या स्मृती जिवंत राहाव्या यासाठी शासनाने 100कोटी रुपयाचा निधी त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्य दिला होता. त्यापैकी 10कोटी रुपयाचा निधी हा त्यांच्या पुसद तालुक्यातील गहुली या जन्मगावाला दिला,स्व. वसंतराव नाईक यांच्या आठवणी जिवंत राहाव्यात नाईक साहेबांच्या कार्यातून युवकांनी व शेतकऱ्यांनी प्रेरणा घ्यावी यासाठी आठ कोटी रुपये खर्च करून संग्रहालयाची उभारणी करण्यात आली. आज याला आठ वर्ष झाले असून अजूनही हे वसंत स्मारक आणि संग्रहालय लोकार्पणाच्या प्रतिक्षेत असून या वास्तूचे लोकार्पण लवकरात लवकर करून सर्वसामान्य नागरिकांसाठी मोकळे करून द्यावे अशी मागणी त्यांनी केली. एक दशकाचा कालावधी लोटूनही जनतेसाठी हे स्मारक खुले करण्यात आलेले नाही. ह्या स्मारकाची दुर्दशा झाली आहे. स्मारक परिसरात घाणीचे साम्राज्य, व वाळवंटाचे रूप आले आहे, इमारतीला इजा पोहचली असून खिडकीचे व इतर ठिकाणचे काच फोडल्या गेली आहेत त्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शप.चे तालुका व युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार, शहर व युवक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पुसद तालुका एस टी सेल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार. सोसिअल मीडिया पुसद तालुका व पुसद शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार सामाजिक न्याय विभाग पुसद तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिग्रसच्या आयान शेख याला राष्ट्रीय स्तरावर तिसरे पारितोषिक!



जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - भारत सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्यावतीने आयोजित विदशास्त्र विश्लेषण या देश व्यापी स्पर्धेत दिग्रसचा आयान शेख तिसरा आला आहे. नुकत्याच दिल्लीत पार पडलेल्या १९ व्या सांख्यिकी दिनी त्याला केंद्रिय मंत्री राव इंद्रजीत सिंग यांच्या हस्ते पन्नास हजार रोख पारितोषिक सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

नवी दिल्लीतील डॉ. अंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे मोठ्या उत्साहात राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला. यावर्षीच्या कार्यक्रमाची "राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ७५ वर्षांचा प्रवास" ही थीम होती. या निमित्ताने आयोजित देश व्यापी डेटा व्हिज्युअलायझेशन हॅकाथॉनमध्ये विजयी ठरलेल्या स्पर्धकांचा गौरव करण्यात आला. प्रथम क्रमांक प्रतीक आर. उपाळ, द्वितीय क्रमांक प्रतीक राणा आणि श्रेय कचेरीया, तर तृतीय क्रमांकाचा पुरस्कार आयान शेख बशीर आणि सोनम यांना संयुक्तपणे प्रदान करण्यात आला. या स्पर्धेमध्ये आयान शेख बशीर याने सादर केलेल्या कल्पक आणि परिणामकारक विदाविषयक सादरीकरणाने परीक्षकांची विशेष दाद मिळवली. त्याचे कार्य केवळ तांत्रिकदृष्ट्या उत्तम नव्हते, तर ते समाजाला उपयोगी ठरणारे आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोन ठरवणारे होते. आयान शेख बशीर याचे हे यश नव्या पिढीतील विदशास्त्र आणि सांख्यिकी अभ्यासकांसाठी प्रेरणादायक ठरले आहे.

# साहील पुरी सहा महिन्यांसाठी तडीपार

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - शहरात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी मोठी कारवाई करत रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार साहील कैलास पुरी (वय २०, रा. सेवानगर, वणी) यास सहा महिन्यांसाठी तडीपार केलं आहे. साहील पुरी याच्यावर वणी पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर चोरी, जबरी चोरी, तसेच जिवे मारण्याचा प्रयत्न असे गंभीर गुन्हे नोंद आहेत. त्याचं वर्तन दिवसेंदिवस अधिकच बिघडत चालल्याने आणि त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत असल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी त्याच्यावर तडीपारीची प्रक्रिया सुरू केली. उपविभागीय अधिकारी वणी यांच्या आदेशावरून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ)(ब) नुसार, साहील पुरी यास सहा महिन्यांसाठी वणी, यवतमाळ जिल्हा तसेच लगतचे वरोरा, भद्रावती, कोरपणा तालुका काळात अन्यत्र राहण्याचे आदेश जारी करण्यात आले. दिनांक १ जुलै रोजी साहील पुरी यास तडीपारीच्या आदेशाची प्रत देऊन त्याला त्याच्या नातेवाईकांसोबत नागपूर जिल्ह्यातील उमरेड पोलीस स्टेशन हद्दीत सोडण्यात आले. या कारवाईत उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश किंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गोपाल उंबरकर, पोउनि धीरज गुल्हाने, पोलीस अंमलदार मोनेश्वर, वसीम, कुडमेथे, मेश्राम व नंदकुमार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. साहील पुरी याचं सातत्याने वाढत चाललेलं गुन्हेगारीकडे झुकणं व नागरिकांमध्ये निर्माण झालेला दहशत पाहता पोलिसांनी तडीपारीची प्रभावी कारवाई करत शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. पोलिसांचे पुढील कारवाईही सुरूच राहणार असल्याचं सूत्रांकडून समजतं.

# कृषी न्यायाधिकरणाची मागणी पुर्ण होण्याची शक्यता बळावली



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - अन्याय झाल्यास सरकारी कर्मचारी, महिला, कामगार व ग्राहक यांच्याकरीता विशेष न्यायालये आहेत. तर दुसरीकडे देशातील 70 टक्के अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असतानाही शेतकऱ्यांकरीता मात्र अशा न्यायालयाची निर्मिती करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकरी नेते तसेच लोकजागृती मंचचे अध्यक्ष देवानंद पवार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून कृषी न्यायाधिकरणाची मागणी रेटून धरली होती. आता मात्र ही मागणी पुर्ण होण्याची शक्यता बळावली असून शेतकऱ्यांनी सुध्दा आनंद व्यक्त केला आहे.

**देवानंद पवार यांच्या प्रयत्नांचे फलीत**

१ जुलै रोजी मुंबई येथे शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर यवतमाळ जिल्ह्यातील एका शिष्टमंडळाने वणीचे आमदार संजय देरकर, वसंत घुईखेडकर, मनिष पाटील, अशोक बोबडे, टिकाराम कोंगरे, देवानंद पवार यांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांची भेट घेतली. या भेटीत देवानंद पवार यांनी शेतकऱ्यांकरीता स्वतंत्र कृषी न्यायाधिकरण आवश्यक असल्याची बाब मांडली. अत्यंत महत्वाची मागणी केल्यामुळे मंत्री महोदयांनी सुध्दा यासंबधीचा सविस्तर ड्राफ्ट देण्याची सुचना देवानंद पवार यांना केली. विशेष म्हणजे हीच मागणी आज चंद्रपूरचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सुध्दा विधानसभेत केल्यानंतर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासोबत सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. देवानंद पवार यांच्या विनंतीवर यापुर्वी सुध्दा नानाभाऊ पटोले महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष असतांना त्यांनी कृषी मंत्री, कृषी सचिव तसेच अधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. देवानंद पवार यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे या मागणीची पुर्तता सरकारकडून होण्याची शक्यता वाढली असून आपण पाठपुरावा सुरुच ठेवणार असल्याचे शेतकरी नेते देवानंद पवार यांनी सांगितले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# स्पर्धा परीक्षेची तयारी करताना स्वयंप्रेरणा महत्त्वपूर्ण-जिल्हाधिकारी

## परीक्षा मार्गदर्शन शिबीर व सत्कार सोहळा

**अमरावती/का.प्र.**

स्पर्धा परीक्षांची तयारी करताना, अनेक आव्हानांना आणि अडचणींना सामोरे जावे लागते. परंतु स्वयं-प्रेरणा तुम्हाला या परिस्थितीत हार न मानता, तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना स्वयंप्रेरणा आणि आत्मविश्वास कायम ठेवा. यामुळे तुम्हाला यश निश्चित मिळेल, असा विश्वास जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज व्यक्त केला.

यूपीएससी आणि एमपीएससी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार तसेच स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड येथे करण्यात आले होते, त्यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर बोलत होते. महापालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर,जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुरज मडावी तसेच युपीएसी परीक्षा उत्तीर्ण झालेले शिवांक तिवारी, रजत पत्रे, नम्रता ठाकरे यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, स्पर्धा परीक्षांची तयारी करताना अनेक विद्यार्थी कठोर परिश्रम करतात, पण यश सगळ्यांनाच मिळते असे नाही. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी फक्त एकाच परीक्षेवर अवलंबून न राहता, इतर पर्यायांचा विचार करणे आवश्यक आहे.

शालेय दिवसापासूनच आपले विविध विषय सखोलपणे अभ्यासण्याची सवय रुजवा. ही सवय स्पर्धा परीक्षेची तयारी करताना उपयुक्त ठरेल, असेही ते यावेळी म्हणाले.महापालिका आयुक्त शर्मा-चांडक यांनी यावेळी स्पर्धा परीक्षेबाबत त्यांचे अनुभव कथन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महोपात्र म्हणाल्या, स्पर्धा परीक्षेचे यश केवळ स्वप्न बघून पूर्ण होत नाही. यासाठी प्रयत्न करा. नियोजनपूर्व आणि सातत्यपूर्ण अभ्यास केल्यास हे यश कोणालाही शक्य आहे. ग्रामीण भागातून आल्यामुळे हे यश मिळण्याला काहीही अडचण नाही, हे यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांकडे पाहून कळते, असेही त्या यावेळी म्हणाल्या.जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी जिल्हाधिकारी येरेकर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात



आलेल्या या कार्यक्रमाबाबत अभिनंदन केले. स्पर्धा परीक्षा देताना झालेल्या चुकांमधून न घाबरता पुढे चला, असा संदेश दिला.

युपीएसी परीक्षा उत्तीर्ण झालेले आनंद खंडेलवाल, शिवांक तिवारी, रजत पत्रे, नम्रता ठाकरे यांचा यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यांनी स्पर्धा परीक्षा उमेदवारांना त्यांच्या यशाचे रहस्य, अभ्यासाचे तंत्र आणि प्रशासकीय सेवेतील संधींविषयी यावेळी मार्गदर्शन केले.प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुरज मडावी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन शिप्रा मानकर यांनी तर आभार निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी मानले.

# माहेरून पैसे आणण्यासाठी विवाहितेचा छळ

**बेलोरा/वार्ताहर-** अकोला जिल्हह्यातील पातुर तालुक्याअंतर्गत येणारे बिवरा येथील विवाहितेला माहेरवरून पैसे आणण्यासाठी तगादा लावत शारीरिक, मानसिक छळ केल्याची तकार पोलिस ठाण्यात दाखल केली आहे.

फिर्यादी विवाहिता ही २४ वर्षाची असून ती गृहिणी आहे. तिचा पती मयूर, सासरे संजीव, सासू सिंध्दू, दीर अक्षय, ननंद रिना, आजी सासू शांताबाई, सर्व रा. बिवरा तर मावससासरे नंदकुमार व मावससासू अलका या पातुर तालुक्यातील बंदी पांगरा येथील रहिवासी आहेत. सदर आरोपी हे फिर्यादीच्या पतीला भडकवून संगनमताने विवाहितेला माहरवरून पैसे आणण्याकरिता तगादा लावत आहे.

पैशासाठी तिला शारीरिक व मानसिक त्रास देत असून शिविगाळ सुध्दा करीत आहेत. या प्रकरणी विवाहितेने चांदूर बाजार पोलिस ठाण्यात तकार नोदविली आहे. महिला दक्षता समीती या प्रकरणी कार्यरत आहेत. वरिल सर्व आरोपिंविरुध्द कलम ८५, ३५१(२), (३), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# पोटे आयुर्वेदिक रुग्णालयात आज येणार यकृत रोगतज्ञ



**अमरावती-** यकृत व त्यासंबंधीचे आजार मोठ्या प्रमाणात वाढत असून अश्या आजाराचो तात्काळ निदान व उपचार झाल्यास हा जीवघेणा आजार बरा होऊ शकतो. याचा विचार करून सुप्रसिद्ध यकृत विकार तज्ञ डॉ. चरण सोनारे गुरुवार ३ जुलैला सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद रुग्णालयात रुग्ण तपासणी, उपचार व मार्गदर्शन करतील. रुग्णालयात उपस्थित राहून लाभ घ्यावा. असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक डॉ. श्याम भुतडा यांनी केले आहे.

# आरटीओच्या भ्रष्ट कारभाराविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला बळ द्या!

## वंचितचे युवा जिल्हा महासचिव सागर भवतेंचे आवाहन

**काटपूर/वार्ताहर**

विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न आणि अमरावती विभागाच्या परिवहन क्षेत्राच्या सीमेवर सुरू असलेल्या भ्रष्ट कारभाराकडे लक्ष वेधून घेण्यासाठी दोन लक्ष रुपयांचे सीसीटीव्ही कॅमेरे घेऊन आमरण उपोषणाला बसलेले वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांच्या जनहितार्थ उपोषणाला सर्व सामाजिक- राजकिय क्षेत्रातील जनतेने बळ द्यावे असे आवाहन वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते



यांनी केले आहे.९ जून २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडी यवतमाळ तर्फे परिवहन विभाग,अमरावती येथे लेखी निवेदनाद्वारे पिंपळखुटी चेक पोस्टवरील भ्रष्टाचाराची गंभीर माहिती देण्यात आली होती. त्यानंतर १८ जून रोजी स्मरणपत्राद्वारे पुन्हा कारवाईची मागणी करण्यात आली.मात्र,अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.२६ जून रोजी संबंधित कार्यालयात सीसीटीव्ही प्रणाली भेट देण्याच्या मागणीसाठी प्रत्यक्ष भेट देण्यात आली होती. परंतु,ती मागणीही नाकारण्यात आली.या भ्रष्ट कारभारा विरोधात १ जुलै पासून कृषी दिनी,जेव्हा संपूर्ण महाराष्ट्र शेतकऱ्यांच्या सन्मानासाठी कार्यक्रम साजरे करत आहे,त्याच दिवसापासून वंचितचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे भ्रष्ट व्यवस्थेविरोधात संघर्ष करत आहे.

# मनपा आयुक्तांनी नागरिकांशी साधला संवाद

## स्वच्छतेसंदर्भात प्रत्यक्ष पाहणी

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी पुर्व झोन क्र.३ कार्यालय, दस्तुरनगर परिसर, छत्री तलाव रोड परिसरातील स्वच्छतेसंदर्भात प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी दरम्यान आयुक्तांनी सदर परिसरातील स्वच्छतेबाबत आढावा घेवून संबंधीतांना निर्देशित करण्यात आले.

यावेळी पुर्व झोन क्र.३ कार्यालयाला भेट देत प्रत्यक्ष पाहणी करून मुख्यालयाची रचना व विभागांची व्यवस्था जाणून घेतली.सदर झोनच्या कर्मचा-यांमार्फत ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन नागरिकांना सहकार्य करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. सार्वजनिक बांधकाम विभाग, मजीप्रा, एमईसीबी, एमआयडीसी, रेल्वे यांच्या अखत्यारित असून शहर स्वच्छतेमध्ये त्यांचाही सक्रीय सहभाग अतिशय महत्वाचा आहे. पाहणादरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नितीन



बोबडे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, अमरावती शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपाच्यावतीने डॉक्टरांचा सत्कार



**अचलपूर/वार्ताहर**

डॉक्टर्स डे निमित्त परतवाडा शहरातील अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती चां सभागृहात जुळया शहरातील डॉक्टर मंडळींचा सत्कार सोहळ्याचे आयोजन भाजपा पक्ष अचलपूर शहर मंडळाच्या वतीने करण्यात आले होते .यावेळी अचलपूर - परतवाडा जुळया शहरातील विविध तज्ञ ,नामवंत डॉक्टर उपस्थित होते.सत्कार सोहळ्याचे आयोजन भाजपाचे शहराध्यक्ष कुंदन यादव यानी केले.

यावेळी मंचावर अचलपूर उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेंद्र ढोले ,डॉ. विजय सिरसमकर, डॉ.स्वप्नील भेले , डॉ.इंद्रनील ठाकरे , डॉ.कौस्तुभ ठाकरे , डॉ.अग्रवाल ,भाजपा पक्षाचे शहराध्यक्ष कुंदन यादव, तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे,विशाल काकड ,रुपेश ढेपे,निलेश नागापुरे आदी उपस्थित होते. यावेळी प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. कमल अग्रवाल , डॉ. अविनाशे सर ,डॉ. राजेंद्र बर्मा, डॉ. कौस्तुभ ठाकरे , डॉ. नरडे सर , डॉ. अश्लेष तिवारी , डॉ. निलेश खंडेलवाल , डॉ. राम तेजवानी , डॉ. प्रेम सहजवानी , डॉ. मोहित सर , डॉ. संदेश खंडेलवाल , डॉ. प्रणय उताने , डॉ.अजय उभाड , डॉ. तेजस कनाके आदी उपस्थित होते.या कार्यक्रमात रुग्णसेवक म्हणून सतीश शर्मा ,रुग्णवाहिका चालक स्वप्निल बोंडे यांचा समावेश आहे .यावेळी भाजपा पक्षाचे शंकर भाषांनी ,मनीष खंडेलवाल, प्रवीण मेहरे, निलेश तारे,सुनील चौधरी, राम महाराज चुलेट,गौरव रघुवंशी,श्याम साउरकर,मयंक शर्मा,शुभम सावरकर, पद्माकर घोगरे , विनोद पोटे, अनिरुद्ध महाराज मिश्रा, प्रफुल बर्वे,अरुण निराटकर,महेश देशमुख,अक्षय बुंदेले,गजानन शर्मा ,भूषण मेहरे तसेच महिला मंगला पारधी, उज्वला माकोडे,नैना भुसाटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# साफल्य विद्यालयात निरोप समारंभ

**लेहेगाव/वार्तहर**

साफल्य ग्रामीण विकास शिक्षण संस्था,नेरपिंगळाई व्दारा संचालित साफल्य विद्यालय, सावरखेड पिगंळाई येथे शारीरिक शिक्षक एस.बी.खैरकर यांचा सेवापुर्ती समारोह संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व.नानासाहेब मंगळे यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून संपन्न झाला. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष विजय मडके, सचिव संजयजी मंगळे, कोषाध्यक्ष अनिलजी भोजने, श्रीकांत जी देशमुख, सरस्वती विद्यानिकेतन खानापूर चे मुख्याध्यापक विनोद ढवळे , मोर्शी नगरपरिषदेच्या



माजी अध्यक्ष विद्या ढवळे, विद्यालयाच्या शाळा समितीचे सदस्य तथा पत्रकार कैलाससिंह ठाकुर,काकडे, डॉ. राऊत, विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक आर एन मोहोकर,डॉ. विनोद जी भोजने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.शांताबाई भुंबर, विद्यालयाचे निवृत्त शिक्षक जाणे , इनामदार, मडके, तुळशीदास गोहत्रे, खैरकर परिवारातील सर्व मंडळी संदीप साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयातर्फे व संस्थेतर्फे खैरेकर सरांचा सपत्नीक शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत पंचायत सावरखेड पिगंळाईच्या सरपंच जोमदे , ग्रामपंचायत सदस्य निलेश टारपे यांनी शाल श्रीफळ देऊन सावरखेड पिगंळाई वासिया तर्फे सत्कार केला. विनोद ढवळे, कैलास ठाकूर, संजय मंगळे, मोहकर सर, गोहत्रे भाऊसाहेब, विजय मडके यांनी आपल्या भाषणातून खैरकर यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संचालन एन बी सुळे प्रास्ताविक मुख्याध्यापक पी. एम. आजनकर यांनी केले. साबळे,जोमदे, आजनकर, परिसरातील गणमान्य नागरिक उपस्थित होते.

# उर्दू माध्यमाचे ११ वी,१२ वीचे महाविद्यालयीन शिक्षण सुरु करा

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरात ११ वी, १२ वीच्या उर्दु माध्यमाचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू करा अशा मागणीचे निवेदन स्थानिक मुस्लीम समुदायातर्फे आमदार प्रताप अडसड यांना शनिवारी (ता. २८) नगर परिषद मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू पुर्व माध्यमिक शाळेत देण्यात आले.

शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी शासनातर्फे विशेष लक्ष दिले जाते. असे असतांना चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यातील उर्दु माध्यमाचे विद्यार्थी मात्र महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहत आहे. चांदूर रेल्वे शहरात दोन हजाराच्या जवळपास मुस्लीम समाजाची लोकसंख्या आहे. याशिवाय ग्रामिण भागातही मुस्लीम लोकसंख्या अधिक आहे. शहरात स्थानिक नगर परीषद व्दारा संचालित मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू पुर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा असून येथे दहाविचे शिक्षण आहे. मात्र चांदूर रेल्वे तालुक्याचे ठिकाण असतांनाही याठिकाणी केवळ



आमदार प्रताप अडसड यांना निवेदन

दहावीपर्यंत उर्दु माध्यमाचे शिक्षण आहे. परिस्थिती अभावी अनेक विद्यार्थी दहावीनंतरच्या पुढील शिक्षणासाठी बाहेरगावी जाऊ शकत नाही. तसेच धामणगाव मतदारसंघात तीनही तालुक्यात उर्दु माध्यमाचे सायन्स महाविद्यालय नसुन सदर महाविद्यालय चांदूर रेल्वे शहरात झाल्यास त्याचा लाभ तिन्ही तालुक्यातील विद्यार्थ्यांना होऊ शकतो. याबाबत अनेकवेळा निवेदने देऊन उर्दु माध्यमाचे ११ वी, १२ वी चे शिक्षण सुरू करण्याची मागणी केली होती. अशातच ११-१२ वर्षापुर्वी एक वेळा यासंदर्भात स्थानिक नगर परीषदमध्ये ठराव घेण्यात आला होता. मात्र त्याची अंमलबजावणी पुढे झालेली नाही.

त्यामुळे आमच्या मागणीचा विचार करून उर्दू माध्यमाचे अकरावी व बारावीचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू करावे या मागणीचे निवेदन नागरिकांनी आ. प्रताप अडसड यांना दिले. यावेळी आ. प्रताप अडसड यांनी सकारात्मक चर्चा नागरिकांसोबत केली. निवेदन देतेवेळी परवेज आलम, मोहम्मद इम्रान, राजीक शेख, सैय्यद ऐजाज, सैय्यद कैस, अजहर हुसैन, वाजीद खान, आमीर पठान, शेख सोहेल शेख रहीम, इम्रान सौदागर (शासकीय कंत्राटदार), अब्दुल फहिम, शहेजाद पठान, शेख गफ्फार, नुरूलहसन कुरैशी, सैय्यद जाकीर, युसुफ सौदागर, इरफान कुरैशी यांच्यासह भाजपा शहराध्यक्ष नंदा वाधवानी, माजी नगरसेवक अजय हजारे, पप्पू भालेराव आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त



### वसंतराव नाईक यांना अभिवादन

**अमरावती-** महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विजय जाधव यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही यावेळी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहीली.

### सोमवारी महिला लोकशाही दिन

**अमरावती-** जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, दि. ७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. महिलांनी त्यांच्या तक्रारी विहित नमुन्यात व आवश्यक कागदपत्रांसह सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

### उद्या अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती -** डॉ . हेडगेवार हॉस्पीटलद्वारा संचालित, साई नगरजवळच्या अकोली रोडवरील डॉ. हेडगेवार हॉस्पिटलच्या उपकेंद्रामध्ये निःशुल्क अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबीर ४ जुलैला दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत आयोजित केले आहे. जॉइंट रिप्लेसमेंट व ट्रौमा सर्जन डॉ. अभिलाष पोहोकार हे रुग्ण तपासणी आणि निदान करतील आणि उपचार सुचवतील. अस्थिरोग (ऑर्थो) सर्जन डॉ. पोहोकार यांचे तपासणी शिबीर दु .१२ ते ३ वा .प. तसेच डॉ . वसुंधरा घोडेस्वार (जनरल फिजीशियन) या अन्य आजारांसाठी रुग्ण तपासणी दु .१२ ते ३ वा .प. करतील.शिबिरात संधिवात, पाठ, मानदुखी, कंबरदुखी, गुडघादुखी, टाच दुखणे, फ्रॅक्चर, लिगामेंट टियर आणि इतर गंभीर दुखापती असलेल्या रुग्णांनी तसेच ताप, सर्दी, खोकला, अस्थमा, स्त्री रोग निदान, मुलांचे आजार असल्यास नाव नोंदणीसाठी प्रत्यक्ष डॉ.हेडगेवार हॉस्पिटल, दुकान नं.१३, खंडेलवाल मार्केट, अकोली रोड, राधे राधे दुध डेअरीजवळ, साईनगर, अमरावती येथे किंवा ७७६९०८६३८३ / ८४४६१३२९९५ या क्रमांकावर संपर्क साधावा.



### शेंदुर्जना बाजार येथे कृषीदिन साजरा

**तिवसा-** स्व.आर जी देशमुख कृषी महाविद्यालय तिवसा येथील सातव्या सत्राच्या कृषी दुतांनी ग्रामपंचायत कार्यालय शेंदूर्जना बाजार येथे महाराष्ट्र कृषी दिवस उत्साहात साजरा केला. कार्यक्रमाला सरपंच तसेच उपसरपंच व तसेच गावातील पोलीस पाटील तसेच गावातील शेतकरी बंधू-भगिनी आदी उपस्थित होते कृषीदूत यांनी शेतकऱ्यांना कृषी दिनाबद्दल मार्गदर्शन केले.त्यानंतर कार्यक्रमाचा शेवट हा वृक्षारोपणाने झाला.मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील प्राचार्य अरुण डहाके तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा. सावंत राठी,प्रा.मनोज लुंगे लाभलें. कृषीदूत राज चव्हाण,चिराग धांदे,सारंग हीवसे,साक्षी घोडमारे, तेजस्विनी इंगोले उपस्थित राहून परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाला सरपंच व ग्रामीण भागातील शेतकरी उपस्थित होते.



### राजेश पहुरकर यांचा सेवानिवृत्ती सत्कार

**अंजनगाव बारी-** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बारी येथील प्रयोगशाळा सहाय्यक राजेश शांताराम पहुरकर हे सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवा गौरव व सत्कार सोहळा शाळेच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महादेवर चकुले तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून रामेश्वरजी लाड सभापती गांधी विद्यालय बडनेरा, सोमेश्वर इंगोले न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा, प्राचार्य विनोद मुगल, पर्यवेक्षक गजेंद्र अवघड उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य विनोद मुगल यांनी केले. न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा चे अध्यक्ष डॉ. हेमंत देव, उपाध्यक्ष राजूभाऊ टारपे यांनी सुद्धा राजेश पहूरकर यांना भावी आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सत्कारमूर्ती राजेश पहुरकर व त्यांच्या सहचारिणी भूमिका पहुरकर यांचा सत्कार महादेव चकुले यांच्या हस्ते शाल श्रीफळ भेटवस्तू आणि सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. तसेच न्यू एज्युकेशन सोसायटी क्रेडिट कॉपरेटिव्ह लिमिटेड सोसायटी बडनेराचे सचिव रामदासजी ब्राह्मणे तसेच प्राचार्य विनोद मुगल, गजेंद्र अवघड यांच्या हस्ते सुद्धा राजेश पहुरकर यांचा धनादेश भेटवस्तू आणि शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर सहाय्यक शिक्षक महेंद्र उराडे, रामदास ब्राह्मणे यांनी मनोगत व्यक्त केले गजेंद्र अवघड यांनी आभार व्यक्त केले.संचालन अमोल डवरे यांनी केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी तसेच राजेश पहुरकर यांचे पुत्र ऋतुराज पहुरकर, ऋतुजा पहुरकर, त्यांचे भाऊ, पुतणे असा आप्त परिवार उपस्थित होता.



### शोभा आसोलकर यांचे निधन

**बेलोर-** येथील माजी सैनिक रामदास आसोलकर यांच्या पत्नी शोभा रामदास आसोलकर यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्या ६५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात सुन, मुले व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# प्लास्टिक प्रदूषणामुळे समस्त जीवसृष्टीवर ओढवले संकट

जगात करण्यात आलेले सर्व शोध मानवजातीच्या विकासा साठी केले गेले, पण मानवाने आपल्या गरजांच्या मर्यादा तोडल्या आणि आपल्या स्वार्थ, लालसेप्रमाणे वागू लागले, परिणामी स्वतःसाठी तसेच संपूर्ण जगासाठी विनाशाचा रणशिंग फुंकला. असेच प्लास्टिक प्रदूषण आज आपल्या पृथ्वीसाठी एक मोठी समस्या बनले आहे. जमीन असो, आकाश, पाणी किंवा हवा असो, संपूर्ण वातावरणात प्लास्टिक प्रदूषणाने जीवनाला धोका निर्माण केला आहे आणि हा धोका वेगाने प्राणघातक पातळीवर वाढत आहे, तरीही लोक हे समजून घेण्यास तयार नाहीत. आपण अनेकदा पाहतो की विशिष्ट प्लास्टिक पिशव्या आणि इतर प्लास्टिक साहित्यांवर बंदी असूनही, त्यांचा वापर बेकायदेशीरपणे केला जात आहे. प्लास्टिक प्रदूषण जीवनचक्र विस्कळीत करून फार नुकसान करत आहे. या समस्येचे गांभीर्य समजून घेण्यासाठी, दरवर्षी ३ जुलै रोजी 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन' साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम 'एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करा आणि शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन द्या' आहे. ही थीम डिस्पोजेबल प्लास्टिक पिशव्यांची समस्या संपवण्याच्या गरजेवर भर देते आणि पुन्हा वापरता येण्याजोग्या पर्यायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करते. प्लास्टिक प्रदूषणाच्या पर्यावरणीय परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि प्लास्टिकमुक्त भविष्यासाठी कृती करण्यास प्रेरणा देणे हे देखील या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार, दरवर्षी ४६० दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा जास्त प्लास्टिकचे उत्पादन होते. बांधकामापासून वाहनांपर्यंत, इलेक्ट्रॉनिक्स ते शेतीपर्यंत, जवळजवळ सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये आणि सर्व ग्राहकांद्वारे प्लास्टिकचा वापर केला जातो. २०१९ मध्ये पर्यावरणातील एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्यापैकी ८८ टक्के, किंवा अंदाजे २० दशलक्ष मेट्रिक टन, मॅक्रोप्लास्टिक्स होते, जे सर्व परिसंस्थांना प्रदूषित करतात. जगातील बहुतेक प्लास्टिक प्रदूषण हे बाटल्या, टोप्या, शॉपिंग बॅग, कप, स्ट्रॉ यासारख्या एकदा वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमधून होते. दररोज २००० ट्रक प्लास्टिक कचरा जगातील महासागर, नद्या आणि तलावांमध्ये टाकला जातो. यूएनईपी २०२५ नुसार, आतापर्यंत उत्पादित झालेल्या प्लास्टिकपैकी फक्त ९ टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर म्हणजे रिसायकल करण्यात आला आहे. ईएमएफ २०१६ नुसार, २०५० पर्यंत समुद्रात माशांपेक्षा जास्त प्लास्टिक असू शकते. यूके सरकारच्या २०१८ च्या अहवालानुसार, सागरी प्लास्टिक प्रदूषणामुळे दरवर्षी १,००,००० हून अधिक सागरी सस्तन प्राणी आणि दहा लाख समुद्री पक्षी मृत्युमुखी पडतात. सर्व समुद्री कचऱ्यापैकी ८० टक्के हे प्लास्टिक आहे. प्लास्टिक हा एक न विघटनशील कचरा आहे जो हजार वर्षांपर्यंत टिकू शकतो. १९५० पासून जगभरात ९.२ अब्ज टनांपेक्षा जास्त प्लास्टिक तयार झाले आहे, त्यापैकी सुमारे ७ अब्ज टन कचरा म्हणून टाकून देण्यात आला आहे. गेल्या चार दशकांत जागतिक प्लास्टिक कचऱ्याचे उत्पादन सात पटीने वाढले आहे असे स्टेटिस्टा दाखवते. आशिया हा असा प्रदेश आहे जो सर्वात जास्त अनियंत्रित प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो जागतिक एकूण कचऱ्यापैकी ६५ टक्के आहे.

आपल्या अन्नातून, पिण्याच्या पाण्यातून आणि श्वास घेत असलेल्या ऑक्सिजनमधूनही प्लास्टिकचे प्रदूषण आपल्या शरीरात प्रवेश करते. सौर किरणे, वारा, प्रवाह आणि इतर नैसर्गिक घटकांमुळे प्लास्टिकचे सूक्ष्म प्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिक्समध्ये विघटन



## आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन विशेष

होते. नॅनोप्लास्टिक्स शरीरात सहजपणे प्रवेश करू शकतात. आपल्या हृदयात, फुफ्फुसात, यकृतात, प्लीहामध्ये, मूत्रपिंडात आणि मेंदूमध्येही सूक्ष्म प्लास्टिक आढळले आहे आणि अलीकडील एका अभ्यासात नवजात मुलांच्या प्लेसेंटामध्ये सूक्ष्म प्लास्टिक आढळून आले आहे. प्लास्टिकमधून बाहेर पडणारी किमान ४,२१९ रसायने चिंतेचा विषय आहेत. समुद्रात २४ ट्रिलियन सूक्ष्म प्लास्टिकच्या तुकड्यांसह, सागरी जीव बहुतेकदा प्लास्टिकचे सेवन करतात. जेव्हा मानव सागरी जीव खातात तेव्हा ते प्लास्टिक मानवी शरीरात प्रवेश करते. संशोधकांचा अंदाज आहे की सरासरी व्यक्ती दरवर्षी समुद्री खाद्यपदार्थांमधून सुमारे ५३,८६४ सूक्ष्म प्लास्टिक कण खातो.

भारतात दरडोई प्लास्टिकचा वापर दरवर्षी अंदाजे ११ किलोपर्यंत वाढला आहे आणि तो वाढतच राहण्याची शक्यता आहे. दरवर्षी ५.८ दशलक्ष टनांहून अधिक प्लास्टिक कचरा जाळला जातो, ज्यामुळे हवेत डायऑक्सिनसह अनेक हानिकारक प्रदूषक सोडले जातात, ज्यामुळे श्वसनाचे आजार होतात आणि कर्करोगाचा धोका वाढतो. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनुसार, प्लास्टिक कचऱ्याचे योग्य संकलन न केल्यास २०३० पर्यंत भारताला १३३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त भौतिक मूल्याचे नुकसान होऊ शकते. नेचरमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, भारत प्लास्टिक प्रदूषणात जगातील सर्वात मोठा वाटा देणारा देश बनला आहे, जो एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्याच्या जवळपास २० टक्के आहे. भारत दरवर्षी ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो पर्यावरण प्रदूषणाच्या बाबतीत जगातील इतर कोणत्याही प्रदेशापेक्षा जास्त आहे. भारताचा अधिकृत कचरा संकलन दर ९५ टक्के आहे, तर संशोधनातून असे दिसून आले आहे की प्रत्यक्ष दर ८१ टक्के आहे. अलीकडील आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, भारतातील दररोजच्या प्लास्टिक कचऱ्यापैकी फक्त ८-१० टक्के रिसायकल केला जातो, उर्वरित जाळला जातो किंवा लँडफिल आणि जलमार्गांमध्ये टाकला जातो.

प्लास्टिक पिशव्यांमुळे प्राण्यांचा मृत्यू होतो, ते जैविकरित्या विघटित होत नाहीत, प्लास्टिक पिशव्या पेट्रोलियम उत्पादनांपासून बनवल्या जातात, त्यांच्या उत्पादनादरम्यान विषारी रसायने सोडली जातात. प्लास्टिक अन्न साठवणुकीच्या पॅकेजेसमध्ये विषारी रसायने असतात. प्लास्टिक पिशव्यांचे मोठे संचय अनेकदा ड्रेनेज सिस्टममध्ये अडथळा आणतात. प्लास्टिक पिशव्यांमुळे मुलांमध्ये फुफ्फुसांच्या गुंतागुंतीचा धोका वाढतो आणि महिलांमध्ये प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो, तसेच प्लास्टिकमुळे पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचा धोका देखील वाढू शकतो. प्लास्टिक पिशव्या भूजल प्रदूषित करतात, प्लास्टिक प्रदूषणामुळे नैसर्गिक अन्नसाखळी विस्कळीत होते. प्लास्टिक पिशव्यांच्या उत्पादनात भरपूर पाणी वापरले जाते.

अज्ञान म्हणा किंवा निष्काळजीपणा, लोक गरम अन्नपदार्थ पॅक करण्यासाठी प्लास्टिकच्या कॅरी बॅगचा वापर करतात. आपण आपल्या आजूबाजूला पाहतो की लोक लहान-लहान कॅरी बॅगमध्ये गरम पेये, चहा, कॉफी घेऊन जातात. अनेक हॉटेल, रेस्टॉरंट किंवा रस्त्यावर स्ट्रीट फूड, नाश्ता, अन्न देखील प्लास्टिकच्या प्लेटमध्ये खाल्ले जाते किंवा प्लास्टिकच्या कॅरी बॅग पार्सल म्हणून वापरल्या जातात, जे आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे. प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये गरम अन्न किंवा खाद्य ठेवणे हे विषासारखे आहे, कारण गरम अन्नपदार्थ प्लास्टिकच्या संपर्कात येताच रासायनिक प्रक्रिया सुरू करतात. प्लास्टिक गरम होताच, त्यातून बाहेर पडणारे हानिकारक रसायने अन्नपदार्थांमध्ये शोषले जातात आणि ते अन्न सेवन करून माणूस थेट प्राणघातक आजारांना आमंत्रण देतो. हे सर्व माहित असूनही, देशात अन्नपदार्थांसाठी प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

ग्राहकांच्या मागणी पूर्ण करण्यासाठी प्लास्टिकचे उत्पादन केले जाते, जर आपण ग्राहक प्लास्टिकपासून दूर राहिलो तर ही समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकते. प्लास्टिकला इतर पर्यायांचा अवलंब, पर्यावरण वाचवण्यासाठी जागरूकता आणि आपली प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक आहे. सर्वप्रथम, आपला स्वार्थ आणि आळस सोडून द्या, सरकारी धोरणे आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करा. मग प्लास्टिकला शक्य असलेले पर्याय स्वीकारा. वापरा आणि फेकून द्या सारख्या वस्तूंना नाही म्हणा. प्लास्टिकच्या पिशव्या पूर्णपणे विसरून जा, अन्नपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये प्लास्टिक वापरणे टाळा. आज प्लास्टिक ही सोय आहे पण आयुष्यभरासाठी धोका आहे, हे समजून घ्या. पर्यावरण आपल्याला चांगले जीवन देण्यासाठी आहे, जर आपण आपले पर्यावरण नष्ट केले तर पर्यावरण आपल्याला देखील नष्ट करेल. याचे गांभीर्य समजून घ्या आणि जागरूक नागरिकाचे कर्तव्य बजावा.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**
०८२३७४ १७०४१

# सोशल मीडिया आणि वैवाहिक जीवन

पूर्वीचा काळ आणि हल्लीचा काळ यामध्ये मोठा बदल झाला आहे तो म्हणजे वाढत्या समाज माध्यमांचा किंवा मोबाइलचा वापर. या मोबाइलच्या वापराचे शारीरिक आणि मानसिक परिणाम जवळपास सगळ्यांनाच माहीत आहे; परंतु या समाज माध्यमांचा वैवाहिक जीवनावर देखील फार मोठा परिणाम होतो. हल्ली सगळ्यांचेच जीवन धकाधकीचे आहे. त्यामुळे जास्तीत जास्त काळ हा घराबाहेर कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी, पैसे कमावण्यामध्ये जातो. त्यानंतर घरी आल्यावर निदान पती-पत्नीने एकत्र वेळ घालवणे हे कौटुंबिक स्वास्थ्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते; परंतु हल्ली असे चित्र पाहायला मिळते की, एकमेकांमधील संवाद कमी होऊन प्रत्येकजण घरामध्ये आपापल्या मोबाइलमध्ये काहीतरी बघण्यात किंवा सोशल वेबसाईटवर चॅटिंग करण्यामध्ये व्यस्त असतात. यामुळे पती-पत्नी या नात्यामध्ये दुरावे वाढत आहेत. त्यातूनच संशय, भांडण, विवाहबाह्य संबंध आणि घटस्फोट वाढीस लागले आहेत.

सोशल माध्यम आणि डिजिटलायझेशनमुळे जग जवळ आलेले आहे. पटकन कधीही कोणालाही संपर्क साधता येतो. पूर्वी पत्र, टपाल, तार, आंतरदेशी कार्ड अशा माध्यमातून एकमेकांच्या भावना लेखी स्वरूपात पोहोचवता यायच्या आणि त्या पोहोचायला भरपूर कालावधी लागायचा; परंतु हल्ली एका मॅसेजेसने अगदी एका सेकंदांच्या आत समोरच्याला आपल्या भावना पोहोचवता येतात. त्याचे चांगले आणि वाईट परिणाम दोन्ही पाहायला मिळतात. हल्ली जेव्हा घरात पार्टनर बोलत नाही तेव्हा ऑनलाइन उपलब्ध असलेल्या मित्र-मैत्रिणींशी संवाद साधण्यामध्ये वेळ मार्गी लावतात आणि चॅटिंगद्वारे एकमेकांच्या संपर्कात येतात. अशा संबंधातून वैवाहिक जीवन विस्कळीत होते.

विविध टेलिव्हिजनवरील मालिका, ओटीटी प्लॅटफॉर्म वरील वेब सिरीज, शॉर्ट फिल्म यांमध्ये विवाहबाह्य संबंध यावरील अनेक लघुपट आणि चित्रण दाखवण्यात येते. अशा कथांमुळे देखील मानसिकरीत्या बदल होऊन आपल्या खऱ्या आयुष्यामध्ये देखील पती किंवा पत्नी त्याचे अनुकरण करतात व



यामुळे देखील विवाहबाह्य संबंध जसे की फ्रेंड्स विथ बेनिफिट किंवा फ्रेंड्स फॉर टाईमबिंग, लिव्ह इन रिलेशनशिप, सीचुएशनशिप, वन नाईट स्टॅण्ड, प्रस्थापित होण्यास हातभार लागतो. लिहून भावना व्यक्त करणं जास्त सुखकारक व सोयीस्कर असतं. त्यामुळे लहान-मोठे सगळेच चॅटिंगच्या राक्षसाला बळी पडत आहेत. विविध समाज माध्यमांवर अनेक सोशल ग्रुप उदयाला येत आहेत. आपल्या जोडीदाराला देणारा हक्काचा वेळ या अशा मित्र-मैत्रिणींच्या ग्रुपवर घालवल्यामुळे पती-पत्नीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरसमज होऊन नाती तुटत चालली आहेत. महिला व पुरुष दोघांनाही समाज माध्यमांवरील अशा ग्रुपमध्ये फिरण्यात आणि गप्पा मारण्यात कुटुंबापेक्षा जास्त मजा येत असल्याने काही कुटुंबात कौटुंबिक जवळीक लोप पावत चालली आहे. हल्ली सोशल मीडियावरील रील्स बघण्याचे व्यसन जोर धरत आहे. इतरांच्या कौटुंबिक सहली किंवा इतर पती-पत्नीने एकमेकांचे वाढदिवस, ॲनिव्हर्सरी निमित्ताने टाकलेले फोटो पाहून, एकमेकांची तुलना व हेवेदावे करून राग, मत्सर, द्वेष निर्माण होऊन पती-पत्नीमध्ये भांडणे वाढत चालली आहेत. नवरा किंवा बायकोची फ्रेंड लिस्ट, त्यांचे मित्र-मैत्रिणी सोबत होणारे संवाद या गोष्टींमुळे देखील पत्नीमध्ये गैरसमज वाढीस लागतात आणि ते एकमेकांना ब्लॉक करतात. पती पत्नी भांडणानंतर आपला राग सोशल मीडियावर पोस्ट टाकून व्यक्त करतात.

सोशल मीडियाचा पती-पत्नीच्या नात्यावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही याची खात्री करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे जर पती- पत्नीचे एकमेकांसोबत खुले सोशल मीडिया संबंध असतील. याचा अर्थ पासवर्ड शेअर करणे आणि जोडीदाराला आवडणार नाही अशी कोणतीही गोष्ट कधीही शेअर न करणे, लाईक करणे किंवा प्रतिक्रिया देणे टाळणे. सोशल मीडियावर शेअर करत असलेल्या गोष्टी मर्यादित करणे. काही जोडीदार बहुतेकदा त्यांच्या घराच्या गोपनीयतेत जे घडते ते तिथेच राहणे आवडते आणि जास्त शेअरिंगमुळे कधीकधी दोन किंवा अधिक कुटुंबातील सदस्यांमध्ये भांडण होऊ शकते. आपल्या जोडीदाराची किंवा जीवनशैलीची तुलना ऑनलाइन पाहणाऱ्या इतर कोणाशीही करू नये. बहुतेकदा, सोशल मीडिया अकाउंट संपूर्ण घटना शेअर करत नाहीत आणि काही फोटो आणि व्हीडिओंच्या पडद्यामागे काय चालले आहे याची कल्पनाही नसते. जेव्हा सोशल मीडियावर पती-पत्नी गोष्टी शेअर करता तेव्हा मजेदार, आनंददायी गोष्टी शेअर करा आणि चांगल्या काळाची आठवण ठेवण्यासाठी त्या तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर केल्याने त्यांना देखील आनंद होईल. तसेच सोशल मीडिया वापरताना पती-पत्नीने एकमेकांना प्राधान्य देणे फार गरजेचे आहे. त्यामुळे सोशल मीडिया वापरताना पती-पत्नीमध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता असल्यास घटस्फोटाचे प्रमाण नक्कीच कमी होण्यास मदत होईल.

**आरती बनसोडे**

# 'छोट्या छोट्या गोष्टी जगण्याची देती दृष्टी'
## बालकिशोर मुलांसाठी सुंदर पुस्तक

ॲड.डॉ.नीता प्रफुल्ल कचवे यांचे बालकिशोर मुलांसाठी सुंदर पुस्तक म्हणजे 'छोट्या छोट्या गोष्टी जगण्याची देती दृष्टी' हे आहे.बालसाहित्याचा मुख्य उद्देश मुलांचे मनोरंजन करणे, त्यांना ज्ञान देणे, आणि त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे हे तिन्ही हेतू सदरच्या पुस्तकात दिसून येतात. बालसाहित्य स्वरूप पाहिले तर लक्षात येते. बडबडगीते, बालकथा, बालकविता, नितीकथा, साहसकथा, गोष्टी, नाटके, चित्र पुस्तके असे स्वरूप दिसून येते. सदरचे पुस्तक हे बालकथा स्वरूपात आहे. अंगाई गीते, आजीबाईच्या गोष्टी यातून पुर्वी मुलांना नैतिक शिक्षण मिळत असे. आज मात्र मोबाईलमुळे मुलांमध्ये वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे हा गांभीर्याचा विषय आहे.'वाचाल तर वाचाल' ही जीवन जगण्याची कला पुस्तक देतात. आभासी जगात कृत्रिम बुध्दीमत्तेच्या आधुनिक जगात मानवतेचा आणि करूणेचा जिवंत झरा म्हणजे पुस्तकं आहेत. हॅरी पॉटरच्या गोष्टी, छोट्या भीमच्या गोष्टी मुलांना आवडतात.बालसाहित्य मुलांच्या मानसिक, भावनिक, आणि



### समीक्षण

सामाजिक विकासासाठी महत्वाचे आहे.यामुळे मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होते. वि. वा. शिरवाडकर, वि. म.कुलकर्णी, ग. दि. माडगुळकर, सानेगुरुजी, शांता शेळके, शिवाजी सावंत, रणजित देसाई यांचे बालकिशोर मुलांसाठी सुंदर बालसाहित्य मराठी साहित्य विश्वात महत्वाचे योगदान देणारे आहे.बालसाहित्याची दखल घेतली जात नाही असा आक्षेप घेतला जातो. बालसाहित्याची समिक्षा केली जात नाही. असे बोलले जाते. वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल.देशपांडे, वि.दा. करंदीकर, मंगेश पाडगांवकर यांनी देखील बालसाहित्य विश्वात मोलाची भर घातली आहे. काळानुसार बदलते स्वरूप बालसाहित्यात आले पाहिजे. अशी अपेक्षा बालसाहित्याविषयी केली जाते.याच माध्यमातून ॲड. डॉ.नीता प्रफुल्ल कचवे यांचे अभिनंदन करावेसे वाटते. कारण त्यांनी मराठी, हिन्दी, इंग्रजी तिन्ही भाषेतून बालसाहित्याचे पुस्तकं बालकिशोर मुलांसाठी लिहीलेली आहेत.संस्कार एक मौलिक शिक्षा आणि moral stories हे पुस्तक देखील सुंदर, सहज सोप्या भाषाशैलीतील बालसाहित्य आहे.बालकिशोर मुलांसोबत संवाद साधतांना लेखक दा.गो.काळे लिहीतात, नीताताई आपल्यासाठी जगण्याला पूरक, प्रेरक व सुंदर करणाऱ्या काही गोष्टी या पुस्तकाच्या माध्यमातून घेऊन आलेल्या आहेत. या पुस्तकाच्या मलपृष्ठावरील डॉ. प्रफुल्ल कचवे (शिक्षणाधिकारी)यांची समर्पक कथासंग्रहाचा आरसाच जणू अशी सुंदर पाठराखण आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ सुंदर आहे. सुंदर कलाकृती साठी लेखिकेचे अभिनंदन आणि पुढील लेखनासाठी अनेक शुभेच्छा!!

**प्रज्ञा हंसराज बागुल**
दिग्रस जि.यवतमाळ




# विद्यापीठातील गृहविज्ञान विभाग शैक्षणिक व विस्तार उपक्रमात अग्रेसर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच गृहविज्ञान विभाग कार्यरत आहे. गृह विज्ञान विभाग आजतागायत शैक्षणिक व विस्तार उपक्रमामध्ये अग्रेसर आहे. विभागामध्ये विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, संशोधन व विस्तार उपक्रमाच्या विविध सुविधा उपलब्ध आहेत.

सुसज्ज प्रयोगशाळा व इंटर्नशिपच्या संधी- विभागाची स्वतंत्र इमारत, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, सेमिनार हॉल, कॉम्प्युटर लॅब, मेडीटेशन हॉल, लायब्रारी अशा सुविधांनी सुसज्ज आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासाठी अभ्याक्रमासह विविध विस्तार कार्यक्रम व उपक्रम विभागाव्दारे राबविले जातात. विभागाचे विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत असून अनेक शैक्षणिक व संशोधन क्षेत्रासोबतच विविध सार्वजनिक व खाजगी आस्थापना, उपक्रमांमध्ये कार्यरत आहेत. सोबतच फुड इंडस्ट्री, जिम, विस्तार कार्यक्रम, कृषी विज्ञान केंद्र, सामाजिक कार्यात असलेल्या गैरसरकारी संस्थांमध्ये विभागाच्या विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट झालेले आहे. सेमिनारकरिता विद्यार्थ्यांना प्रेझेन्टेशन तयार करणे, सादरीकरणाचे कौशल्य आत्मसात करता येणे तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांना ओळख होते. विभागाच्या अभ्यासक्रमांना इंटर्नशिप लागू असून प्रतिष्ठित आस्थापनांवर विद्यार्थ्यांनी आवश्यक अशी इंटर्नशिप केलेली आहे.

अमरावती शहरातील झेनिथ हॉस्पिटल, रेडीयंट हॉस्पिटल, नागपुरातील ऑरीअस हॉस्पिटल, केअर हॉस्पिटल, किंग्जवे हॉस्पिटल येथील डायटेटिक्स विभागात आहार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्याचप्रमाणे नागपूर येथील सुंदर बिस्कीट व इतर फुड इंडीस्ट्री, कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर, दिव्य सदन, अमरावती व अन्य एनजीओमध्ये देखील विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप करून प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतला आहे.

विस्तार कार्यक्रमांद्वारे जनजागृती- डॉ.मोतीलाल राठी यांच्याकडून प्राप्त दाननिधीतून विभागातर्फे डॉ. मोतीलाल राठी जनस्वास्थ्यासाठी जनजागृती कार्यशाळा, राष्ट्रीय पोषण अंतर्गत सप्टेंबर महिन्यात जागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन, आहार प्रदर्शनी, रोल प्ले, रॅली, घोषवाक्ये, रानभाज्यांबद्दल माहिती, तज्ज्ञांची माहितीपर भाषणे याद्वारे पोषणविषयक जनजागृती, जागतिक ह्रदय दिनानिमित्त दरवर्षी झेनिथ हॉस्पिटलच्या सहकार्याने आहार प्रदर्शनीचे आयोजन केले जाते. शाळा, महाविद्यालयांमध्ये देखील विभागातर्फे स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींसाठी परिणामकारक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विद्यापीठाच्या टी.आर.डी. ई. ए. उपक्रमाअंतर्गत पाप्युलर टॉक व वर्कशॉप चे आयोजन सुध्दा केले जाते.


विभागातील अभ्यासक्रम व पात्रता- नवीन शैक्षणिक धोरणानुसार विभागात पदव्युत्तर स्तरावरचे तीन अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यासाठी एम.एस्सी. इन फुड सायन्स ॲन्ड न्युट्रिशन, फुड ॲन्ड न्युट्रिशन या अभ्यासक्रमासाठी बी.एस्सी. विथ होमसायन्स, कम्युनिटी सायन्स, फॅमिली ॲन्ड कम्युनिटी सायन्स, न्युट्रिशन विथ डायटेटीक्स / अप्लाईड न्युट्रिशन / फुड सायन्स /मायक्रोबायोलॉजी /बायोकेमिस्ट्री /लाईफ सायन्स /बायोटेक्नॉलॉजी / ॲग्रीकल्चर्स बायोटेक्नॉलॉजी / बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी फुड टेक्नॉलॉजी / हॉटेल मॅनेजमेंट / बॅचलर ऑफ मेडिसीन /बी. व्होकेशनल एम. व्होकेशनल डिग्री कोर्स इन फुड प्रोसेसिंग ॲन्ड प्रीझर्व्हेशन / फुड प्रोसेसिंग ॲन्ड व्हॅल्यू ॲडीशन / हॉटेल मॅनेजमेंट / ग्रीकलचर्स फुड / प्रोसेसिंग /फुड प्रीझर्व्हेशन टेक्नॉलॉजी / फुड प्रोसेसिंग ॲन्ड मॅनेजमेंट. एम.एस.सी.इन कम्युनिकेशन एक्सटेंशन बी.एस्सी. विथ होमसायन्स, कम्युनिटी सायन्स, फॅमिली ॲन्ड कम्युनिटी सायन्स, डेव्हलपमेंट कम्युनिकेशन ॲन्ड एक्सटेंशन / बी. एस. सी. एक्सटेंशन एज्यूकेशन / बी. एस. सी. ॲग्रीकल्चर्स / बॅचलर ऑफ सोशल वर्क/ मास्टर ऑफ सोशल वर्क. बी.ए. इन मास कम्युनिकेशन बी.ए. इन रुरल डेव्हलपमेंट / ट्रायबल डेव्हलप मेंट / ट्रायबल स्टडिज. बी. व्होकेशनल /एम व्होकेशनल डिग्री कोर्स इन जर्नालीझम ॲन्ड मीडिया मॅनेजमेंट. बी. व्होकेशनल /एम. व्होकेशनल डिग्री कोर्स इन ॲग्रीकल्चर्स ॲन्ड ॲग्रीकल्चर्स सायन्स. एम.एस.सी.इन रिसोर्स मॅनेजमेंट बी.एस.सी. विथ होमसायन्स, (जनरल किंवा स्पेशलायझेशन इन रिसोर्स मॅनेजमेंट / फॅमिली रिसोर्स मॅनेजमेंट किंवा इतर स्पेशलायझेशन्स ) किंवा बी.एस.सी. कम्युनिटी सायन्स किंवा बी.एस.सी. फॅमिली ॲन्ड कम्युनिटी सायन्स, बी.बी.ए., बी. कॉम., बी. टेक. इन्टेरिअर डिझायनिंग, बी व्होकेशनल /एम. व्होकेशनल / डिग्री कोर्स इन ट्राव्हेल ॲन्ड टुरिझम /ऑफिस ओटोमेशन ॲन्ड ई सर्विसेस. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या वेबसाईटवर देखील विद्यार्थ्यांना पाहता येईल. प्रवेशोच्छूक विद्यार्थ्यांनी विभाग प्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.

# वृक्ष संगोपनाच्या नावावर कोट्यवधींचा घोटाळा ?

■ नासीर शेख ■

**खेट्री : पातूर तालुक्यात वृक्ष संगोपनाच्या नावावर कोट्यवधी रुपयांचा अपहार सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत मजुरांच्या नावावर देयके काढून त्याचा अपहार केला जात असल्याचा आरोप होत आहे. वृक्ष संगोपनासाठी जिओ-टॅगिंगच्या माध्यमातून मजुरांची उपस्थिती दाखवली जाते मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी काम न करता देयके काढली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.**

## पातूर तालुक्यातील गंभीर प्रकार : अभियंत्यांची भेट फक्त कागदावर



तालुक्यातील वृक्ष लागवडीची मोहीम कंत्राटी पद्धतीने राबवली जाते. यामध्ये अनेक कंत्राटदार राजकीय पाठबळ असलेले असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर दबाव टाकून कागदोपत्री वृक्ष लागवड मोहीम राबवित आहे. काही ठिकाणी तर लागवडीची संख्या नामशेष आहे. परिणामी शासनाची फसवणूक होत असून कोट्यवधींचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप याप्रकरणी केल्या जात आहे. तर या संपूर्ण कामांचे थर्ड पार्टी ऑडिट झाल्यास किंवा विशेष चौकशी समिती नेमत चौकशी केल्यास हा संपूर्ण प्रकार उघडकीस येणार असल्याचे बोलल्या जात आहे.

**अभियंत्यांची भेट कागदावरच!**

वृक्ष संगोपनासाठी ज्या ठिकाणी मजूर काम करतात त्या ठिकाणी भेट देऊन तपासणी करणे ही रोजगार हमी योजनेतील अभियंत्यांची जबाबदारी असते. मात्र, अभियंत्यांची भेट केवळ कागदावरच नोंदवली जात असून प्रत्यक्षात त्यांनी कोणतीही तपासणी केली नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळेच या अपहाराला अधिक बळ मिळाल्याचे चित्र आहे.

**सस्ती व वहाळा बू. येथे मोठा गोंधळ**

पातूर तालुक्यातील सस्ती आणि वहाळा बू. येथे अनेक वर्षांपासून वृक्ष लागवडीत अपारदर्शकता असून काही ठिकाणी वृक्ष लागवड कागदापुरतीच आहे, तर काही ठिकाणी लागवड झाली असली तरी संख्या अत्यंत अल्प आहे. तरीदेखील रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून लाखो रुपयांची देयके काढली जात असल्याचा आरोप आहे.

**वृक्ष गवताच्या विळख्यात!**

सस्ती येथील प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात वृक्ष लागवडीची मोहीम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. मात्र, वृक्षांची वाढ केवळ ३-४ फुटांपर्यंतच मर्यादित राहिली आहे. गवताच्या विळख्यात अडकलेल्या या झाडांची योग्य निगा राखली जात नसतानाही देयक काढण्याचा प्रकार सुरूच आहे.

**'कोट्यवधींचा गंडा सुरू'**

'पातूर तालुक्यातील वृक्ष संगोपन मोहीम पूर्णतः अपारदर्शक झाली आहे. सस्ती व वहाळा बू. येथे विशेषतः गंभीर स्थिती असून, संबंधित अभियंता, रोजगार सेवक आणि कंत्राटदार यांची मिलीभगत आहे. शासनाने तातडीने याकडे लक्ष देत कारवाई करावी,'

**दिलीप परनाटे,**
जिल्हाध्यक्ष, शिवसंग्राम

**मोका पाहणी करून चौकशी करणार**

जेवढे वृक्ष जिवंत आहे. त्यावर मजुरांची उपस्थिती असल्याची नोंद करण्याची जबाबदारी रोजगार सेवकाची असून, त्याच प्रमाणे मजुरांच्या नावावर देयक काढल्या जाते. तरीही मोका पाहणी करून चौकशी करण्यात येईल.

**आर. बी. चौधरी**
तांत्रिक सहाय्यक प. स.पातूर

## महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत आता जिल्ह्यातील ३६ रूग्णालये समाविष्ट

**अकोला :** महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत जिल्ह्यातील सहभागी रूग्णालयांची संख्या वाढली असून, आता ३६ रूग्णालयांत या योजनेखाली उपचार होऊ शकतील. गरजूंना ५ लाखांपर्यंतच्या विनामूल्य उपचाराची सुविधा योजनेमुळे झाली आहे, ३० खाटांच्या मल्टिस्पेशालिटी रूग्णालय आणि १० खाटांच्या एकल विशेष रूग्णालयांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाने केले आहे.

नागरिकांना दर्जेदार व परवडणा-या सुविधा उपलब्ध होण्यासाठी अधिकाधिक रूग्णालयांचा समावेश करण्यात येत आहे, असे योजनेच्या जिल्हा समन्वयक शीतल गावंडे यांनी सांगितले. त्या म्हणाल्या की, या उपक्रमामुळे गरीब व गरजू रूग्णांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळेल व जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होतील. नागरिकांना आपल्या नजिकच्या रूग्णालयाची माहिती जीवनदायी पोर्टलवर मिळू शकेल.

राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या निकषांची पूर्तता करणा-या रूग्णालयांचा योजनेत समावेश होतो. आधुनिक वैद्यकीय उपकरणे, उच्च दर्जाची रूग्णसेवा, प्रशिक्षित मनुष्यबळ असे निकष आहेत. रूग्णालयांनी जीवनदायी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा समन्वयकांशी संपर्क साधावा.

समाविष्ट रूग्णालये : अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा स्त्री रूग्णालय, तसेच मूर्तिजापूर येथील उपजिल्हा रूग्णालय याबरोबरच तेल्हारा, बाळापूर, अकोट, चतारी व बार्शिटाकळी येथील ग्रामीण रूग्णालये ही शासकीय रूग्णालये योजनेत समाविष्ट आहेत.

## अनेक गावांत रोटरीचे फिरते नेत्र तपासणी अभियान

**अकोला :** जिल्ह्यात अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्जीत फिरत्या वाहनाद्वारे नेत्र तपासणी करणाऱ्या रोटरीच्या फिरत्या नेत्र तपासणी पथकाच्या वतीने गत जून महिन्यात अनेक गावात नेत्र रुग्णांची मोफत तपासणी करून त्यांच्यावर नेत्र उपचार केलेत.या महिन्यात मोफत नेत्र तपासणीचा तब्बल २९२६ रुग्णांनी लाभ घेतला.रोटरी फिरते नेत्र रुग्णालय,रोटरी नॉर्थ व आनंदीलाल चिरानिया ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने या फिरत्या नेत्र तपासणी वाहनाच्या पथकाने १जून ते ३० जून या कालावधीत पर्यंत अनेक गावात नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली.या महिन्यात २९२६ रुग्णांची तपासणी करण्यात येऊन त्यातील १२१२ रूग्णांना चष्मे वितरित करण्यात आलेत.

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१९/२०२४ — प्रोसेस नं.९५६८/२०२५
चौ.ता. २८/०७/२०२५ — दिनांक : २४/०६/२०२५

**अर्जदार :** १.शिवदास नारायण अंजनकार मयत तर्फे वारस अ. सोनुल शिवदास अंजनकार ब. अमोल शिवदास अंजनकार रा. मेहबुब आलम की चॉल क. रवी शिवदास अंजनकार १अ ते १क रा. भरड विभाग झोपटपट्टी, पारस, ता. बाळापूर जि अकोला. २. विठ्ठल नारायण अंजनकार रा. मु.पो. नेर, ता. तेल्हारा, जि. अकोला ३. संतोष नारायण अंजनकारराा. मु. पो. खांबोरा, ता. जि. अकोला. ४. सौ. मंजूराबाई सुपा नृपनारायण (मंजुराबाई नारायण अंजनकार ) रा. किनखेड, ता. अकोट जि. अकोला. ५. सौ. सुंदराबाई बक्षीराम तायडे (सुंदराबाई नारायण अंजनकार ) रा. मु. पो. बेलखेड, ता. तेल्हारा जि. अकोला. ६. यमुना सुखदेव वानखडे (मृत) (यमुना नारायण अंजनकार ) तर्फे वारस अ. गोपाल सुखदेव वानखडे ब. राजू सुखदेव वानखडे रा. किनखेड, अकोट, ता. अकोट जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नारायण चंदूजी अंजनकार
**पत्ता :-** रा. खांबोरा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नारायण चंदूजी अंजनकार यांचे दि. १९/११/ २०११ रोजी नेर ता. तेल्हारा जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०६/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०४५/२०२५ — प्रोसेस नं.९७१८/२०२५
चौ.ता. ०७/०८/२०२५ — दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. गोपालकृष्ण नागोराव म्हैसने २. राधाकृष्ण भागोराव म्हैसने ३. राजदीप नागोराव म्हैसने सर्व रा. निरट, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. चंद्रकला नागोराव म्हैसने २. प्रमिला नागोराव म्हैसने
**पत्ता :-** रा. दोघेही रा. निरट ता. जि. अकाला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत १. चंद्रकला नागोराव म्हैसने यांचे दि. ०६/०२/२०२० रोजी निराट जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत २. प्रमिला नागोराव म्हैसने यांचे दि. २९/०५/१९९३ रोजी निराट ता. जि. अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा - अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे नईम बेग बिस्मिल्ला बेग रा. खेट्री, ता. पातूर जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :**

मौजे -खेट्री मालमत्ता क्र. ३९५, क्षेत्रफळ ४६२ चौ. फु. ग्रा. पंचायत खेट्री हद्दीतील, ता. पातूर जि. अकोला. त्यास चतुर्सिमा :- पूर्वेस :- तैमूर बेग दिलावर बेग पश्चिमेस : - मोती बेग उत्तर:- रस्ता दक्षिण :- रस्ता. वरील सदरहू मालमत्ता हि नईम बेग बिस्मिल्ला बेग यांची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. तरी वरील मालमत्तेवर आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा - अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : ०२/०७/२०२५
ठिकाण : अकोला

**अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे**
(नोटरी भारत सरकार)
ऑफीस : आनंद बेकरी जवळ,
रामदास पेठ, अकोला मो. ९४२३४३०१७१

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०३५/२०२४ — प्रोसेस नं.१००७२/२०२५
चौ.ता. २८/०७/२०२५ — दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती शारदा प्रकाश राठी रा. सितला माता मंदिराजवळ, आर. एम. डी. मार्केट समोर, अमानखा प्लॉट, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. २.सौ. दर्शना प्रविण बजाज रा. सी२ - २०३, कोलोनाडे, खराडी बायपास रोड, तुकाराम नगर, पुणे ता. जि. पुणे ३. तुषार प्रकाश राठी रा. पी. एस. सी. ११०१, गोदरेज इन्फिनिटी सोसायटी, सर्व्हे नं ९ ते १४, केशव नगर रेणुका माता मंदिराजवळ, मुंडवा पुणे ता. जि. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रकाश कन्हैयालालजी राठी.
**पत्ता :-** रा. सितला माता मंदिराजवळ, आर. एम. डी. मार्केट समोर, अमानखा प्लॉट रणपिसे नगर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रकाश कन्हैयालालजी राठी. यांचे दि. १५/०५/२०२५ रोजी आयकॉन हॉस्पीटल अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०२९/२०२४ — प्रोसेस नं.१००८२/२०२५
चौ.ता. ०४/०८/२०२५ — दिनांक : २७/०६/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती शोभा एकनाथ गोरे २. आशिष एकनाथ गोरे दोघेही रा. टी. टी. एन. कॉलेजच्या मागे, संतोष नगर, खडकी, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. जया सागर चापके रा. बी ॲण्ड सी ऑफिस च्या जवळ, रोहोदास नगर, दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती ४. सौ. आरती पवन राजगुरू रा. शुक्रवार पेठ, ध्रुव चौक, वाशिम ता. जि. वाशिम

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : एकनाथ विश्वनाथ गोरे
**पत्ता :-** रा. व्दारा आशिष एकनाथ गोरे रा. टी.टी.एन. कॉलेजच्या मागे, संतोष नगर, खडकी, अकोला ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत एकनाथ विश्वनाथ गोरे यांचे दि.०३/०४/२०२२ रोजी संतोष नगर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्याथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधिश (क स्तर) पातूर, जि. अकोला यांचे न्यायालय**

एम. जे. सी. नं. ८१/२०२५ — प्रोसेस नं.८०६/२०२५
चौ.ता. ०५/०८/२०२५ — दिनांक : ३०/०६/२०२५

**अर्जदार :** भाईमिया भिकन पटेल, वय ८५ वर्षे, धंदा - निल रा. अंबाशी ता. पातूर जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही
**मयताचा पत्ता :-** मयत : रहेमुनबी याकुब पटेल
**पत्ता :-** रा. अंबाशी ता. पातूर जि. अकोला.

याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत रहेमुनबी याकुब पटेल हिचा दि. १६/०९/२०२४ रोजी जळगांव ता. जि. जळगांव येथे झाला. तसेच मयत रहेमुनबी याकुब पटेल हिचे पती मयत याकुब हैदर पटेल हे ४० वर्षापुर्वी म यत झाले आहे. तसेच मयत रहेमुनबी याकुब पटेल यांचा मुलगा शेख अय्युब शेख याकुब यांचा दि. ०६/०४/२०१५ रोजी अंबाशी ता. पातूर जि. अकोला येथे झाला.

उपरोक्त नमुद अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरीता अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दि.०५/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत न्यायालयामध्ये हजर होवुन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे गृहीत धरून समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

पातूर
दिनांक: २७/०६/२०२५

शिक्का — **आदेशान्वये**
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, पातूर

### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधिश (क स्तर) पातूर, जि. अकोला यांचे न्यायालय**

एम. जे. सी. नं. ८०/२०२५ — प्रोसेस नं.८०५/२०२५
नि.ता. ०१/०८/२०२५ — दिनांक : ३०/०६/२०२५

**अर्जदार :** १) जाहेदा बी सैय्यद जाकीर, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम २) सैय्यद शारिक सैय्यद जाकीर, वय ३९ वर्षे, धंदा मजुरी ३) सैय्यद शकील सैय्यद जाकीर, वय ३७ वर्षे, धंदा - मजुरी ४) सैय्यद शाकीर सैय्यद जाकीर, वय ३७ वर्षे, धंदा मजुरी ५) सैय्यद तारिक सैय्यद जाकीर, वय ३२ वर्षे, धंदा - मजुरी ६) नाजमीना परवीन सैय्यद जाकीर, वय ३१ वर्षे, धंदा - घरकाम ७) यास्मिन परवीन सैय्यद जाकीर, वय २८ वर्षे, धंदा घरकाम सर्व रा. मुजावरपूरा पातूर ता. पातूर जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही
**मयताचा पत्ता :-** मयत : सैय्यद जाकीर सैय्यद मोहिदिन
**पत्ता :-** रा. मुजावरपूरा पातूर ता. पातूर जि. अकोला.

याअर्थी उपरोक्त अर्जदार यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत सैय्यद जाकीर सैय्यद मोहिदिन यांचा दि. १२/०४/२०२५ रोजी पातूर ता. पातूर जि. अकोला येथे झाला. तसेच मयत सैय्यद जाकीर सैय्यद मोहिदिन आई मयत नामे अफशान बी सैय्यद मोहिदिन बरेच वर्षापुर्वी मयत झालेली आहे. तसेच मयत सैय्यद जाकीर सैय्यद मोहिदिन यांचा मुलगा सैय्यद साहेब सैय्यद जाकीर यांचा दि. ०४/११/२००९ रोजी शिर्ला ता. पातूर जि. अकोला येथे झाला.

उपरोक्त नमुद अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. या व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरीता अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दि०१/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत न्यायालयामध्ये हजर होवुन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे गृहीत धरून समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पातूर
दिनांक: २७/०६/२०२५

शिक्का — **आदेशान्वये**
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, पातूर

### जाहीर नोटीस

**वि.सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०७४/२०२५ — प्रोसेस नं.९९४०/२०२२
चौ.ता. ०१/०८/२०२५ — दिनांक : २६/०६/२०२५

**अर्जदार :** १. रामदास बळीराम सरदार रा. मेहरे नगर, नागलकरच्या घराजवळ, कॅनल रोड, डाबकी रोड, अकोला,ता. जि. अकोला २. सौ. प्रमिला गजानन पानझडे रा. विलास शेळके च्या घराजवळ, रेणुका नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. बळीराम गोविंदा सरदार २. जिजाबाई बळीराम सरदार
**पत्ता :-** रा. दोघेही रा. मेहरे नगर, नागलकरच्या घराजवळ कॅनल रोड, डाबकी रोड अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत १. बळीराम गोविंदा सरदार ;ंचे दि. २६/०८/२००२ रोजी आंबेटाकडी ता. खामगाव जि. बुलढाणा येथे निधन झाले आहे तसेच मयत २. जिजाबाई बळीराम सरदार यांचे दि. ०७/०२/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०१/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २६/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १११८/२०२४ — प्रोसेस नं.१०२३९/२०२५
चौ.ता. ११/०८/२०२५ — दिनांक : ०२/०७/२०२५

**अर्जदार :** १. राहुल शंकरराव शिंगटे रा. महसुल कॉलनी, हनुमान मंदिराजवळ, अकोला, ता. जि. अकोला. २. श्रीमती. शोभा शंकर शिंगटे रा. एल.आर.टी. कॉलेज रोड, हनुमान मंदिराजवळ, रतनलाल प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला ३. पुजा बबन मुळीक रा. सती फेल, हनुमान मंदिराजवळ, मु. पो. खामगांव, जि. बुलढाणा ४४४३०३ ४. सोनाली गिरीष सहस्त्रबुद्धे रा. ४/४२, रस्मिता निवास, महसुल कॉलनी, कोठारी वाटिका नं ३, मलकापूर, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शंकर रामकृष्ण शिंगटे
**पत्ता :-** रा. अ/३२, महसुल कॉलनी, नवीन बस स्टॅण्ड च्या मागे अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शंकर रामकृष्ण शिंगटे यांचे दि. १९/०४/२०२५ रोजी महसुल कॉलनी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०३६/२०२५ — प्रोसेस नं.९७१७/२०२५
चौ.ता. ०७/०८/२०२५ — दिनांक : २५/०६/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती कुसूम उर्फ भिकूबाई श्रवण बागडे (लग्नापूर्वीचे नाव कु. भिकुबाई गणू गवई ) रा. एस-२ गोयल सदन, निळकंठ कॉलनी, ईदगाह हिल्स, तहसिल-हुजूर जि. भोपाल मध्यप्रदेश. २. पुष्पा बाळु अंभोरे (लग्नापूर्वीचे नाव पुष्पा शंकर गवई) रा. गल्ली क्र. २, कॅनवल रोड, गोरोबा काका मंदिराजवळ, गजानन नगर डाबकी रोड, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. कमलाबाई शंकर गवई २. विलास शंकर गवई दोन्ही रा. अन्वी मिर्झापूर, ता जि अकोला
**मयताचा पत्ता :-** मयत : गणू धनू गवई
**पत्ता :-** रा. व्दारा प्रल्हाद शालीग्राम आमटे रा. चांदूर ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गणू धनू गवई यांचे दि. ०७/१२/१९७२ रोजी चांदूर ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९९६/२०२५ — प्रोसेस नं.९१६३/२०२५
चौ.ता. ०४/०८/२०२५ — दिनांक : १८/०६/२०२५

**अर्जदार :** १. दशरथ पारसनाथ मिश्रा. २. हिरालाल पारसनाथ मिश्रा ३. गणेश पारसनाथ मिश्रा तिघेही रा. राजेश मिश्रा च्या घराजवळ, हरिहर पेठ, दसेरा नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : ध्रुपदाबाई पारसनाथ मिश्रा.
**पत्ता :-** रा. राजेश मिश्रा च्या घराजवळ, हरिहर पेठ, दसेरा नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत ध्रुपदाबाई पारसनाथ मिश्रा यांचे दि. ३०/०१/२०२२ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## पातूर नगर परिषद पातूर

## (निविदा सुचना )

मुख्याधिकारी पातुर नगर परिषद पातुर येथे बांधकाम विभागा मार्फत नोंदनीकृत कंत्राटदाराकडुन (दोन लिफाफा निविदा पद्धतीने) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | कोरी निविदा प्रपत्रे किंमत | अनामत रक्कम | आदेश मिळाल्या पासुन कामाचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सन २०२५-२६ करिता न. प. पातुर अंतर्गत प्राकलने व आराखडे तयार करणे. | १०००/- | १०,०००/- | ३१ मार्च २०२६ | - |

### निविदा प्रसिध्दी तपशिल

| | |
|---|---|
| निविदा प्रसिध्दी करण्याचा दिनांक | ०२/०७/२०२५ |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०९/०७/२०२५ |
| निविदा उघडण्याची दिनांक | १०/०७/२०२५ |

**शर्ती व अटी**

निविदेच्या शर्ती व अटी नगर परिषद पातूर च्या बांधकाम विभागात पहावयास मिळेल.

१. कंत्राटदाराने त्याच्या नोंदनीसंबधीचे पंजीबध्द कंत्राटदार असल्याचे अध्यावत प्रमाण पत्र आयकर, व्यवसायकर, GST, पॅनकार्ड, परिशिष्ट-अ, काळ्या यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र व संबंधीत सर्व कागद पत्रे तसेच निविदा फी अनामत रक्कम निविदेसोबत सादर करणे.
२. कोणतीही एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहील.
३. निविदा स्विकृतीच्या दिवशी / विक्रीच्या दिवशी ऐन वेळी सुट्टी घोषीत झाल्यास दुसऱ्या दिवशी त्याच वेळी निविदा स्विकृत करण्यात येतील.-
४. नगर परिषद कडुन कोणतेही साहीत्य मिळणार नाहीत.
५. नियमानुसार स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

क्रमांक- नपपा/वि.वि./८९०/२०२५
कार्यालय नगर परिषद पातूर, दिनांक - ३०/०६/२०२५

**मुख्याधिकारी**
नगर परिषद पातूर

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाउस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २१८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# २० लाख शेतकऱ्यांसाठी आता बँकांचे दरवाजे बंद

## ३१ हजार कोटींची थकबाकी; शेतकऱ्यांना कर्जमाफीची आशा

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील २० लाख ३७ हजार २१० शेतकऱ्यांकडे बँकांची ३१ हजार २५४ कोटींची थकबाकी असल्याची बाब राज्यस्तरीय बँकर्स कमिटीच्या अहवालातून समोर आली आहे. त्यात बीड, जालना, बुलढाणा, नांदेड, परभणी व यवतमाळ या जिल्ह्यांतील दीड लाख ते सव्वादोन लाखांपर्यंत शेतकरी सध्या थकबाकीत असल्याचेही त्या अहवालात नमूद आहे. सरकारकडून कर्जमाफीची आशा असल्याने शेतकरी सध्या बँकांची धकबाकी भरत नसल्याची स्थिती आहे.



### 'या' १५ जिल्ह्यांमध्ये थकबाकी जास्त

नगर, छत्रपती संभाजी नगर, बीड, बुलढाणा, जालना, कोल्हापूर, मुंबई, नागपूर, नांदेड, नाशिक, धाराशिव, परभणी, पुणे, सोलापूर व यवतमाळ या १५ जिल्ह्यांमधील शेतकऱ्याऱ्यांकडे बँकांची सर्वाधिक शेती कर्जाची थकबाकी आहे. त्यात नाशिक जिल्ह्यात २७९० कोटी, सोलापूर जिल्ह्यात २६८१ कोटी आणि यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे २२५६ कोटींची थकबाकी असल्याची बाब राज्यस्तरीय बैंकर्स कमिटीच्या अहवालातून समोर आली आहे

### राज्यात दररोज ७ शेतकरी आत्महत्या

राज्यात दरवर्षी अडीच हजारापेक्षा जास्त (सरासरी दररोज सात) शेतकरी आत्महत्या करतात, अशी वस्तुस्थिती आहे, त्यात छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नाशिक, नागपूर या विभागांमध्ये सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होत असल्याचे मदत व पुनर्वसन विभागाकडील आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. कोकण विभाग मात्र आत्महत्यामुक्त झाला आहे.

राज्यस्तरीय बँकर्स कमिटीच्या वार्षिक नियोजनानुसार खरीप हंगामात सर्व शेतकऱ्यांना बँकांनी कर्जपुरवठा करणे अपेक्षित आहे. त्यासाठी सिबिल पाहू नका, असेही आदेश आहेत. मात्र, बँकांमध्ये गेल्यावर शेतकऱ्यांचे सिबिल पाहिले जाते अशी वस्तुस्थिती आहे. खरीप सुरू होऊन महिना संपत आला, तरीदेखील बँकांनी कर्जवाटपात हात आखडता घेतल्याचीही वस्तुस्थिती आहे. विधानसभा निवडणुकीत विद्यमान सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, त्यामुळे अनेक शेतकरी त्या आशेवर असून त्यांनी अद्याप बँकांची थकबाकी भरलेली नाही. बँकांनी अनेकदा नोटिसा बजावून देखील शेतकरी बँकांमध्ये फिरकलेले नाहीत. राज्यातील सव्वा कोटी शेतकऱ्यांपैकी पूर्वीच्या थकीत कर्जामुळे २० लाखांहून अधिक शेतकऱ्यांसाठी बँकांचे दरवाजे बंद झाले आहेत. राज्यातील १५ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांकडे बँकांची सर्वाधिक थकबाकी आहे. मॉन्सूनपूर्व पावसामुळे नुकसान, उसाची एकरकमी एफआरपी मिळत नाही, पिकांना हमीभाव नाही, अतिवृष्टी, महापूर अशा संकंटांमुळे शेतकरी बँकांची थकबाकी भरत वस्तुस्थिती आहे.

# प्रेयसीच्या लग्नात प्रियकराचा अटकाव

**वर्धा/जनमाध्यम**

एक वर्षाच्या प्रेमप्रकरणा नंतर प्रियकराने दुसऱ्याच मुलीशी साक्षगंध आटोपले. प्रेयसीला माहिती मिळताच तिने त्याच्यासोबत बोलणे टाळले. यादरम्यान प्रेयसीचेही लग्न ठरले. मात्र, प्रियकराने प्रेयसीच्या होणाऱ्या नवरदेवाला फोन करून लग्न केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. प्रेयसी आणि तिच्या वडिलांना सुद्धा अश्लिल शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. या घटनेने व्यथित झालेल्या प्रेयसीने देवळी पोलिस ठाण्यात प्रियकराविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करीत प्रकरण तपासात घेतले.

तळेगाव (टालाटुले) येथील रहिवासी असलेली प्रेयसी तिच्या लहान बहीण आणि वडिलांसोबत राहते. तिचे वडील रोजमजुरीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. प्रेयसी मुलगी देवळी येथील एका महाविद्यालयात शिक्षण घेते. देवळी येथे भाड्याने राहते. दरम्यान, जावेद शेख याच्यासोबत ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. मागील एक वर्षापासून या दोघांचे प्रेम प्रकरण सुरू होते. मात्र, जावेदने गुपचुप दुसऱ्याच मुलीसोबत साक्षगंध आटोपले. ही माहिती त्याच्या प्रेयसीला मिळताच तिने जाब विचारत जावेदसोबत संबंध तोडले. दोन महिन्यांपासून ते दोघेही एकमेकांपासून दुरावले असतानाच प्रेयसीचे धामणगाव येथील सिद्धांत वाघमारे याच्यासोबत लग्न जुळले.

प्रेयसीचे लग्न जुळल्याचे माहित होताच जावेदने प्रेयसीच्या होणाा नवरदेव सिद्धांत वाघमारे याला फोन करून तू माझ्या प्रेयसीसोबत लग्न करू नको, नाही तर तुला मारून टाकीन, अशी धमकी दिली. सिद्धांतने लगेच होणाऱ्या पत्नीला फोन करून घडलेला प्रकार सांगितला. दरम्यान, तीने वडिलांसोबत देवळी येथे आले असता बसस्थानकावर जावेद शेख आला आणि अश्लिल शिवीगाळ करू लागला. प्रेयसी आणि वडिलांनाही शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेने व्यथित होत प्रेयसीच्या वडिलांनी देवळी पोलिस ठाणे गाठून जावेद शेख याच्याविरुद्ध तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी जावेद विरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास देवळी पोलीस करीत आहे.

## ३० सप्टेंबरपर्यत आर्थिक साक्षरता अभियान

**वर्धा**-शासनाच्या बँकामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांचा ग्रामपंचायत स्तरावर लाभ मिळवून देण्यासाठी १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत विशेष आर्थिक साक्षरता अभियानांतर्गत प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चेतन शिरभाते यांनी केले आहे. बँक ऑफ इंडिया हि भारत सरकारच्या वित्तीय समावेशन धोरणा अंतर्गत १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या तीन महिन्यादरम्यान हि मोहीम राबविण्यात येणार आहे. हि मोहीम संपूर्ण देशभर राबविल्या जाणार आहे. या मोहिमेचा प्रारंभ आजनडोह, आजदा, अंतरगाव, आकोली, आलगाव, नेरी (पु), आमला अश्या ग्राम पंचायत मध्ये आज पार पडला.

## डॉक्टर दिनानिमित्त मनसेच्या वतीने शुभेच्छा



**वर्धा-जनमाध्यम**

डॉक्टर दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने डॉक्टर समाजातील कष्टकरी व समर्पित डॉक्टरांना विशेष शुभेच्छा देण्यात आल्या. मनसे शहराध्यक्ष ओम क्षीरसागर व शहर उपाध्यक्ष साहिल मानकर यांनी डॉ. सचिन पावडे आणि डॉ. विजय चौधरी यांना विशेषरित्या शुभेच्छा दिल्या. 'कोरोना काळापासून आजपर्यंत डॉक्टरांनी समाजासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. रुग्णांना नवजीवन देणारे डॉक्टर हे खरे खरे जीवनदाता आहेत,' असे ओम क्षीरसागर यांनी सांगितले.शहर उपाध्यक्ष साहिल मानकर यांनी देखील डॉक्टर समाजाच्या समर्पणाचे कौतुक करत,'डॉक्टर दिवस हा डॉक्टरांच्या त्याग, सेवा व कर्तव्य निष्ठेचे प्रतीक आहे. डॉक्टरांचे योगदान शब्दांत मांडता येणार नाही,' असे मत व्यक्त केले.या वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सर्व डॉक्टरांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



## कृषी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**हिंगणघाट/जनमाध्यम**

स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त हिंगणघाट येथे कृषी विभाग व ग्रामविकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने कृषी दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम सॉलिडरीडॅड या अशासकीय संस्थेच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्र येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी 'शेतीनिष्ठ' पुरस्कार प्राप्त शेतकरी गौतम जवादे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी शेतकऱ्यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन खर्चात कपात करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन उपस्थित शेतकरी बांधवांना केले. कार्यक्रमास पंचायत समिती हिंगणघाटचे विस्तार अधिकारी जोगे प्रमुख उपस्थित म्हणून लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषि अधिकारी सचिन सुतार यांनी केले. कार्यक्रमात 'पाणी फाउंडेशन'च्या फार्मर कप स्पर्धेतील विजेते महिला शेतकरी गटाच्या अध्यक्षा प्रतिभा पाटील व श्रीमती कांबळे यांनी आपल्या शेतीतील अनुभव मांडले. त्यांनी उत्पादन खर्च कमी करण्यासाठी वापरलेली तंत्रज्ञान व उपाय सोप्या भाषेत उपस्थित शेतकऱ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमात मंडळ कृषि अधिकारी निलेश सुपारे व शुभ्रकांत भगत यांनी उपस्थितांना कृषी विषयक विविध शासकीय योजना व उपक्रमांची माहिती दिली व मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक कृषि अधिकारी मोहिन शेख यांनी केले, तर आभार प्रदर्शन उप कृषि अधिकारी विनोद पडवे यांनी केले.

# आषाढी एकादशानिमीत्य पायदळ वारी

**हिंगणघाट/जनमाध्यम**

आदिनाथ गुरू माऊली सेवा मंडळ,हिंगणघाट च्या वतीने आषाढि एकादशी निमीत्य हिंगणघाट ते आदिनाथ गुरू माऊली सेवाश्रम,बरबडी (कांढळी) अशी दिंडी,पालखी, भजन व वारकरासह पायदळ वारीचे आयोजन करनात आले आहे.सेवाश्रम चे संस्थापक श्री संत ब्रम्हमुर्ती शेषानंद पांडे महाराज, तरी परीसरातील भाविकानी लाभ घ्यावा असे आव्हान,सेवाश्रमचे अध्यक्ष ओमप्रकाश पांडे यांनी एका प्रसिद्द प्रत्रकाव्दारे केले. हिंगणघाट येथिल संत कबीर वार्डातील हनुमान मंदिर समोरील राजुजी मेघरे महाराज यांच्या घरासमोरून दि.३ जुलै गुरूवार रोजी सकाळी नऊ वाजता पायदळ वारी, दिंडी पालखी सह प्रस्थान होईल. सायकाळी हरीपाठ,व रविन्द्र गाडगे महाराज मार्गदर्शन नंतर आरती प्रसाद करतील. झाला नमतर हिंगणघाट येथील शिष्य रामदास भोयर यांच्याकडे सहभोजन व मुक्काम राहील.



दि.४ जुलै रोजी सकाळी नऊ वाजता हिंगणघाट येथुन राष्टिय महामार्ग जाम कडे प्रस्थान होईल. दुपारी उबदा येथील हनुमान मंदिर मध्ये नितीनजी पिसे यांच्याकडुन सहभोजन करून विश्रांती होईल. पुंढे जाम चौरस्ता पार कडुन दिंडी स्वामी समर्थ मठ, शेडगांव येथे किंशोरजी बाके महाराज यांच्या सहकार्याने मुक्कामी राहील तेथे हरीपाठ व ओमप्रकाश पांडे महाराज रात्रौला वारीचे मार्गर्शन करेल नंतर सहभोजन श्री डुक्करे महाराज यांच्या कडुन राहील. दि.५ जुलै रोजी शनिवार ला सकाळी ९ वा दिंडी पालखी चे बरबडी च्या दिशेने प्रस्थान होईल. रात्री बरबडी येथे मुक्काम होईल सहभोजन सुरेशजी चंदनखेडे महाराज यांच्या तर्फे राहील. दि. ६ जुलै रविवार रोजी आषाढी एकादशी निमीत्य श्री विठ्ठल रूख्मिनी मुर्तीचे गंगाजल अभिषेक पुजाराम खिरटकर व डॉ.श्याम माहुलकर बुटीबोरी यांच्या हस्ते होईल, तर फराळ ग्रामगीताचार्य बेबी पिपंळशेन्डे बुटीबोरी कैलास पेरकुडे,बरबडी यांच्या हस्ते होईल तरी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे हि विनंती नरेन्द्र मेघरे हिंगणघाट यांनी केले.

## राष्ट्रभाषा प्रचार समितीचा स्थापना दिवस सोहळा उद्या

**वर्धा**-राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा यांच्या वतीने समितीच्या स्थापना दिनानिमित्त ४ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता पं. रामेश्वर दयाल दुबे सभा भवन, राष्ट्रभाषा परिसर, वर्धा येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रो. डॉ. सूर्यप्रकाश दीक्षित, लखनऊ (अध्यक्ष, राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा केंद्र) असणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पंकज भोयर, पालकमंत्री, वर्धा आणि डॉ. प्रियांकर पलिवाल, कला महाविद्यालयाचे प्राचार्य, कलकत्ता हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात दोन हिंदी पुस्तकांचे लोकार्पण होणार आहे. त्यात' ज्ञानतीर्थ का अधिष्ठान': सुप्रसिद्ध लेखक चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या मराठी लेखनाचा हिंदी अनुवाद, अंततः': प्रा. रविराज माने यांच्या मराठी पुस्तक अशी माहिती डॉ. गिरीश अग्रवाल, सहायक मंत्री, राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा. यांनी दिली.

# भगदाड प्रकरणी राष्ट्रीय महामार्गावर दोन तास रास्तारोको आंदोलन

## कंत्राटदारावर कारवाई करण्याचे आश्वासनानंतर आंदोलन मागे

**हिंगणघाट/जनमाध्यम**

शहरातून गेलेला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर नांदगाव चौक येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलाला चार वर्षात दुसऱ्यांदा मोठे भगदाड पडले. रस्त्याच्या मधोमध पडलेले भगदाड अपघातास निमंत्रण देत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग भगदाड प्रकरणात समिती नेमून चौकशी करीत संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर तातडीने कारवाई करा याप्रमुख मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात नांदगाव चौक येथील उड्डाणपुलावर १ जुलै रोजी पावसात दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. ठेकेदारावर कारवाई करण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. या आंदोलनाने रस्त्याच्या दोन्ही बाजून वाहतूक खोळंबली होती.

कृषी उत्पन्न बाजार समिती ते सेंट जॉन कॉन्व्हेंटपर्यंत उड्डाणपूल चार वर्षापूर्वी वाहतुकीसाठी सुरू केला. मात्र, त्यानंतर अनेकदा बंद करून वाहतूक वेगळ्या रस्त्याने वळवण्यात आली. अनेकदा पुलाची डागडुजी करण्यात आली. त्या खड्ड्यात अपघात झाला तर जबाबदार कोण असा प्रश्न विचारत यापुर्वीही महामार्ग अधिकाऱ्यांना निवेदनं देण्यात आली होती. त्याकडे राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. दुर्लक्ष केल्यामुळे आता पुन्हा हिंगणघाट शहरातून गेलेल्या राष्ट्रीय महामार्ग ४४ वर नांदगाव चौक येथील उड्डाणपुलावर दुसऱ्यांदा भगदाड पडले. आज अनेक नागरिक अपघात होता होता वाचले. राष्ट्रीय महामार्गावरील पडलेल्या भगदाडाची तात्काळ दुरुस्ती करावी व तातडीने या प्रकरणात समिती नेमून संबधीत अधिकारी व कंत्राटदारावर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी नांदगाव चौक येथील उड्डाणपुलावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात भरपावसात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.



यावेळी राष्ट्रीय महामार्ग अधिकारी, तहसीलदारांनी तात्काळ आंदोलन स्थळी उपस्थित झाले.

महामार्ग अधिकाऱ्यांनी पुलाचे पूर्ण ऑडिट केले जाईल व संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई केल्या जाईल असे आश्वासन दिल्या नंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी शहर निरीक्षक महेश झोटिंग पाटील, विनोद वानखेडे, बालू वानखेडे, मो. रफिकभाई, सुनील डोंगरे, दशरथ ठाकरे, दिनेश देशकरी, अमोल बोरकर, मिलिंद कोपुलवार, प्रभाकर रेवतकर, आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त



### भारतीय स्टेट बँकेच्या स्थापनादिनी बचत गटांना कर्ज वाटप

**विरुळ (आ)**- भारतीय स्टेट बँकेला ७० पूर्ण झाले त्यानिमित्ताने स्थापना दिवस साजरा करण्यात आला. बँकेच्या इमारतीला रंगरूप करून विद्युत रोषणाई करून सजविण्यात आले परिसरातील व गावातील ग्राहकांचे सकाळी बँकेचे व्यवस्थापक कडून झाडे,पुष्पगुच्छ व मिठाई,अल्पोहार तसेच बँकेच्या ग्राहकांना स्थापना दिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे बँकेचे माजी कॅशिअर सुनील कोठावळे, दिलीप घालनी,जेष्ठ नागरिक येळणे गुरुजी, निलेश घालनी, बचतगटाच्या श्रीमती पांडे उपस्थित होते. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केक कापून बँकेचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पंजाबी ढोलच्या गजरात परिसर गुंजत होता. यावेळी बँकेचे व्यवस्थापक बंडू देवकर, अमोल काळे,सुनील बॅनर्जी, वैभव देशमुख, सूरज सहारे, बचतगटाच्या महिला व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### आनंदनगरातून दोन लाखांचा ऐवज लंपास

**वर्धा**-स्थानिक आनंदनगर येथील घरी चोरी करत दोन लाख चार हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आनंदनगर येथील तैमुनिसा मुनीर शहा यांनी पैशाचे काम असल्याने कपाटाची चावी बघितली असता चावी दिसली नाही. संशय आल्याने आलमारीत बघितले असता रोख दोन लाख रुपये, सोन्याच्या दोन अंगठ्या आदी दोन लाख चार हजार ५०० रुपयांचा ऐवज दिसून आला नाही. दोन लाख चार हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली. तक्रारीवरून संशयीतावर गुन्हा दाखल करण्यात आला.

### दुचाकीला धडक;एक जण ठार

**वर्धा**-भरधाव वेगातील वाहनाने दुचाकीला धडक दिली. त्यात एक जण ठार तर एक जण जखमी झाला. ही घटना धोत्रा चौरस्ता शिवारात घडली. वैभव शंकरराव महाजन (वय २७) रा. एकुर्ली असे आहे. तर या अपघातात शंकर भगवान महाजन (वय४५) रा. एकुर्ली हे जखमी झाले. वैभव महाजन आणि शंकर महाजन हे एमएच ३२ ऐवी ९६९२ क्रमांकाच्या दुचाकीने जात होते. दरम्यान, एमएच १६ सीसी ७५७५ क्रमांकाच्या ट्रकने धोत्रा चौरस्ता शिवारात दुचाकीला धडक दिली. त्यात वैभव महाजन याचा मृत्यू झाला तर शंकर महाजन जखमी झाले. याप्रकरणी अल्लीपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### अज्ञाताने दुचाकी पळविली

**वर्धा**-पेपर देण्याकरिता गेलेल्या विद्यार्थिनीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना शहरातील मास्टर कॉलनी परिसरात घडली. प्रकरणी सुनील घुसे रा. नालवाडी यांनी वर्धा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. एमएच ३२ एएन ५८०६ क्रमांकाची दुचाकी विद्यार्थिनीने कॉलेज जवळ उभी करून ठेवली. विद्यार्थिनी पेपर सोडवून परत आली तेव्हा दुचाकी नव्हती. शोध घेतला मिळाली नाही. प्राप्त तक्रारीच्या आधारावर शहर पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदविला आहे.

### संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली अभंग व नाट्य रविवारी

**वर्धा**-'ज्ञानियाचा राजा' या शीर्षकांतर्गत सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालयात रविवार, ६ जुलै रोजी संध्या. ६ वाजता संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊलींच्या अभंगाचे सादरीकरण व माऊलींच्या जीवनातील काही प्रसंगाचे नाट्य प्रस्तुतीकरण करण्यात येणार आहे. सोबतच हिंगणघाट येथील कुंचलाचे शिल्पकार हरिहर पेंदे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बियाणे उगवण्यापूर्वीच रानडुक्कर करतात फस्त

**वर्धा**- तालुक्यामध्ये गेल्या चार दिवसापासून सोयाबीन पेरणीच्या कामाला जोर आला आहे. दिवसा बियाणे मातीत टाकल्यावर रात्रीला रानडुकर ते फस्त करीत असल्याने तालुक्यातील आमला, तीगाव, धामणगाव व दहेगाव परिसरातील शेतकरी चिंतेत आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ लागले आहे. गुरुवार आणि शुक्रवारला परिसरातील गावांमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली त्यानंतर शेतात मोठ्या प्रमाणात ओल निर्माण झाली. जमिनीतला ओलावा कमी होताच सोयाबीन पेरणीला वेग आला. दिवसभर पीक पेरणी करिता शेतात राबल्यावर शेतकरी शारीरिकदृष्ट्या थकलेले असतात ते जागलीला जात नाहीत. या संधीचा फायदा घेऊन रानडुक्कर पेरलेल्या शेतीमध्ये रात्रीच्या वेळी प्रवेश करून मातीत असलेले बियाणे फस्त करतात. रानडुकराने बियाणे फस्त केल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. हल्ली सर्वत्र हा प्रकार सुरू असल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. हा प्रकार परिसरात येणाऱ्या गावांच्या शेतशिवारात मोठ्या प्रमाणात आहे. कपाशीच्या बियाण्यासोबत तुरीचे बियाणे पेरण्यात आले ते रानडुकरांनी फस्त केल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आलेली. बियाणे फस्त केल्याने कपाशी उगविली पण तूर उगविली नाही. काहींच्या शेतात कमी जास्त प्रमाणात उगवण झाली असून तुरी सोबत सोयाबीन दुबार पेरण्याची वेळ आल्याचे दिसते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २१८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जीएचआरयु, अमरावती आणि एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्यात एमओयू

## अमरावतीच्या विकासाला मिळेल गती, तरुणांच्या हातात असेल रोजगार



**अमरावती:** जी.एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती (जीएचआरयु) येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आणि विभागातील तरुणांसाठी एक चांगली बातमी आहे. उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना रोजगारासाठी इतर शहरांमध्ये किंवा राज्यांमध्ये स्थलांतर करावे लागणार नाही. तसेच, अमरावती जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल. या उद्देशासाठी नुकतेच जी.एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती (जीएचआरयु) आणि एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, अमरावती यांच्यात सामंजस्य करार (एमओयू) झाला आहे. एमओयूवर जी.एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावतीच्या वतीने कुलगुरु डॉ. विनायक देशपांडे आणि एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष किरण पातुरकर यांनी स्वाक्षरी केली. या प्रसंगी जीएचआरयुच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायस्वाल आणि असोसिएशनच्या वतीने सचिव आशीष सावजी, उपाध्यक्ष दिलीप अग्रवाल, सहसचिव प्रकाश राठी, दीपक अग्रवाल, सदस्य हर्ष वर्मा, अजय पवार, शेखर राठी आणि सत्यवान हरवाणी उपस्थित होते. एमओयूनंतर डॉ. देशपांडे म्हणाले की, ही भागीदारी आमच्या विद्यार्थ्यांना उद्योगासाठी सक्षम बनवून त्यांना भविष्यासाठी तयार करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. केवळ पदवी प्रदान करणे हा आमचा उद्देश नाही, तर व्यावहारिक अनुभव देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे, असे त्यांनी सांगितले. असोसिएशनच्या अध्यक्षांनीही या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, जी.एच. रायसोनी विद्यापीठ याशी हा सहयोग आम्हाला प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध करण्यात सहयोगी ठरेल, ज्यामुळे उद्योगांची उत्पादकता वाढेल आणि प्रादेशिक विकासाला चालना मिळेल.

डॉ. देशपांडे पुढे म्हणाले की, एमओयूचा उद्देश विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये संधींना चालना देणे, उद्योगांच्या मनुष्यबळाच्या गरजा पूर्ण करणे आणि स्थानिक, शिक्षित तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढवणे हा आहे. एमओयूचे प्रमुख उद्देश संयुक्त संशोधन प्रकल्प, इंटर्नशिप, लाइव्ह प्रोजेक्ट्स आणि उद्योग-प्रायोजित प्रयोगशाळांची स्थापना करणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या योग्यतेच्या आधारावर कौशल्य-आधारित आणि कार्यस्थळावर प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या उपक्रमांमध्ये समर्थन देणे आणि राज्य आणि राष्ट्रीय सरकारी योजनांबद्दल माहिती प्रदान करणे हे आहेत.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण संपन्न



**अमरावती :-** श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय संलग्न ग्रंथालय परिसरात महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार, दिनांक ०२ जुलै २०२५ रोजी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बकुळी, कडूनिंब, वड, पिंपळ, आवळा इत्यादी प्रकारची झाडे लावण्यात आली. वृषारोपणाचे वेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे, डॉ. क्रिष्णा विल्हेकर, डॉ. अजय जावरकर, डॉ. सुषमा पांडे, डॉ. रामावतार सोनी, डॉ. गौरव दुबे, डॉ. राहुल देशमुख, डॉ. अनंत काळबांडे, डॉ. सुबोध निस्ताने, डॉ. विठ्ठल खानंदे, डॉ. प्रकाश कुटे, डॉ. प्रिया वरभे, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. सुदेश दारव्हेकर, डॉ. उल्हास घोटकर, डॉ. श्रीकांत फुटाणे, क्रिडा अधिकारी संजय वाटाणे, प्रशांत अडसोड, किशोर इंगळे, अरविंद हाडके, श्रीकांत इंगळे, पुरूषोत्तम बाजड, पद्मा साखरे, माधुरी टेकाडे, सुवासिनी काळे, रतन मेश्राम, स्मिता पाटील, वैशाली नाकट, जनरल सेक्रेटरी वैदेही काळे, अमय कुलट, भुषण पाटणे, अभिजीत कांडलकर, गौरव राऊत, वृषाली देशमुख, राजेंद्र देशमुख इ. शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित राहून वृक्षारोपण केले.

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**
**वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा**

आर.एम.जे.सी.क्र.१४२/२०२५ — ने.ता.१४.०७.२०२५

अर्जदार :
१. **राहुल जानराव मेश्राम** (नातू), वय ३५ वर्षे, व्यवसाय- शेती, रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **उमेश साहेबराव मेश्राम** (नातू), वय २७ वर्षे, व्यवसाय- शेती, रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. **शिवा शंकर मेश्राम** (नातू), वय १८ वर्षे, व्यवसाय- शेती, रा.तिवसा बुद्रुक, ता.जि.अकोला
४. **दशरत विष्णुजी मेश्राम** (मुलगा), वय ५६ वर्षे, व्यवसाय- शेती, रा.वा.न.३,परिसर सेक्टर शेंदूरजना खुर्द, इंदिरा नगर, धामणगाव रेल्वे, जि.अमरावती
५. **पंजाब विष्णुजी मेश्राम** (मुलगा), वय ४८ वर्षे, व्यवसाय- शेती, रा.नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी **मयत विष्णु शामराव मेश्राम** हे दि.०४/०२/२०२५ रोजी मुंड निशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे मरण पावले आहे. त्यांचा कायमचा पत्ता हा मुंड निशांकराव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथील आहे. त्यांना अर्जदारा यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही. अर्जदार हे उपरोक्त मयताचे कायदेशिर वारस आहेत. उपरोक्त मयतांचे कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत दिनांक <u>१२.०६.२०२५</u> रोजी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक **१४.०७.२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०१ जुलै सन २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४२५/२५ — ने.ता.१२.०८.२०२५

अर्जदार - **१.शंकरराव लक्ष्मणराव ढोले (मयत) तर्फे वारस** -
**१अ.मनोरमा शंकरराव ढोले**, वय ७९ वर्षे, धंदा - घरकाम
**१ब.विनोद शंकरराव ढोले**, वय ६२ वर्षे, धंदा - शेती
**१क.दिलीप शंकरराव ढोले**, वय ६१ वर्षे, धंदा - शेती
**१ड.अनिल शंकरराव ढोले**, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
**२.वामन लक्ष्मणराव ढोले**, वय ८३ वर्षे, धंदा - शेती
**३.वसंतराव लक्ष्मणराव ढोले**, वय ८० वर्षे, धंदा - शेती
**४.रमेशराव लक्ष्मणसा ढोले**, वय ७५ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**निल (कुणीही नाही)**

वरील अर्जदाराने वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नं.१अ चे सासरे, तर अर्जदार नं.१ ब ते १ ड यांचे आजोबा व अर्जदार नं.२,३ व ४ यांचे वडिल नामे **लक्ष्मणराव श्रावणसा ढोले यांचा दिनांक ०३/०१/१९८३ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला.** तसेच अर्जदार नं.१ अ ची सासू , तर अर्जदार नं.१ ब ते १ ड यांची आजी व अर्जदार नं.२,३ व ४ यांची आई नामे रुख्माबाई लक्ष्मणसा ढोले हिचा दि.२३/०९/२००६ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०७/०६/२०२५ — शिक्का — आदेशानुसार, **(सहाय्यक अधीक्षक)**, दिवाणी न्यायालय क.स्तर, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश- २, यांचे न्यायालय**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२०/२०२५** — **ने.ता. १०.०७.२०२५**

अर्जदार :- संतोष
---वि---
गैरअर्जदार :- निरंक

**APPLICATION IN THE MATTER OF ADOPTION OF CHILD UNDER SECTION 7,8,9,10,11 (I) (Vi) OF HINDU ADOPTION AND MAINTENANCE ACT, 1956**

ज्याअर्थी वरिल अर्जदार क्र.१ संतोष कृष्णराव निमकर, वय ५५ वर्षे, धंदा-शेती, रा.वार्ड नं.०३, टिमटाळा शंभु, ता.भातकुली, जि.अमरावती यांनी सज्ञान मुलगा प्रज्वल याला दत्तक घेण्याकरिता जिल्हा व सत्र न्यायाधिश-२, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

सदर अर्जात अर्जदार क्र.२ व ३ प्रज्वलचे जन्मदाते आई वडिल नामे राजीव कृष्णराव निमकर व सौ.निलिमा राजीव निमकर, रा.टिमटाळा शंभु, ता.भातकुली, जि.अमरावती यांनी आपला दुसरा मुलगा नामे प्रज्वल याला अर्जदार क्र.१ नामे संतोष कृष्णराव निमकर यांना दत्तक देण्याकरिता व त्याला अर्जदार क्र.१ यांचा मुलगा म्हणून घोषित करण्याकरिता तसेच प्रज्वल संतोष निमकर या नावाने ओळखण्याकरिता विदयमान जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास/ अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकांस जाहीर नोटिस देण्यात येते की, त्यांनी दिनांक १०.०७.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा व सत्र न्यायाधिश-२,अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिला मार्फत हजर व्हावे वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दि.०१/०७/२०२५ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

**अमरावती**
**दिनांक - ०१/०७/२०२५** — शिक्का — **आदेशानुसार, सहायक अधीक्षक (न्यायीक विभाग), जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४२७/२५ — ने.ता.१४.०८.२०२५

अर्जदार - **१.श्रीमती लक्ष्मी विजयराव निंबाळकर**, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
**२.कोविंद विजयराव निंबाळकर**, वय २१ वर्षे, धंदा -शिक्षण
**३.छंद विजयराव निंबाळकर**, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण
अर्जदार नं.३ करिता अ.पा.क. आई अर्जदार नं.१
सर्व रा.मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **विजय महादेवराव निंबाळकर हे दिनांक १४/०४/२०२५ रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे, तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०१/०७/२०२५ — शिक्का — आदेशानुसार, **(सहाय्यक अधीक्षक)**, दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४०९/२५ — ने.ता.१२.०८.२०२५

अर्जदार - **१.श्री प्रकाश बापुरावजी रोडे**, वय ७२ वर्षे, धंदा - शेती
**२.श्री अशोकराव बापुरावजी रोडे**, वय ५८ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती
**३.उषा अशोकराव बंड**, वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.छत्रछाया अपार्टमेंट, नागपूर, ता.जि.नागपूर

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांचे वडिल नामे **बापुराव गुणाजी रोडे हे दिनांक २२/१२/२००४ रोजी खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेले आहे**. तसेच अर्जदारांची आई नामे लिलाबाई बापुराव रोडे ही दिनांक २२/०५/२०२५ रोजी खानापुर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मरण पावलेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे, तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०१/०७/२०२५ — शिक्का — आदेशानुसार, **(सहाय्यक अधीक्षक)**, दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

नोटीस देणार :- १. **नलिनी मनोहरलाल शाह**
वय ७४ वर्षे, रा.शिवगीर बाबा कॉलनी, बाभळी, ता.दर्यापूर, जि. अमरावती
२. **पिंकूबेन भाविन दलाल**, वय ४२ वर्षे, मु.पो.देवगड बारिया, जि.दाहोड (गुजरात)
३. **पुजा व्रजेश शाह**, वय ४६ वर्षे,
४. **सौ.जिमीबेन धवलभाई शाह**, वय ४३ वर्षे, नं.३ व ४ रा.खंबात, ता.जि.आनंद (गुजरात)

तर्फे :- **ॲड. डि.बी.अग्रवाल, मुर्तिजापुर रोड, गणेशपुर, ता.दर्यापूर**

खालील सही करणार जाहीर नोटिस देतो की, आमचे उपरोक्त पक्षकार मौजे बाभळी,ता.दर्यापूर, भो.वर्ग-१,भुमापन क्र.२३९/१ एकुण क्षेत्रफळ १.८९ हे.आर., आ.रु. ८.५६ पैसे, हिस्सा सालीम या क्षेत्रफळाचे सामाईक मालक आहेत. त्यानुसार रेकॉर्ड ऑफ राईट मध्ये तशी नोंद असुन सध्या त्यांच्या ताब्यात आहे.

ही शेत जमीन आमचे पक्षकाराने विक्री करिता काढली असून त्याबाबत दोन तिन ग्राहकाची बोलणी सुरु आहे. या जाहीर नोटिस व्दारे कळविण्यात येते की, जर कुणालाही या मालमत्तेसंबंधी, हिश्श्यासंबंधी, ताब्याबाबत, कर्जाबाबत कोणताही वादविवाद आक्षेप असेल तर ७ दिवसाचे आत योग्य दस्तासह दिलेल्या पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा वेळ झाल्यावर कोणताही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. आमचे पक्षकार विकत घेणा-या व्यक्तीला खरेदी खत नोंदवून देतील करिता या अगोदर सुध्दा २४/१२/२०२४ ला जाहीर नोटिस व्दारे सुचविले आहे.

दिनांक ३०/०६/२०२५ — **सही/- ॲड.डी.बी.अग्रवाल, गणेशपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती, मो.नं.-७५८८०८५२०१**

---

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३८९/२५ — ने.ता.०२.०८.२०२५

अर्जदार - **१.श्रीमती कमलाबाई सुधाकरराव डहाणे**, वय ७५ वर्षे, धंदा - घरकाम
**२.श्री पंकज सुधाकरराव डहाणे**, वय ३८ वर्षे, धंदा -शेती
दोघेही रा.अडगांव, ता.मोर्शी,जि.अमरावती
**३.सौ.संध्या संगीतराव महल्ले**, वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पाळा, ता.नांदगाव खंडे.जि.अमरावती

-- विरुध्द --
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे **सुधाकर देवरावजी डहाणे हे दिनांक ०१/०६/२०२४ रोजी पीडीएमसी हॉस्पिटल, अमरावती, ता. जि.अमरावती येथे मय्यत झालेले आहे.** त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे, तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

दिनांक- ०१/०७/२०२५ — शिक्का — आदेशानुसार, **(सहाय्यक अधीक्षक)**, दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

नोटीस देणार :- १. **नलिनी मनोहरलाल शाह**
वय ७४ वर्षे, रा.शिवगीर बाबा कॉलनी, बाभळी, ता.दर्यापूर, जि. अमरावती
तर्फे :- **ॲड. डि.बी.अग्रवाल, मुर्तिजापुर रोड, गणेशपुर, ता.दर्यापूर**

खालील सही करणार जाहीर नोटिस देतो की, आमचे उपरोक्त पक्षकार मौजे बाभळी,ता.दर्यापूर, भो.वर्ग-१,भुमापन क्र.२३९/१ एकुण क्षेत्रफळ २.०४ हे.आर., आ.रु. ९.२३ पैसे, हिस्सा सालीम या क्षेत्रफळाचे सामाईक मालक आहेत. त्यानुसार रेकॉर्ड ऑफ राईट मध्ये तशी नोंद असुन सध्या त्यांच्या ताब्यात आहे.

ही शेत जमीन आमचे पक्षकाराने विक्री करिता काढली असून त्याबाबत दोन तिन ग्राहकाची बोलणी सुरु आहे. या जाहीर नोटिस व्दारे कळविण्यात येते की, जर कुणालाही या मालमत्तेसंबंधी, हिश्श्यासंबंधी, ताब्याबाबत, कर्जाबाबत कोणताही वादविवाद आक्षेप असेल तर ७ दिवसाचे आत योग्य दस्तासह दिलेल्या पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा वेळ झाल्यावर कोणताही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. आमचे पक्षकार विकत घेणा-या व्यक्तीला खरेदी खत नोंदवून देतील करिता या अगोदर सुध्दा २४/१२/२०२४ ला जाहीर नोटिस व्दारे सुचविले आहे.

दिनांक ३०/०६/२०२५ — **सही/- ॲड.डी.बी.अग्रवाल, गणेशपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती, मो.नं.-७५८८०८५२०१**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - ११८७/२०२५**
**नामचंद व इतर वि.अमीत**
**पुढील तारीख ०७.०८.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **नामचंद पुरणलाल मुलानी**, वय ४५ वर्षे, धंदा - व्यवसाय
२. **मुलचंद पुरणलाल मुलानी**, वय ५२ वर्षे, धंदा - व्यवसाय
३. **श्रीमती सिताबाई पुरणलाल मुलानी**, वय ७४ वर्षे, धंदा - निरंक
सर्व रा.सिंधी कॅम्प न्यू टाउन बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --
गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पुरणलाल तिलुमल मुलानी** हे **दि.१६/१२/२०२४** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. **अर्जदार नामचंद पुरणलाल मुलानी व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नामचंद पुरणलाल मुलानी व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २६.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशान्वये, **सहायक अधीक्षक,** दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.ए.एच.बेग ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - १०८४/२०२५**
**गजानन व इतर वि निरंक**
**पुढील तारीख १६.०७.२०२५**

**छबुताई मधुकर मोहोड व इतर**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **गजानन पांडुरंगजी लाडोले**, वय ६२ वर्षे, धंदा - निवृत्त, रा.श्रीधर नगर, गोपाल नगर रोड, मालू नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. **सौ.इंदूबाई रमेशराव चिरडे**, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम, रा.रंगारीपुरा, वार्ड नं.२० वाणी, जि.यवतमाळ
३. **सौ.शिला अरुणराव सांभे**, वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम, रा.बारीपुरा, जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती
४. **सौ.उषा विश्वासराव इंगोले**, वय ६१ वर्षे, धंदा - घरकाम, रा.इंगोलेपुरा,जुनी वस्ती, बडनेरा,ता.जि.अमरावती
५. **सौ.शुभांगी अशोकराव पोकळे**, रा.मालू नगर,बडनेरा रोड, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --
गैरअर्जदार :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत लिलाबाई उर्फ मंजुराबाई पांडुरंगजी लाडोळे** हे **दि.२१/०५/२०१४** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार गजानन पांडूरंगजी लाडोले व इतर** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गजानन पांडूरंगजी लाडोले व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १६.०५.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशान्वये, **सहायक अधीक्षक,** दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

## जाहीर नोटीस

प्रो.नं.१२९९/२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापुर
दि.१८/०६/२०२५

**वि. दिवाणी न्यायालय (व. स्तर), दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

**किरकोळ अर्ज क्र.२३३/२०२५** — **ने.ता.०९.०७.२०२५**

अर्जदार -
१. **महानंदा पुरुषोत्तम भोंगरे**, वय ५२ वर्षे, धंदा - मजुरी, रा. किराणा दुकानाजवळ, कामनापुर, ता.भातकुली, जि.अमरावती
२. **सरस्वती साहेबराव रताळे**, वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम, रा.वडनेर भुजंग, काकडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
३. **सुनंदा ज्ञानेश्वर भोंगरे**, वय ५६ वर्षे, धंदा - घरकाम, रा.बेलखेड, पो.लाडेगांव, ता.कारंजा, जि.वाशिम
४. **शांता सुरेश भागवे (मयत)**
<u>४/१</u> **सुरेश किसनराव भागवे**, वय ५८ वर्षे, धंदा -मजुरी
<u>४/२</u>.**शरद सुरेश भागवे**, वय ३२ वर्षे, धंदा -मजुरी
<u>४/३</u> **अजय सुरेश भागवे**, वय २७ वर्षे, धंदा -मजुरी
<u>४/१</u> ते <u>४/३</u> रा.टाकळी जहां.ता.नांदगाव खंडे.जि.अमरावती
५. **मंदा सुखदेव भिलेवार**, वय ४६ वर्षे, धंदा -मजुरी, रा.शिरजादा, ता.दर्यापूर, जि.अमरावती

- विरुध्द-

गैरअर्जदार -
**१.रामेश्वर सुखदेवराव बिल्लेवार**, वय ७० वर्षे, धंदा-कृषी अधिकारी
**२. हरिदास सुखदेवराव बिल्लेवार**, वय ६० वर्षे, धंदा-कृषी अधिकारी

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **सुखदेव भिवाजी बिल्लेवार** हे दिनांक ०७.०६.२००४ रोजी मरण पावले व त्यांची पत्नी **पार्वताबाई सुखदेव बिल्लेवार** ही दि.१७/०५/१९९८ रोजी व त्यांची मुलगी शांता सुरेश भागवे ही दि.१८/१२/२०२३ रोजी मरण पावली.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **<u>बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे</u>** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१८.०६.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**, दिवाणी न्यायालय (व.स्तर), दर्यापूर

---

## जाहीर सोडचिठ्ठी

**जाहीर सोडचिठ्ठी घेणार- पार्टी नं.१ - सौ.निकीता हरिदासजी पद्मणे**
वय २२ वर्षे,
रा. मंगेशजी खंडारे यांच्या घरी (माहेरी)
नवाथे नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**जाहीर सोडचिठ्ठी घेणार- पार्टी नं.२ - हरिदास सुभाषजी पद्मणे**
वय २५ वर्षे,
रा.इंझोरी,ता.मानोरा, जि.वाशिम

१. आम्ही दोघे पार्टी नं.१ आणि पार्टी नं.२ वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. कुणाच्याही दबावात न येता, चांगल्या मानसिक अवस्थेत सामाजिक जातमान्यतेनुसार मी स्वतः पार्टी नं.१ ला माझे पतीला दिनांक **३ जुलै २०२५** रोजी जाहीर सोडचिठ्ठी देत आहे.

२. आमचा विवाह **३ ऑगस्ट २०२४** ला **नोंदणी** पध्दतीने झाला आहे. मागिल ३ महिन्यापासून पार्टी नं.१ माहेरी राहत आहे. यापूढे दोघाही पती-पत्नीचे पटणे शक्य नाही. सततच्या सांसरिक कलकातून कुणाचीही जिवितहानी होवू नये म्हणून याच क्षणी पार्टी नं.१ बिनशर्त घटस्फोट घेत आहे.

३. यापुढे दोघेही दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. यापुढे दोघेही एक - दुस-याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुस-याची सामाजिक बदनामी करणार नाही. हे पती पत्नीचे वैवाहिक संबंधाचे नाते इथेच संपुष्टात येत आहे.

**स्थळ -** अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)
**दिनांक** - ३ जुलै २०२५

**जाहिर सोडचिठ्ठी देणार :**

**पत्नी- सौ.निकीता हरिदासजी पद्मणे**

---

**विद्यमान श्रीमती एम.ए.देशमुख,११ वे सहदिवाणी न्यायाधिश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**आर.सी.एस.नं.१५९/ /२०२५** — **ने.ता.३०.०७.२०२५**

अर्जदार : **निनाद चंद्रकांत देशपांडे**
**रा.साई मंदिर जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **महाराष्ट्र शासन, तर्फे**
**जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी,कार्यालय, कॅम्प, अमरावती**

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात कायदेशिर मृत्यू घोषित करण्यासाठी दिवाणी दावा अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार यांचे काका नामे **श्रीकांत वसंतराव देशपांडे** हे **दि.२६/११/२०१४** पासून अज्ञात आहेत. अर्जदाराने श्रीकांत वसंतराव देशपांडे यांनरा पाहण्यासाठी शक्य ते प्रयत्न केलेले आहे. पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती यांचे तर्फे तपास केला असता श्रीकांत वसंतराव देशपांडे हे कुठेही आढळून आले नाहीत. त्यामुळे अर्जदारांने श्रीकांत वसंतराव देशपांडे यांना कायदेशिर मृत घोषित करण्यासाठी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल

आज दिनांक २०/०६/२०२५ रोर्जी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक (प्रशासन)**, दिवाणी न्यायालय, व.स्तर,अमरावती

**विद्यमान श्रीमती एम.ए.देशमुख,११ वे सहदिवाणी न्यायाधिश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**आर.सी.एस.नं.१५९/ /२०२५** — **ने.ता.३०.०७.२०२५**

अर्जदार : **निनाद चंद्रकांत देशपांडे**
**रा.साई मंदिर जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : **महाराष्ट्र शासन, तर्फे**
**जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी,कार्यालय, कॅम्प, अमरावती**

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात कायदेशिर मृत्यू घोषित करण्यासाठी दिवाणी दावा अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार यांचे काका नामे **श्रीकांत वसंतराव देशपांडे** हे **दि.२६/११/२०१४** पासून अज्ञात आहेत. अर्जदाराने श्रीकांत वसंतराव देशपांडे यांनरा पाहण्यासाठी शक्य ते प्रयत्न केलेले आहे. पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती यांचे तर्फे तपास केला असता श्रीकांत वसंतराव देशपांडे हे कुठेही आढळून आले नाहीत. त्यामुळे अर्जदारांने श्रीकांत वसंतराव देशपांडे यांना कायदेशिर मृत घोषित करण्यासाठी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल

आज दिनांक २०/०६/२०२५ रोर्जी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक (प्रशासन)**, दिवाणी न्यायालय, व.स्तर,अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३६ अंक २९८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## शेतकरी उत्पादन खरेदी कंपन्यांच्या गैरव्यवहारामुळे
# विदर्भातील शेतकऱ्यांचे नुकसान-आ.सुलभा खोडके

### शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला मिळवून देण्याची पावसाळी अधिवेशनातून मागणी

**अमरावती/का.प्र.**

शेतकरी उत्पादन खरेदी कंपन्यांनी शासनाच्या नावाखाली सोयाबीन खरेदीमध्ये केलेल्या गैरव्यवहार प्रकरणांचे पडसाद राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उमटले. यावेळी अमरावतीच्या आ. सुलभा खोडके यांनी प्रश्न उपस्थित करतांना शेतकऱ्यांच्या माल खरेदी केल्या नंतर वखार महामंडळाच्या गोदामात कमी माल जमा झाल्याने यात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले. विदर्भातील जवळपास ६० ते ७० शेतकऱ्यांना ६३.६४ लाखांची नुकसान भरपाई देय असतांना केवळ ३८ लाख दिले जात आहे. कंपनीने गैरव्यवहार केला व त्यांच्यावर कार्यवाही सुद्धा प्रस्तावित आहे. पण यामध्ये शेतकऱ्यांचा दोष काय ? असा



प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांच्या मालाचे नुकसान भरपाई देऊन न्याय देण्याची मागणी आ. खोडके यांनी सभागृहासमक्ष लावून धरली.

सभागृहात बोलतांना आ.खोडके यांनी सांगितले कि, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला माल नाफेडच्या माध्यमातून महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन अंतर्गत विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंगच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या माल खरेदी करतो. व ज्या काही शेतकरी उत्पादक कंपन्या आहेत त्यांचे आपण ग्रेडर नेमतो. आणि त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा माल खरेदी करण्याची प्रक्रिया केली जाते. सन २०२४-२०२५ च्या हंगामात सोयाबीन खरेदी करतांना गैरव्यवहार झाल्याने विदर्भातील ६० ते ७० शेतकऱ्यांचे जवळपास ६३.६४ लाखांचे नुकसान झाले आहे. एकीकडे सर्व प्रकिया ऑनलाईन आहे, असे म्हणत असतांना शेतकरी उत्पादन कंपन्यांच्या ग्रेडरने त्यांना पावत्या दिल्या आहेत. प्रत्यक्षात पावत्या जमा केल्या नंतरच सर्व देयके व्हायला पाहिजे होते. मात्र तसे न झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. याकडे आमदार महोदयांनी सभागृहाचे लक्ष वेधले. तर दुसरीकडे पणन कार्यालयाकडून संबंधित कंपनीकडून वसुली केली जात असल्याने म्हटले जात आहे. मात्र प्रत्यक्षात विदर्भातही ६० ते ७० शेतकऱ्यांना ६३.६४ लाख द्यायचे असतांना शासन म्हणते की, केवळ ३६ लाखचं जमा आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे पैसे कधी मिळतील ? असा प्रश्न उपस्थित करून आ.खोडके यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली.

यावर सभागृहात उत्तर देतांना राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार नाफेडच्या वतीने खरेदी कालावधीत ऑनलाईन १९ हजार क्विंटल सोयाबीन खरेदी केले असून वखारच्या पावत्या नाफेड कार्यालयास सादर केल्या आहेत. मात्र त्यापैकी बाराशे क्विंटल माल कमी आहे. याची खरेदीची नोंद पोर्टलवर घेऊन सोयाबीन वखार महामंडळाच्या गोदामात जमा केला नाही. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना नाफेडकडून शेतकरी चुकारे अदा केले नाहीत.परंतु कंपनीकडून वसुली करण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

दरम्यान आ.खोडके यांनी विचारलेल्या प्रश्नावर मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले असतांना सभागृहातील पीठासीन अध्यक्ष माननीय अँड.राहुल नार्वेकर यांनी माल कमी आला असतांना कंपनीची देयके कशी अदा करण्यात आली.? असा प्रतिप्रश्न उपस्थित केला. यावर मंत्रीमहोदयांनी सभागृहा समक्ष सांगितले की, अद्याप कोणतेही देयके अदा करण्यात आली नसून संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आल्याने केंद्र व राज्यशासनाच्या कोणत्याही खरेदी प्रक्रियेत समाविष्ठ करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांची देयके अदा करण्यासंदर्भात कंपनीला देय असलेली सर्व रक्कम रोखून ठेवण्यात आली आहे. त्यांच्या कडून वसुली करून शेतकऱ्यांना लवकरच नुकसान भरपाई येण्याचा शासनाचा प्रयत्न सुरु आहे.

## पालकमंत्री बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील घरकुल योजनेला वेग

**अमरावती/का.प्र.**

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील घरकुल योजनेला चांगलाच वेग आला आहे. वाळू वितरणाची प्रक्रिया वेगात सुरू झाल्याने घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, सामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांनी पालकमंत्री महोदयांचे आभार मानले आहेत. महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे अमरावती जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू वितरणाची प्रक्रिया वेगात सुरू असून, ३० जून २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील ५४ हजार ९४९ मंजूर घरकुलांपैकी ७ हजार १४८ लाभार्थ्यांना वाळूचा पुरवठा करण्यात आला आहे.



घरकुलांसाठी एकूण २ लक्ष १५ हजार १४ब्रास वाळूची मागणी आहे. जिल्ह्यामध्ये स्थानिक वापरासाठी १६५ वाळू गट राखीव ठेवण्यात आले असून, त्यातून ५४ हजार ९१८ब्रास वाळूसाठा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, एकही वाळू गट अद्याप लिलावात गेलेला नाही, त्यामुळे हा संपूर्ण साठा घरकुल लाभार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. आतापर्यंत ८ हजार ८७० ब्रास वाळूचे वितरण करण्यात आले आहे.तालुका निहाय वाळू वाटपाचा तपशील (लाभार्थी संख्या आणि वाटप झालेली वाळू ब्रासमध्ये) अमरावती- १५ लाभार्थी, ७५ ब्रास, तिवसा- ३१,नांदगाव खंडेश्वर- ३९९ लाभार्थी, ४३० ब्रास, धामणगाव रेल्वे- २०३ लाभार्थी, , ४३४ब्रास, वरुड- ४७९ , ४९० ब्रास, दर्यापूर- २६५, ६२८ ब्रास, अंजनगावसुर्जी- ३५० , ३५० ब्रास, अचलपूर- २ हजार ७३१ लाभार्थी, २ हजार ९९१ ब्रास, चांदूरबाजार-२१७ लाभार्थी, धारणी- १ हजार ५०० लाभार्थी.

## कर्जमाफीसाठी शिवसेना आक्रमक तहसिलदारांना दिले निवेदन

**धारणी/ वार्ताहर**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना आक्रमक झाली असून, तालुक्यातील तहसीलदार प्रदीप शेवाळे यांना निवेदन देत जोरदार मोर्चा काढण्यात आला.

शेतकऱ्यांना भेडसावत असलेल्या समस्यांवर तातडीने तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

२०२४ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे सोयाबीन पीकाचे मोठे नुकसान झाले होते. त्यासाठी शासनाकडे खरड (शेतवापर कागदपत्रांवर आधारित) नुकसानभरपाईची मागणी केली जात असून, ती तातडीने वितरित करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी यावेळी



करण्यात आली.वीजवितरण कंपनीने सुरू केलेल्या स्मार्ट मीटर योजनेमुळे नागरिकांवर आर्थिक बोजा पडत असून, ही योजना तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली. तसेच, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना गेल्या वर्षभरापासून निधी मिळालेला नाही. तो नियमित करण्यात यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

तालुक्यात सध्या शेतकऱ्यांसाठी ॐ खताची तीव्र टंचाई जाणवत असून, ती त्वरित दूर करण्यात यावी. त्याचबरोबर मागील सहा महिन्यांपासून वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठाही शेतकरी आणि सामान्य जनतेसाठी डोकेदुखी ठरत आहे. यावर तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.महाराष्ट्र सरकारने पूर्वी घोषित केलेली कर्जमाफी अद्यापही अनेक शेतकऱ्यांना मिळालेली नाही.

ती तात्काळ वितरित करण्यात यावी, अशी मागणी करत शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत तहसील कार्यालयावर मोर्चा आणला.या मोर्चात तालुका प्रमुख राजू राठोड, उपजिल्हा प्रमुख राजू मालवीय, सुनील चौथमल, श्रीराम मालवीय, दिनेश धनेवार, दयाराम सोनी यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी झाले होते.शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना रस्त्यावर उतरत असून, जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## तिवसा तालुक्यातील सात शेतकऱ्यांचा कृषी दिनी सन्मान

**तिवसा/ वार्ताहर**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्य पंचायत समिती तिवसा येथे आयोजित कृषी दिन कार्यक्रमात तिवसा तालुक्यातील सात उत्कृष्ट शेतकऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गट विकास अधिकारी अभिषेक कासोदे ,प्रमुख उपस्थिती नारायण आमझरे (सहायक गट विकास अधिकारी) ,तालुका कृषी अधिकारी चुडे,प्रमुख मार्गदर्शक म्हणून युवा प्रगतीशील शेतकरी सुरज गिरी व निखिल तेटू हे उपस्थित होते.



### पंचायत समितीचे आयोजन

कृषी दिनाचे औचित्य साधून तिवसा तालुक्यातील प्रगतीशील शेतकरी किशोर मधुकर इंगोले (रा. घोटा), सौ भावना दिलीप चव्हाण (रा. शिवणगाव),संगीता सुभाष अंबाडकर (रा.शिवणगाव), कैलास गोमाजी माहुरे (रा. चांदुर ढोरे),रुपराव झामाजी मनोहरे (रा. हसनापूर) ,संजय गणेश इंगळे (रा. ईसापुर), मोहम्मद शकील मोहम्मद हातम (रा. आखतवाडा) या शेतकऱ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

कमी खर्च व किफायतशीर शेती करण्याच्या दृष्टीने सेंद्रिय शेती चे फायदे प्रमुख मार्गदर्शक सुरज गिरी व निखिल तेटू यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले .सहा गट विकास अधिकारी नारायण आमझरे यांनी शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन केले.कै. वसंतराव नाईक यांचे कार्याचा उजाळा अध्यक्षीय भाषणामध्ये अभिषेक कासोदे गटविकास अधिकारी यांनी दिला.संचालन सचिन गोरटे कृषी अधिकारी, प्रास्ताविक जवंजाळ कृषी पर्यवेक्षक व आभार प्रदर्शन बनसोड विस्तार अधिकारी यांनी केले. कार्यक्रमाला कृषी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

## कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूरमार्फत
## जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी कृषी तांत्रिक सप्ताह

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून तसेच महाराष्ट्रातील शेतकरी तांत्रिकदृष्ट्या प्रगत होऊन शेती कुशल बनावा जेणेकरून खऱ्या अर्थाने शेतकरी समृद्ध होईल या निर्धाराने कृषी विज्ञान केंद्र दुर्गापुर येथे कृषी दिन साजरा करण्यात आला, तसेच जिल्ह्यात कृषी तांत्रिक सप्ताह आयोजनाची सुरुवात येथून करण्यात आली.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषी विज्ञान केंद्र दुर्गापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. के पी सिंह हे लाभले. मंचावर उपस्थित मान्यवर म्हणून कृषी विस्तारतज्ञ पी.एस जायले, कृषीविद्या तज्ञ डॉ. एच व्ही ठाकूर, पशुसंवर्धन तज्ञ महेश आखुड व कार्यालयीन अधीक्षक संतोष देशमुख उपस्थित होते.कार्यक्रमास संबोधित करताना डॉ. सिंह म्हणाले की, शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाचा



अवलंब करून उत्पादन वाढवण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले, जैविक निविष्ठा वापर, हवामान अनुकूल शेती, सेंद्रिय शेती, पाण्याचे योग्य व्यवस्थापन या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

संतोष देशमुख यांनी माहिती देताना डॉ. वसंतराव नाईक यांच्या शेतकरी, लोकशाही आणि राष्ट्र समर्पित जीवनाचा आलेख समुचित पणे मांडला.महेश आखुड यांनी माहिती देताना सांगितले की, आगामी ठरवलेल्या जिल्हाभरात कृषी तांत्रिक सप्ताहाचे आयोजन, कार्यक्रम रूपरेषा, शेतकरी सेवेसाठी करावयाची कामे याविषयी उद्बोधन केले.

कार्यक्रमाच्या संचालनाची जबाबदारी राहुल जगताप यांनी तर आभार प्रदर्शन महेश आखुड यांनी पार पाडले.कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर येथून विषय विशेषज्ञ प्रफुल्ल महल्ले, डॉ. हर्षद ठाकूर, आरती येवतीकर, राहुल घोगरे, आकाश धरमकर, सुरेश वैद्य, अश्विनी पोतदार, प्रणाली देशमुख, सचिन पिंजरकर, ऋषिकेश शिंदे, महेंद सेंगर, विशाल राऊत, उमेश तायडे, आशिष रंगारी, सोनाली कालभूत, विशाखा रानोटकर, ऋषीराज शेखावत यासह स्थानिक शेतकरी, महिला व युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ईश्वरच आपल्याकडून चांगले काम करून घेतो- संतोषकुमारजी नवलानी

**अमरावती/ का.प्र.**

ईश्वराचे काम आपण करत नाही तर ईश्वरच आपल्याकडून चांगले काम करून घेतो. त्यामुळे बालाजी नगर येथील श्री जागृत गणेश मंदिराच्या जीर्णोद्धाराचे गणपती बाप्पाच आपल्याकडून पूर्ण करून घेईल, तेंव्हा तन मन धनाने या कार्यास सहकार्य करा,असे आवाहन शिवधारा आश्रम, सिंधू नगरचे संत साई श्री.संतोषकुमारजी नवलानी यांनी केले.

स्थानिक शंकर नगर परिसरातील बालाजी नगर – शुभम कॉलनी येथील श्री जागृत गणेश मंदिर जिर्णोद्धार शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. सामाजिक कार्यकर्ते सुनील राणा, पूज्य पंचायत कंवर नगर अमरावतीचे अध्यक्ष संतोषजी सबलानी, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँकेचे माजी अध्यक्ष व संचालक राजेंद्र महल्ले, सिटी लॅन्डचे अध्यक्ष मुकेशजी हरवानी, माजी नगर सेवक प्रा.प्रशांत वानखडे, माजी नगर सेवक अंजली पांडे, प्रमोद पांडे, बलदेव बजाज, सामाजिक कार्यकर्ते महेश मुलचंदानी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

श्री.सुनील राणा यांनी मंदिर जीर्णोद्धाराच्या कार्यासाठी सर्व ते सहकार्य देण्याचे आश्वासन दिले



श्री जागृत गणेश मंदिराच्या जीर्णोद्धाराला प्रारंभ

तसेच आमदार रविभाऊ राणा यांच्या आमदार निधीतून परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी सभागृह बांधून देण्यात येत असल्याचे आपल्या भाषणातून सांगितले.कार्यक्रमात सर्व पाहुण्यांचा तसेच माजी नगर सेवकांचा त्यांनी केलेल्या सेवेबद्धल शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

बालाजी नगर विकास समितीचे अध्यक्ष दीपक ठाकरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मंडळाच्या कार्याची तसेच प्रस्तावित मंदिराबाबत माहिती दिली व सर्व पाहुण्यांचे आणि उपस्थितांचे आभार मानले.समितीचे उपाध्यक्ष दिलीप हरवानी, दीपक जावरकर, कोषाध्यक्ष मनोहरलाल गणेशानी, सचिव शीतलसिंह चौहान, राजेश शादी, दीपक पांडे, दीपक ठक्कर, मनोज माखीजा, दिनेश उल्हे, कुलदीप कपूर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ.कुमार बोबडे यांनी केले.कार्यक्रमाला परिसरातील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### सायबर सिक्युरिटीची परीक्षा ७ रोजी

**अमरावती-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची उन्हाळी-२०२५ बी.ई. (आर्टीफिशियल इंटेलिजन्स अॅन्ड डाटा सायन्स) सेमि-५ (सी.बी.सी.एस.) च्या सायबर सिक्युरिटी या विषयाची परीक्षा एम.एस. गोटे महाविद्यालय, वाशिम (केंद्र क्र. ७२१) या परीक्षा केंद्रावर ७ जुलै रोजी दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत, बी.एस्सी. (होम सायन्स) फॅशन डिझायनिंग) सेमि-६ च्या सायन्टीफिक रायटिंग या विषयाची भारतीय महाविद्यालय, मोर्शी (केंद्र क्र. ११९) या परीक्षा केंद्रावर ७ जुलै, २०२५ रोजी दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत आणि एम.एस्सी. (फार्मास्युटीकल केमेस्ट्री) सेमि-४ (सी.बी.सी.एस.) च्या ड्रग डेव्हलपमेंट अॅन्ड अॅनालिसीस या विषयांची परीक्षा ७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ९.०० ते दु. १२.०० या वेळेत घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

### विद्यापीठाची आचार्य पदवी कोर्स वर्क परीक्षा १३ जुलैला

**अमरावती-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची आचार्य पदवी कोर्स वर्क परीक्षा-२०२५ दि. १३ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ ते दु. २.०० या वेळेत विद्याभारती महाविद्यालय, अमरावती, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, जी.एस. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ व राजस्थान आर्यन कला, श्री मिठूलालजी कचोलिया वाणिज्य आणि श्री सत्यनारायणजी रामकृष्णजी राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम या पाच परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.परीक्षेचे प्रवेशपत्र संशोधन केंद्राचे लॉगीन आय.डी. मध्ये दि. ५ जुलै पर्यंत उपलब्ध होतील. आचार्य पदवी कोर्स वर्क परीक्षेच्या पाचही विषयाच्या प्रश्नपत्रिका नियोजित तारीख व वेळेच्या एक तास आधी प्युस सॉफ्टवेअर मधून ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच सदर विषयाच्या प्रश्नपत्रिका नियोजित वेळेत डाऊनलोड करुन विद्यार्थी संख्येनुसार झेरॉक्स करुन विद्यार्थ्यांना वितरीत करण्याची जबाबदारी परीक्षा केंद्राधिकारी व सहकेंद्राधिकारी यांची राहील. विषयांचे गुण संशोधन केंद्राचे लॉगीन आय.डी. मध्ये दि. १४ ते २१ जुलै पर्यंत प्राचार्य, केंद्र प्रमुख, विभाग प्रमुख यांनी भरावयाचे असून ऑफलाईन गुण स्वीकारले जाणार नाहीत. तसेच प्राचार्य, केंद्र प्रमुख, विभाग प्रमुख यांनी लॉगीन आय.डी. मध्ये गुण सादर न केल्यास येणा-या अडचणीस ते स्वत: जबाबदार राहतील, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

### न. प. शिवाजी शाळेत शाळा प्रवेशोत्सव

**चांदुर रेल्वे-** छत्रपती शिवाजी महाराज नगरपरिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी डेक्स बेंच वाटप व शाळा प्रवेशोत्सव चांदुर रेल्वेच्या तहसीलदार पूजा माटोडे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी शाळेच्या पहिल्या दिवशी आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत



करण्यात आले.यावेळी तहसीलदार पूजा माटोडे यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, खाजगी शाळांच्या तुलनेत नगरपरिषद, जिल्हा परिषद शाळा कशा सुसज्ज करता येतील व शैक्षणिक दर्जा कसा सुधारेल याकडे शिक्षकांनी व पालकांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले.कार्यक्रमासाठी शहरातील विजय मिसाळ, माजी नगरसेविका कल्पना लांजेवार,कृष्णाजी पडोळकर, संजय बाबर, चेतना राऊत, सोनू चौधरी, महादेव शेंद्रे,मंगेश भोसले,मनीष कुकटकर, वैशाली वानखडे, सुदर्शन सोनोने उपस्थित होते.संचालन वैशाली कोरडे तर प्रास्ताविक मुख्याध्यापक नितीन नंदनवार यांनी केले.

### 'एक पेड माँ के नाम' चे आयोजन

**तिवसा-** स्थानिक या.द.व. देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या मोहिमेअंतर्गत 'एक पेड माँ के नाम 'यशस्वी करण्याकरिता



निर्देशीत केल्याप्रमाणे आणि मुख्यमंत्र्यांनी केलेल्या आवाहनाप्रमाणे तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे १० ( दहा )कोटी वृक्ष लागवड अभियाना अंतर्गत राबविण्याचे सुचित केलेले आहे. त्याप्रमाणे महाविद्यालयामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत आर. देशमुख यांच्या शुभहस्ते वृक्ष लावून वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.सी. जी. सोळंके आणि इतर विभाग प्रमुखांनी सुद्धा स्वहस्ते एक-एक वृक्षाचे रोपण केले. याप्रसंगी गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ .प्रा. स्वाती वैद्य, इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. कुसुमेंद्र सोनटक्के, ग्रंथपाल प्रा. रवी पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ. गणेश खेकाडे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.श्याम गेडाम यांच्याही हस्ते पेरू, गोड निंब, आवडा, शेवगा, इत्यादी प्रकारच्या रोपांचे वृक्षारोपण झाले. याप्रसंगी महाविद्यालयामधील गृह अर्थशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ. सीमा भुईवार ,विज्ञान विभागाच्या प्रा.दीप्ती गौरखेडे, प्रा.गुंजन वानखडे . शिक्षकेतर कर्मचारी संदीप चक्रनारायण , विरेंद्र शिर्के , धनराज फुले, अक्षय धुर्वे आणि इतरही शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रा.से.यो.चे स्वयंसेवक,कार्यक्रमाधिकारी सहायक कार्यक्रमाधिकारी आणि इतर कर्मचारी वृंदांचे महत्त्वाचे योगदान लाभले.

### विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**तिवसा-** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा तिवसा मुले या येथे २३ जून २०२५ ला शालेय प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांतर्गत वर्ग पहिली मध्ये दाखल असणाऱ्या सर्व मुला मुलींचे भव्य मिरवणूक काढून आनंदमय वातावरणात शाळेमध्ये प्रवेशित



करण्यात आले.प्रवेशित करत असताना सर्वप्रथम त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर त्यांच्या पायाचे ठसे घेऊन त्यांचे कुमकुम करण्यात आले व रीतसर वर्ग प्रवेश देण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना नवीन शालेय गणवेश, बेल्ट , टाय, पुस्तके इत्यादी शालेय वस्तूचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे सभापती अजय सुरटकर, शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र नकाशे, वाघमारे ,घुगुसकर , खोडसकर मॅडम,वैराळे , देव व सर्व अंगणवाडी सेविका तसेच गावातील पालक मंडळी उपस्थित होती.

गुरुवार, ३ जुलै २०२५
*E-paper - www.janmadhyam.com*
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बळवंत वानखडे यांच्या हस्ते पंढरपूर विशेष रेल्वे गाडीला नवी अमरावती स्थानकावरून हिरावा झेंडा





**अमरावती -** नवीन अमरावती रेल्वे स्थानकावर आज एक ऐतिहासिक आणि भावनिक क्षण अनुभवायला मिळाला, जेव्हा खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते पंढरपूर येथे जाणाऱ्या विशेष रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या प्रसंगी उपस्थित वारकऱ्यांमध्ये विशेष उत्साह आणि श्रद्धा दिसून आली. आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या हजारो भाविकांसाठी रेल्वे प्रशासनाने खासगी विशेष रेल्वे सेवा उपलब्ध करून दिली आहे. अमरावती विभागातून पंढरपूरसाठी ही गाडी पहिल्यांदाच नवीन अमरावती स्थानकावरून रवाना झाली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पारंपरिक वाद्यांच्या गजरात गाडीचे स्वागत करण्यात आले. स्टेशन परिसर फुलांच्या सजावटीने सुशोभित करण्यात आला होता. यावेळी खासदार बळवंत वानखडे यांनी प्रवाशांना शुभेच्छा देताना सांगितले की, 'वारकऱ्यांचा पंढरपूर प्रवास सुखकर होण्यासाठी आणि अमरावतीच्या नागरिकांना थेट सुविधा मिळावी, यासाठी रेल्वे प्रशासनासोबत सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.' या प्रसंगी उपस्थित मान्यवर: रेल्वे विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मिलिंद चिमोटे, विलास इंगोले, प्रवीण मनोहर, समाधन वानखडे, संजय थोरात, ओमप्रकाश बनसोड, विजय गणवीर, संजय शिरभाटे, सौरभ तायडे, मनोज भेले, दिनेश खोडके, जयश्री वानखेडे, मिताली पाटील आणि इतर समाजसेवक व वारकरी मंडळांचे पदाधिकारी प्रवाशांना स्टेशनवर स्वागत किट, पिण्याचे पाणी आणि स्वयंसेवकांकडून सहकार्यही करण्यात आले. गाडी सुटताना 'ज्ञानोबा माऊली' व 'तुकाराम' च्या जयघोषात संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते.

### अमरावती रेल्वे स्टेशन वरून शेकडो वारकरी पंढरपुरला रवाना

# तुषार भारतीय मित्र परिवार तर्फे रेनकोट, साबुदाणा खिचडी, प्राथमिक औषध वाटप





**अमरावती -** आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राच्या धर्म, संस्कृती आणि परंपरेचा शिखराध्याय! दरवर्षी महाराष्ट्र आणि आजूबाजूच्या परिसरातील लाखो वारकरी बंधू-भगिनी आपल्या विठूमाऊलीच्या दर्शनासाठी प्राण डोळ्यांत आणून, मैलोनमैल चालत पंढरपूर क्षेत्री पोहोचतात. या अनुपम भक्तीसोहळ्याचं वर्णन शब्दात करता येणं अशक्यच! म्हणूनच वारीचं वर्णन करताना असं म्हणतात की,

**दिंडया पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ?''**-संत नामदेवाच्या या अभंगानुसार लाखो वारकरी 'माझे जीवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ?'' हा भाव अंतरी ठेवून खांद्यावर पताका, मुखाने हरिनाम आणि टाळ-मुदुंगाच्या गजरात पंढरीत दाखल होण्यासाठी आज अमरावती रेल्वे स्टेशन वरून शेकडो वारकरी पंढळपुरला रवाना झाले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत पांडुरंग व रुख्मिणी यांच्या दर्शनाकरिता वारकरी भक्त आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर श्रीक्षेत्र पंढरपूरला जातात. वारकऱ्यांची सेवा ☞(पान २ वर)

# अचलपूर उपजिल्हा रुग्णालय ते माळवेशपुरा (तोंडगाव)गेट प्रस्तावित डी.पी रस्त्याची दुरावस्था, जागोजागी खड्डेच खडे...


### चिखलातून विद्यार्थ्यांना करावा लागतो प्रवास...





**अचलपूर (प्रतिनिधी)-** अचलपूर उपजिल्हा रुग्णालय ते माळवेशपुरा (तोंडगाव) गेट पर्यंत प्रस्तावित डी. पी रस्त्यांची दुरावस्था झाली असून भूषण ऑटो पासून माळवेशपुरा येथील अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे जाणाऱ्या रस्त्यावर ठीकठीकानी खड्डे पडले असून या रस्त्याचा सिमेंट कॉंक्रिटीकरणासाठी निधी मंजूर होऊन ही रस्त्याचे काम सुरू न विद्यार्थ्यांना चिखलातून मार्ग काढावा लागत आहे .एकिकडे या मुख्य रस्त्यावर पावसाळ्यात खड्डयात पाणी साचत असल्याने हा रस्ताच गायब झाल्याने नागरिक ,शेतकरी ,मजूर ,विद्यार्थी, रुग्णांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. यामुळे या रस्त्यांसाठी शासनाने सिमेंट कॉंक्रिटीकरण साठी निधी मंजूर करूनही तत्काळ सिमेंट कॉंक्रिटीकरण चे काम सुरू करण्याची ☞(पान २ वर)

# छत्री तलाव परिसरात भुताटकी सोशल मीडियावर अफवांचा पाऊस







**अमरावती -** आजच्या डिजिटल युगात विज्ञानाने फार प्रगती केली आहे. माणूस चंद्र ग्रहावर पोहोचला. मंगळ ग्रहावर सजीव सृष्टी शोधत आहे. सूर्याची परिक्रमा आणि गवसणी घालण्याचा प्रयत्न देखील होत आहे, तरी देखील आजही समाजात भुताटकीचा जळमट पहावयास मिळत आहे. गेल्या काही दिवसापासून सोशल मीडियावर अफवांचा पाऊस सुरू आहे. छत्री तलाव परिसरात भुताटकी झाल्याचा दावा केला जात आहे.भूताने पछाडल्याने एक युवक गंभीरित्या जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. वेगवेगळ्या चर्चा रंगू लागले आहे. नागरिकांमध्ये काही ठिकाणी भीतीचे वातावरण पाहायला मिळत आहे. माहितीनुसार छत्री तलाव परिसरात भुताटकी सुरू असल्याचे सोशल मीडियावर पोस्ट केल्या जात आहे. वास्तविक या पोस्टला साधक आणि बाधक प्रतिसाद दिल्या जात आहे.अनेक लोकांनी भुताटकीचे समर्थन केले तर काही लोकांनी ☞(पान २ वर)


# भानखेडा मध्ये फोडले बंद घर
## ३.६२ लाखांचा मुद्देमाल लंपास



**अमरावती -** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या भानखेडा खुर्द येथे एका बंद घराला निशाणा बनवून तिथून २ लाख रोख व दागिने असे एकूण ३ लाख ६२ हजार रुपयाचा मुद्देमाल लंपास करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.यामुळे परिसरात खळबळ मिळाली आहे. माहितीनुसार संजय अंबादास शिंदे (३५) आपल्या कुटुंबीयांसह कामानिमित्त मध्यप्रदेश येथील बैतूल गेले होते. यावेळी अज्ञात आरोपींनी त्यांच्या बंद घराचा कुलूप तोडून घरात प्रवेश करून अलमारी मध्ये ठेवलेले २ लाख रुपये रोख, सोन्याची चेन २० ग्राम किं. ६० हजार,अगंठी ९ ग्राम २७ हजार, अंगठी ५ ग्राम १५ हजार ,सोन्याची पोत १० ग्राम ३० हजार असा एकूण ३ लाख ६२ हजारचा मुद्देमाल चोरून नेला. सोमवार सकाळी संजय शिंदे यांच्या चुलत भाऊ राहुल शिंदे यांनी त्यांना फोन करून घराचा कुलूप कोंडा फुटला असल्याची माहिती दिली. ही माहिती मिळताच संजय शिंदे कुटुंबीयांसह परत भानखेडा आले. त्यांनी जेव्हा घरामध्ये आत जाऊन पाहिले तर त्यांना अलमारी मध्ये ठेवलेले २ लाख रुपये रोख व दागिने ☞(पान २ वर)

# स्पा ९९ वर गुन्हे शाखाची धाड- आपत्तीजनक साहित्य केले जप्त



**अमरावती -** स्थानिक गर्ल्स हायस्कूल परिसरातील नेक्स्ट लेवल मॉलमध्ये स्पा ९९ वर गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने आज बुधवार २ जुलैच्या सायंकाळी धाड मारून आपत्ती जनक साहित्य जप्त केले. पीआय संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात ही कार्यवाही करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली होती की ,स्पा ९९ मध्ये अश्लील कारनामे सुरू आहे. यावरून पथकाने येथे बुधवारच्या सायंकाळी धाड मारली. येथे मुंबई ,बेंगलोर आणि थायलंडच्या पार्श्वभूमीवर स्पा ९९ बनलेला होता. ☞(पान २ वर)

# ऑटो उलटल्याने दहा प्रवासी जखमी
## तामसवाडी फाट्यावर अपघात





**दर्यापूर -** दर्यापूर ते अंजनगाव मार्गावरील तामसवाडी फाट्याजवळ मोठा अपघात घडलाय. दहा प्रवाशांना घेऊन जाणारी ऑटो उलटण्याची घटना आज बुधवार दोन जुलै च्या दुपारी समोर आली आहे.या अपघातात सर्व प्रवासी जखमी झालेत. यातील तीन जणांना गंभीर दुखापत झालीय. अपघातातील जखमींना तातडीने दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. माहितीनुसार, अंजनगावा कडून दर्यापूरकडे येणाऱ्या ऑटोचा अपघात झाला. या ऑटोमध्ये १० प्रवासी होते. ते दर्यापूर येथे शाळेच्या कामानिमित्त येत होते. ऑटो तामसवाडी फाट्याजवळ आली असताना चालकाचं ऑटोवरील नियंत्रण सुटलं, त्यामुळे अपघात घडलाय. अपघाताची घटना घडताच तेथे मोठ्या प्रमाणात नागरिकांची☞(पान २ वर)

# योगीधाम परिसरात नाल्यामध्ये आढळला मृतदेह
## पोलिसांना घातपाताचा संशय



**अमरावती -** बडनेरा नवी वस्ती परिसरातील योगीधाम या खुल्या लेआउट मधील नाल्यामध्ये आज बुधवार दोन जुलै चा सकाळच्या सुमारास एका इसमाचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.मृत व्यक्तीची ओळख राजीव वानखडे (५५, नवी वस्ती बडनेरा) अशी झाली आहे. प्राथमिक तपास अनुसार घातपाताचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.माहिती अनुसार बुधवारच्या सकाळी योगिधाम लेआउट मधून काही लोक जात होते. त्यावेळी त्यांना नाल्यामध्ये एक मृतदेह दिसला. याची माहिती त्यांनी तात्काळ पोलिसांना दिली. माहिती मिळतात बडनेरा पोलिसांनी तत्काळ योगीधाम पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह तातडीने अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय☞(पान २ वर)

# लिफ्टच्या नावावर लुटणारा गजाआड
## कोतवाली पोलिसांची यशस्वी कारवाई



**अमरावती -** लिफ्ट मागून एका मोपेड चालकाला लुटणाऱ्या आरोपीस कोतवाली पोलिसांनी काही तासातच गजाआड केले. आरोपीचे नाव आबिद खान आदिल खान (३५,नालसाबपुरा, मस्जिद जवळ ) आहे.तो वहाब खान नवाब खान यांच्याकडे भाड्याने राहतो. माहितीनुसार खोलेश्वर अकोला निवासी पंकज कमल किशोर अग्रवाल (४२) सप्लायरचा काम करतात. ३० जून च्या सकाळी ६ वाजता सोयाबीन मालाची गाडी भरण्यासाठी त्याला मालकांनी १७ हजार रुपये दिले होते.ते घेऊन १० वाजता पंकज कारंजा घाडगे येथे गेला, परंतु पाऊस चालू असल्यामुळे सोयाबीनची गाडी भरली नाही. त्यामुळे त्याला मालकांनी परत अकोला येथे येण्याचे सांगितले. यावरून पंकज हा बस ने कारंजा घाडगे येथून अमरावती बस स्टॅन्ड येथे आला सायंकाळी ६ वाजता तो बस स्टॅंडवरून पायदळ अमरावती रेल्वे स्टेशन कडे जात होता. बस स्टॅंड समोर मोपेड गाडीवर बसून दोन लोक आले व पंकजने त्यांना रेल्वे स्टेशनचा पत्ता विचारला. यावेळी आरोपींनी पंकजला सांगितले की आम्ही देखील रेल्वे स्टेशन कडे जात आहे. दोन्ही आरोपींनी त्याला मोपेड वर बसवले आणि उस्मानिया मस्जिद ते हमालपुरा रोडच्या गल्लीत नेऊन त्याचे तोंड दाबले व खाली पाडले तसेच त्याच्या पॅन्टच्या खिशातून १७ हजार रुपये काढले आणि दोघेही पळून गेले. पंकजने मोबाईल मध्ये आरोपींच्या ☞(पान २ वर)

# अर्धवट पुलाजवळील खड्ड्यात कार पडून अपघात
## कारमधील इसम किरकोळ जखमी





**मोर्शी/प्रतिनिधी:-** अर्ध अवस्थेत पडून असलेल्या पुला जवळील खड्ड्यात कार पडून झालेल्या अपघातात कारमधील इसम किरकोळ जखमी झाले. मात्र सुदैवाने प्राणहानी ठळली.ही घटना दि.३० जून रोजीच्या रात्री ११ वाजताचे सुमारास घडली.

याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार नागपूर येथील स्विफ्ट डिझायर गाडी क्र एम एच ३१ एफ सी ८५४६ चा चालक प्रणय प्रमोद घुरडे हा चार इसमांना नागपूर येथून वरुड मोर्शी मार्गे निसर्गरम्य ठिकाण असलेल्या चिखलदरा येथे जात होता.मोर्शी येथील नळा नदिवरील अर्धवट पुलाचे बांधकाम जवळपास पाच वर्षापासून अपूर्ण अवस्थेत पडून आहे. परिणामी अपघाताचे ☞(पान २ वर)

### राजस्थानी समाजातील गुणवंतांचा रविवारी सत्कार -हितकारक मंडळाचा उपक्रम

# स्व.विजयादेवी मुंधडा स्मतीप्रित्यर्थ आयोजन-होटल महफिल इनमध्ये होणार सोहळा -सीपी चावरिया व मनपा आयुक्त सौम्या शर्मा मुख्य अतिथी







**अमरावती :** राजस्थानी हितकारक मंडळाने आपल्या सुरेख परंपरेला जपताना येत्या रविवारी राजस्थानी समाजातील गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनींचा अभिनंदन व सत्कार सोहळा आयोजित केला आहे. स्व. सौ. विजयादेवी ब्रिजमोहन मुंधडा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा सत्कार सोहळा होटेल महफिल इनच्या सभागृहात ६ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता सुरु होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजस्थानी हितकारक मंडळाचे अध्यक्ष अनिल जु. अग्रवाल हे असतील. यावेळी विशेष अतिथी म्हणून पोलिस आयुक्त अरविंद चावरिया आणि महापालिका आयुक्त सौम्या शर्मा या उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे या सत्कार सोहळ्याला होटल महफिलचे संचालक गोपाल मुंधडा आणि समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी राजस्थानी समाजातील इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी आणि विद्यार्थीनींचा सत्कार होणार आहे. या गुणवंतांना मंडळातर्फे सुरेच असे स्मृतीचिन्ह देउन सन्मानित करण्यात येणार आहे. समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी मंडळातर्फे गेल्या अनेक वर्षांपासून ही सत्काराची परंपरा जोपासली जात आहे. या कार्यक्रमाला समाज बांधवांनी उपस्थित राहण्याची विनंती कार्यक्रमाचे संयोजक गोपाल चांडक श्रीनिवासा, संरक्षक पं. देवदत्त शर्मा, सचिव रामेश्वर गग्गड, ☞(पान २ वर)

# बासपाणी रस्त्याची दयनीय अवस्था; अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे आदिवासी जनता त्रस्त





**धारणी -** धारणीपासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या बासपाणी गावाकडे जाणारा प्रमुख रस्ता सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून, या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे रोजच्या जीवनातील मोठा संघर्ष ठरत आहे. हा रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत असल्याची माहिती आहे. पावसाळा येण्यापूर्वी या गावातील ग्रामपंचायत सदस्य आणि गावातील नागरिकांनी वारंवार निवेदने देऊनही अद्याप रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस कारवाई रस्त्याचे देखरेख करणाऱ्या विभागाने केली नाही. परिणामी या भागातील गरीब व आदिवासी जनतेला या रस्त्यामुळे दररोज त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याची अवस्था इतकी बिकट आहे की, शालेय विद्यार्थ्यांपासून, शेतकरी , वृद्ध , रुग्ण , व या रस्त्याच्या वापर करणाऱ्यां सर्वांनाच धोका निर्माण झाला आहे , यापूर्वीही विविध वृत्तपत्रांमध्ये या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. मात्र, बांधकाम विभागाचे अधिकारी अजूनही झोपेतच असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी, निवेदने आणि समस्या या अधिकाऱ्यांसाठी फक्त कागदाचे तुकडे आहे हे स्पष्ट होते. यावरून मेळघाटात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे आणि लोकप्रतिनिधींचे आदिवासी समाजाविषयीचे☞(पान २ वर)